म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. २८२

REFBK-0001341
REFBK-0001341

# स्त्रीगीतरत्नाकर

अथवा

## आबालवृद्ध स्त्रियांनीं म्हणण्यास व ऐकण्यास योग्य अशीं देवादिकांचीं वगैरे गाणीं.

### भाग १ ला.

आवृत्ति ४ थी.

हें पुस्तक

पार्वतीबाई गोखले यांनीं

घ. नं. ७८७ सदाशिव पेठ, पुणें, येथें प्रसिद्ध केलें.

सन १९१६.

ह्या पुस्तकासंबंधींचे सर्व हक्क प्रकाशक यांनीं सन १८६७ च्या २५ व्या आक्टाअन्वयें नोंदून आपणाकडे ठेविले आहेत.

किंमत १२ आणे.

Printed by Shivaram Mahadeo Paranjape at his Gowardhan Press, 6 Shukrawar, Poona city.

# प्रस्तावना.

आजपर्यंत गाण्यांचीं पुस्तकें पुष्कळ निघालीं, पण एवढें मोठें व पुष्कळ गाण्यांचें असें हें पहिलेंच पुस्तक आहे. ह्या पुस्तकांत आजपर्यंत कधीं न छापलेलीं अशींच बहुतेक गाणीं आहेत. शिवाय हल्लीं जुनीं गाणीं तर कोणाला येत नाहींशींच झालीं आहेत; व संगीताच्या चालीवरचींच गाणीं म्हणण्याची चाल पडली आहे. तरी आपल्या पूर्वींच्या जुन्या बायकांनीं केलेलीं गाणीं अगदींच जगांतून जाऊं नयेत, निदान तीं संग्रहीं तरी असावींत, ह्या हेतूनें हीं गाणीं छापलीं आहेत.

प्रकाशक,

पा० गो०

---

" स्त्रीगीतरत्नाकर " भाग १ ला, भाग २ रा,
भाग ३ रा व " अमृताष्टक " हीं पुस्तकें
रा. रा. र. चिं. सोहनी, घ. नं. ७८७,
सदाशिव पेठ, पुणें सिटी, येथें मिळतील.

# अनुक्रमणिका.

* ही फुली असलेलीं गाणीं फेरावरहि ह्मणतां येतात.


| गाणें. | | पान. |
|---|---|---|
| | गणपति | १ |
| १ | राम | २ |
| २ | राम | ३ |
| ३ | राम | ३ |
| ४ | राम | ४ |
| ५ | अहिल्योद्धार | ५ |
| ६ | सीतास्वयंवर | ७ |
| ७ | सीतास्वयंवर | ८ |
| ८ | धनुष्य | ९ |
| ९ | सीताविरह | १० |
| १० | सीताविरह | ११ |
| ११ | सीताविरह | १२ |
| १२ | मुद्रिका | १३ |
| १३ | मुद्रिका | १३ |
| १४ | मुद्रिका | १४ |
| १५ | मुद्रिका ४ थी | १५ |
| १६ | मुद्रिका ५ वी | १७ |

| | | | |
|---|---|---|---|
| १७ मुद्रिका ६ वी | .... | .... | १८ |
| १८ मुद्रिका ७ वी | .... | .... | १९ |
| १९ शबरी | .... | .... | २१ |
| २० चंद्रसेना | .... | .... | २२ |
| २१ चंद्रसेना २ री | .... | .... | २२ |
| २२ चंद्रसेना ३ री | .... | .... | २३ |
| २३ रावणजानकीसंवाद | .... | .... | २४ |
| २४ मंदोदरी | .... | .... | २६ |
| २५ लक्ष्मणविरह | .... | .... | २७ |
| २६ सीतावृत्त | .... | .... | २८ |
| २७ लोपामुद्रा | .... | .... | ३० |
| २८ सीतास्वयंवर | .... | .... | ३४ |
| २९ राम | .... | .... | ३६ |
| ३० राम | .... | .... | ३७ |
| ३१ रामलवांकुशसंवाद | .... | .... | ३९ |
| ३२ मारुती | .... | .... | ४० |


## गाणीं कृष्णाचीं.


| | | | |
|---|---|---|---|
| १ गवळण | .... | .... | ४२ |
| २ गवळण | .... | .... | ४३ |
| ३ गवळण | .... | .... | ४४ |
| ४ गवळण * | .... | .... | ४५ |
| ५ गवळण | .... | .... | ४६ |

६ गवळण .... .... ४६
७ गवळण * .... .... ४७
८ गवळण .... .... ४७
९ गवळण .... .... ४९
१० गवळण .... .... ४९
११ गवळण .... .... ५०
१२ गवळण * .... .... ५०
१३ गवळण .... .... ५१
१४ गवळण .... .... ५१
१५ गवळण ( चंद्रावळी ) .... .... ५२
१६ गवळण ( उलटा शृंगार ) ... ५३
१७ गवळण .... .... ५४
१८ गवळण .... .... ५५
१९ गवळण * .... .... ५७
२० गवळण .... .... ५९
२१ गवळण * .... .... ६०
२२ गवळण .... .... ६०
२३ गवळण .... .... ६१
२४ गवळण ... .... ६२
२५ गवळण ... .... ६३
२६ गवळण ... .... ६३
२७ गवळण ... .... ६३

| | | | |
|---|---|---|---|
| २८ राधाविलास | .... | .... | ६५ |
| २९ मुरली * | .... | .... | ६७ |
| ३० मुरली २ री | .... | .... | ६८ |
| ३१ मुरली ३ री | .... | .... | ६८ |
| ३२ मुरली ४ थी | .... | .... | ६९ |
| ३३ मुरली ५ वी | .... | .... | ६९ |
| ३४ मुरली ६ वी | .... | .... | ७० |
| ३५ मुरली ७ वी | .... | .... | ७० |
| ३६ मुरली ८ वी | .... | .... | ७३ |
| ३७ मुरली ९ वी | .... | .... | ७४ |
| ३८ ठकडा | .... | .... | ७६ |
| ३९ पीतांबर | .... | .... | ७७ |
| ४० कृष्णाचें | .... | .... | ७७ |
| ४१ कृष्णाचें | .... | .... | ७८ |
| ४२ कृष्णाचें | .... | .... | ७९ |
| ४३ शकुन | .... | .... | ७९ |
| ४४ कृष्णाचें | .... | .... | ८० |
| ४५ रास * | .... | .... | ८० |
| ४६ रास २ रा | .... | .... | ८१ |
| ४७ पिचकारी | .... | .... | ८३ |
| ४८ कृष्णाचें | .... | .... | ८४ |
| ४९ कृष्णाचें | .... | .... | ८४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५० | सोहळा | .... | ८५ |
| ५१ | राधाविलास | .... .... | ८६ |
| ५२ | राधाविलास | .... .... | ८७ |
| ५३ | राधा | .... .... | ८७ |
| ५४ | राधा * | .... .... | ८८ |
| ५५ | राधा | .... .... | ८९ |
| ५६ | पायघड्या | .... .... | ९० |
| ५७ | चंद्रावळ | .... .... | ९१ |
| ५८ | शिदोरी | .... .... | ९४ |
| ५९ | अक्रूर | .... .... | ९४ |
| ६० | अक्रूर | .... .... | ९५ |
| ६१ | अक्रूर | .... .... | ९६ |
| ६२ | अक्रूर | .... .... | ९७ |
| ६३ | अक्रूर | .... .... | ९८ |
| ६४ | कृष्णाचें | .... .... | ९९ |
| ६५ | कृष्णाचें * | .... .... | १०० |
| ६६ | रथ | .... .... | १०१ |
| ६७ | कृष्णाचें | .... .... | १०२ |
| ६८ | पलंग | .... .... | १०२ |
| ६९ | उद्धव | .... .... | १०३ |
| ७० | उद्धव | .... .... | १०४ |
| ७१ | उद्धव | .... .... | १०५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७२ | रुक्मिणीस्वयंवर | .... | १०६ |
| ७३ | रुक्मिणीस्वयंवर | .... | १०७ |
| ७४ | रुक्मिणीस्वयंवर | .... | १०८ |
| ७५ | रुक्मिणीस्वयंवर | .... | १०९ |
| ७६ | रुक्मिणीस्वयंवर | .... | १०९ |
| ७७ | तुळसरुक्मिणीचें भांडण | .... | ११० |
| ७८ | कृष्णरुक्मिणीसंवाद | .... | १११ |
| ७९ | कांकण | .... | १११ |
| ८० | कृष्णरुक्मिणीविनोद | .... | ११३ |
| ८१ | विनोद २ रा | .... | ११५ |
| ८२ | विनोद ३ रा | .... | ११६ |
| ८३ | भामाविनोद | .... | ११७ |
| ८४ | वनमाळी | .... | ११९ |
| ८५ | वनमाळी | .... | १२१ |
| ८६ | अंगुली | .... | १२२ |
| ८७ | भामाविलास | .... | १२२ |
| ८८ | सत्यभामा | .... | १२४ |
| ८९ | सत्यभामा | .... | १२६ |
| ९० | तुरा | .... | १२६ |
| ९१ | मंदिर | .... | १२८ |
| ९२ | फूल पारिजातकाचें | .... | १२९ |
| ९३ | फूल पारिजातकाचें | .... | १३० |

९४ धांवा द्रौपदीचा .... .... १३०
९५ धांवा द्रौपदीचा .... .... १३१
९६ धांवा ३ रा .... .... १३४
९७ धांवा ४ था ... ... १३५
९८ धांवा ५ वा ... ... १३७
९९ धांवा ६ वा ... ... १३८
१०० धांवा ७ वा ... ... १३९
१०१ धांवा ८ वा ... ... १४१
१०२ धांवा ९ वा ... ... १४२
१०३ धांवा १० वा ... ... १४४
१०४ योगी ... ... १४६

## गाणीं श्रीविठ्ठलाचीं.

१ ब्रह्म ... ... १४७
२ पंढरपुर ... ... १४८
३ गाणें विठ्ठलाचें ... ... १४९
४ गाणें विठ्ठलाचें ... ... १५०
५ विठोबा ... ... १५०
६ धांवा विठोबाचा ... ... १५१
७ गाठोडें ... ... १५२

## गाणीं शंकराचीं.

१ गाणें शंकराचें ... ... १५३

२ शंकराचें ... ... १५४
३ गंगागौरीचें भांडण ... ... १५४
४ शंकराचें ... ... १५५
५ भिल्लीण ... ... १५६
६ सदाशिव ... ... १५७
७ काशी ... ... १५७
८ काशी दुसरी ... ... १५९
९ शंकरपार्वतीविनोद ... ... १६०
१० जोगी ... ... १६१
११ गंगागौरीचें भांडण ... ... १६१
१२ शंकराचें ... ... १६३
१३ शारंगपाट ... ... १६४
१४ शंकराचें ... ... १६५
१५ अंबिका ... ... १६५
१६ अंबिका ... ... १६६
१७ अंबिका ... ... १६७
१८ अंबिका ... ... १६७
१९ जटा ... ... १६८

## भारतभागवतांतील कथांपैकीं व इतरगाणीं.

१ द्रौपदीचें ... ... १७०
२ द्रौपदीचें ... ... १७२

३ भीष्मपर्व ... ... १७२
४ मोहिनी ... ... १७५
५ देवयानी ... ... १७६
६ भगीरथ ... ... १७६
७ सुधन्वा ... ... १७७
८ सुधन्वा ... ... १७७
९ उखा ... ... १७८
१० उखा २ री ... ... १७९
११ दमयंती ... ... १८०
१२ हिरवा साज ... ... १८०
१३ पिवळा साज ... ... १८१
१४ पद्मीण ❊ ... ... १८२

## गाणीं देहावरचीं वगैरे.

१ मनुजा ... ... १८३
२ वेणु ... ... १८४
३ गाणें ... ... १८४
४ छंद ... ... १८५
५ सद्गुरूचें ... ... १८५
६ चक्षुदर्पण ... ... १८६
७ मन ... ... १८७
८ संध्या ... ... १८७
९ सर्प ... ... १८८

१० बाजार ... ... १८९
११ गाणें ... ... १९०
१२ धांवा श्रीरामाचा ... ... १९०
१३ शेजारती रामाची ... ... १९१
१४ काकड आरती पांडुरंगाची ... १९३
१५ भामाविनोद ... ... १९४


समाप्त.

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥



# गणपति.

चाल--( काय दयाळा संशय गमला सांग मला रघुराया रे. )

पार्वतितनया श्रीगणराया मंगलदायक विघ्नेशा ॥ तूंचि असासि शिव विष्णु विरिंची तूंचि सद्गुरू विश्वेशा ॥ धृ० ॥ शंभुकुमारा विघ्नहारका बुद्धिदायका सुखदाता ॥ मूषकवाहना ऋद्धीरमणा गजवदना हे जगदीशा ॥ पार्व० ॥१॥ भालचंद्र सिंदुरारि गणपति विकट विनायक वरदाता ॥ लंबोदर हे ह्मणती तुजला अष्टनायकाप्राणेशा ॥ पार्व० ॥ २ ॥ एकदंत गजकर्ण सुरेशा शरणागत जे तव पाया ॥ येती त्यांचें संकट हरिशी कोड पुरविशी सिद्धीशा ॥ पार्व० ॥३॥

॥ श्रीरामचंद्राय नमः ॥



# गाणें १ लें, राम.

कृष्णा वेण्या चंद्रभागा भीमरथी ॥ गंगा गोदा नर्मदा सरस्वती ॥ ताम्रपर्णी शरयु ती भागीरथी ॥ ह्या हेलकरिणी सुगंध पाणी भरती हो ॥ अ० कृ०॥ पाहूं चला सांवळा राम डोळां ॥ समाधानें बोलती बारा सोळा ॥ रत्नताटीं हातवे दीपमाळा ॥ घेउनी गुंफे चालिल्या चमकत बाळा हो ॥ पाहूं ॥ १ ॥ ऐशा वाजत गाजत आल्या राजद्वारा ॥ ह्मणती कौसल्येसी धणिभरी जगदुद्धारा ॥ पायांवरी आळविशी दीनोद्धारा हो ॥ पाहूं ॥ २ ॥ करतलकमलें कोमल जावळ कुरवाळीते ॥ अंजन घालून निरंजनीं

न्याहाळीते ॥ जांभयी देतां चुंबन चुटकीनें चाळवीते ॥ शतंजीव शिंकतांच आळविते हो ॥ पाहूं ॥ ३ ॥ क्षीराब्धीचा जावयी क्षीरवरभूप ॥ नित्यतृप्त पाजिले दूध तूप ॥ पायांवरी आळविते सुखरूप. हो ॥ पाहूं ॥ ४ ॥ रामजन्म झाला दशरथाचे घरीं ॥ आनंदली अयोध्यानगरी ॥ गुढ्या तोरणें उभविती घरोघरीं ॥ धन्य धन्य कौसल्ये तुझ्या उदरीं हो ॥ पाहूं ॥ ५ ॥

## गाणें २ रें, राम.

सुंदर नाम या सुखधाम राघवाचें हो ॥ शंकरराजा जाणे हें वर्म त्याचें ॥ टळेल पीडा या दुष्ट यमदूतांची हो ॥ अ० क० ॥ रसने रंगे या राघवाचे नामीं हो ॥ रस० ॥ १ ॥ वाल्याकोळी पातकी भूमंडळीं हो ॥ उलट्या नामें वाजविली त्यानें टाळी हो ॥ नाम घेतां पातकां झाली होळी हो ॥ रस० ॥ २ ॥ रसने किती विषयांचा धरशिल सोस हो ॥ नामस्मरणीं ठेवी हा विश्वास हो ॥ नामें तरला नामया विष्णुदास हो ॥ रस० ॥ ३ ॥

## गाणें ३ रें, राम.

चाल—( उद्धवा शांतवन कर जा. )

कर्मतत्त्व गहन कळेना ॥ कळलें तरि सांग घडेना ॥ कर्तृत्व अभिमान उडेना ॥ कामाचा लेश झडेना ॥

ब्रह्मार्पणबुद्धि जडेना ॥ पुण्यासी गांठि पडेना ॥ चा० ॥ अंधासि निशा उजडेना ॥ सुख कोठुन या अडरानीं ॥ अ० क० ॥ राम राम बोला वाणी ॥ मन लावा राघवचरणीं ॥ १ ॥ साधूचा संग धरावा ॥ ज्या नाहीं आपपरावा ॥ स्वकरें तच्चरण चुरावा ॥ हरिमहिमा श्रवण करावा ॥ प्रेमभाव हृदयिं धरावा ॥ कीर्तनीं करा सुगरावा ॥चा०॥ भवसिंधु सुखें उतरावा ॥ जन्माची होय सुराणी ॥ राम राम ० ॥ २ ॥ विषय हे विषापरि विटती ॥ स्वयमेव क्लेशही तुटती॥ वासना समूळहि अटती ॥ चित्ताच्या वृत्ती सुटती ॥ ज्ञानांकुर हृदयीं फुटती ॥ सहज सर्व संशय फिटती ॥ चा० ॥ कर्मबंध सहसा तुटती ॥ स्वानंदसुखाची खाणी ॥ राम० ॥ ३ ॥ शास्त्रदीप घेउन निघतां ॥ निगमागम शोधुनि पाहतां ॥ संतांसी विचार पुसतां ॥ सुगम ह्याचि दाविति पंथा ॥ आहेत मतांतर कंथा ॥ ज्या रुचल्या नाहिं अनंता ॥ चा० ॥ ह्मणुनी या विठ्ठलपंता ॥ पथ गमला निर्मळवाणी ॥ राम० ॥४॥

## गाणें ४ थें, राम.

सहज कैकयी मजासि पुसूं लागली ॥ अंगुष्ठाचि आकृती लिहून दाविली ॥ अंगुष्ठाचा दशशीर तिनें बनविला ॥ अ० क० ॥ रामचंद्रा माझा त्रास तुह्मां

कां आला ॥ जो ह्मणेन तोचि हट्ट माझा पुरविला ॥ राम ॥ १ ॥ रावणाचे घरीं म्यां हो दुःख सोशिलें ॥ मनीं वाटे मजासि आतां सुख जाहलें ॥ पुन्हां माझ्या नशिबानें धांवा घेतला ॥ राम ॥ २ ॥ गृहीं येतां दैव कसें उभें राहिलें ॥ रजकांनीं व्यर्थ कां हा नांव ठेविलें ॥ तोचि क्रोध रामचंद्रें मनीं धरियला ॥ राम ॥ ३ ॥ मज वधावया लक्ष्मणा धाडिलें ॥ लक्षुमणें नयनांतून अश्रु टाकिले ॥ मज वनीं सोडुनियां रथ फिरविला ॥ राम० ॥ ४ ॥ दुष्ट संगतिनें म्यां हो दुःख सोशिलें ॥ तातोबांनीं सर्व सुख मजासि दाविलें ॥ लहू अंकुश घेऊनि सुखासनीं बैसलें ॥ रामनामें सर्व दोष दूर जाहले ॥ आतां चरणांची जोड द्यावी गंगाला ॥ राम ॥ ५ ॥

## गाणें ५ वें, अहिल्योद्धार.

चाल—( हा ऋतू ग्रीष्म कीं प्रखर ताप दे भारी. )

आज कृतार्थ झालें देखुनि तव चरणांसी ॥ ही गौतम जाया विनवी पदकमलासी ॥ किति योगी पुजिती अष्ट अंग साधूनी ॥ त्यां कदा न दिससी नयनीं जागृतिं स्वप्नीं ॥ हा जन्म स्त्रियेचा नष्ट निंद्य ही काया ॥ या पापापासुन सोडविलें रघुराया ॥ चाल ॥ हा देह शिलामय झाला, बहु तपें ॥ हा

इंद्र दुरात्मा आला, खळरूपें ॥ ऋषिवर्यें शापिलें त्या, तो जाळिं लपे ॥ ही ब्रह्मकन्यका अर्चो तव पदपद्मा ॥ अ०क० ॥ श्रीराम विरामा न कळे तव गुणमहिमा ॥ हे दशरथतनया सच्चिद्घन सुखधामा ॥ श्री० ॥ १ ॥

कैलासपती जो शंकर पिनाकपाणी ॥ तव नामें हलाहल मधुर सुधेहुनि मानी ॥ नारदें मस्तकीं वरद हस्त ठेवूनी ॥ वाल्मीक नष्ट द्विज श्रेष्ठ होय त्रयभुवनीं ॥ ही दीन पतीता उपेक्षिसी जरि अवनीं ॥ तरि काय ब्रीद तव गाति भक्तजन वदनीं ॥चाल॥ मम सदनिं चलावें आतां, रघुविरा ॥ प्रिय बंधु लक्ष्मण संगें, साजिरा ॥ पदरजें पुनित सिद्धाश्रम करा ॥ हे विश्वोद्धारक विश्वसाक्षि विश्वात्मा ॥ श्रीराम ॥ २ ॥

दृढ भक्तीभावें मन सह काया वाचा ॥ सप्रेम पूजितां अंगीं उठ रोमांचा ॥ लावुनियां चंदन सुगंध शीतल तरुचा ॥ वर बुका लावुनी हार गळां तुळशीचा ॥ नैवेद्य अर्पितें आहुति पंच प्राणांच्या ॥ तांबूल त्रयोदशगुणी सुरंगें साचा ॥ चाल ॥ घनश्याम सुंदर तनु ही देखुनी ॥ सप्रेमें अहल्या दाटे, निज मनीं ॥ चालले वरूं जनकाची नंदिनी ॥ पदपंकाजिं गंगा ठेवी मेघश्यामा ॥ श्रीराम ॥ ३ ॥

# गाणें ६ वें, सीतास्वयंवर.

चाल—( अर्जुना मला प्राप्त हो पती. )

आवडतो मनीं वर मजप्रती । बैसले उदंड पुंड भूप झुंड मुंड त्यांत चंडकिरण तोचि रघुपती ॥ ध्रु० ॥ कोवळी तनू मदनपुतळा । पाहिले म्यां आज ऋषी-राज यांत साज करुनि माज बांधि सहज आवाळिळा॥ किरिट कुंडलें कस्तुरी टिळा । चमकतो सुरंग रंग जालें दंग गुंग चित्त रंगरुमिस फांकती कळा॥ माळ घेउनी उभि असे सती ॥ बैसले ॥ १ ॥ मैथिलाधिपें पैज घालुनी । पाहतो प्रताप बाप आणुनी कांप चाप दाप आप घालि भूप जाउनी ॥ रामरूप हें रेखिलें मनीं । मंडपांत मात करुनि बैसलासे तात संशयांत चित्त साजणी ॥ पर्वतापरी धनुष्य अंगणीं । राम सुकुमार फार हरचाप सारसार भंगणार कोण या जनीं ॥ इच्छिल्या वरा देइ भगवती ॥ बैसले ॥ २ ॥ गर्व रावणें करुनि ते क्षणीं । धनुष्यासि त्राण बाण वाण घेउनि अपमान म्लान होउनि पडे मेदिनी ॥ कलहमूळ हें बोलती मुनी । घनश्याम राम सिद्ध काम जगीं नाम करी श्याम वाम हस्त लावुनी ॥ ओढि त्र्यंबका कार्यसाधनीं । भंगिलें धनुष्य कडड तडड तडड झडड झडड लघु किंकिणी ॥ सर्व नरपती

चकित पाहती ॥ बैसले ॥ ३ ॥ देव स्वर्गींचे पुष्प वर्षती । दुर्जनास भय त्रास श्वास दानवांस भक्त दास परम हर्षती ॥ जिवीं तोषती कनक सुमती । स्वामि ते वशिष्ठ शिष्ठ ज्ञानदृष्ठ तिष्ठ इष्ट देवता सदैव स्थापिती ॥ गोविंदरावजी यश वर्णिती । साधिला त्वरा वरा तो नोवरा धरामरास लग्नसमयिं द्रव्य अर्पिती ॥ नेम नेमिला वाल्मिकें मती ॥ बैसले ॥ ४ ॥

## गाणें ७ वें, सीतास्वयंवर.

चाल–( उद्धवा शातवन कर जा. )

साजणी ग माझ्या मनिंचें । हितगुज हें ऐके बाई ॥ ध्रु० ॥ लाज काय धरणें आतां । भय लौकिक करणें कायी ॥ वेधलेंच मन हें माझें । न चळे हें दुसरे ठायीं ॥ चाल ॥ होइन रामाची दासी ॥ भावें वंदिन पायांसी ॥ स्वशिरा मी ठेविन पायीं ॥ सा० ॥ १ ॥ कां महेश-चाप चढाया । पण केला माझ्या तातें ॥ रामचंद्र ओढिल कैसा । नवपल्लवकोमल हातें ॥ चा० ॥ नवसा तुह्मि सांब शिवातें ॥ नवसारसलोचन यातें ॥ तुचले परि वरिलें अपुले ठायीं ॥ सा० ॥ २ ॥ या मनासि आला माझ्या । शरकार्मुकपाणी राजा ॥ कामनाचि दुसरी नाहीं । कृतनिश्चय झालें माजा ॥ चा० ॥ सकळां तुह्मि गाजावाजा ॥ न करा मातेस वदा जा ॥

नमितें मी तुमच्या पायीं ॥ सा० ॥ ३ ॥ पाहतांचि राघव डोळां । मन तन्मय झालें माझें ॥ लाहतांचि प्रेम विसावा । मज झाली न जगीं लाजे ॥ चा० ॥ रमतें मन देव न रामीं ॥ नमनीं नर देव नरा मी ॥ म्हणे आनंदसुताचा स्वामी ॥ सा० ॥ ४ ॥

## गाणें ८ वें, धनुष्य.

सिता नव्हे चिंता कि पडली सिता नव्हे ॥ माथूं कोणासी आतां ॥ जगदंबा माता ॥ पाव तूं ॥ जग० यश द्या मला रघुनाथा ॥ तुला मी वाहिन हो ॥ अंबे ॥ तुला मी ॥ ॥ अ० क० ॥ जनकाचा गे दूर करी पण ॥ धनुष्य उचलिल कोण ॥ शिवाचें ॥ चाप भंगिल कोण ॥ १ ॥ जनका गृहिं दाटी ॥ भूपांची ॥ जनका० ॥ आला रावण मजसाठीं ॥ धनुष्यासि कोटी ॥ चढविल्या धनुष्या० ॥ दशवदनातें ॥ भय पोटीं ॥ अभिमानी दुर्जन ॥ दिसे हा अभि० ॥ जनका० ॥ २ ॥ जनाकला घोर ॥ माझ्या॥ जन० ॥ वर नाहिंत या पृथ्वीवर ॥ लज्जित नृपवर ॥ पहाती ॥ ल० ॥ जनका बोले रघुवीर ॥ तुकडेच केले दोन ॥ धनुष्याचे ॥ तुक०॥ जनकाचा०॥३॥ आनंद जनकासी ॥ माझ्या ॥ आ० ॥ अर्पिली दाशरथी रामासी ॥ चरणाची दासी ॥ झाला ॥ च० ॥

घेउन गेले अयोध्येसी ॥ कृष्ण ह्मणे मी धन्य ॥ जगामध्यें ॥ कृ० ॥ जनका० ॥ ४ ॥

## गाणें ९ वें, सीताविरह.

चाल--( ये धांवत कृष्णाबाई, अति कनवाळे. )

मम प्राणसखे तूं एकचि जाणति सारे ॥ तव विरहा कोण निवारे ॥ हे नेत्र भुकेले निशिदिनीं तुज पाहणारे ॥ स्रवताति अश्रु जळधारें ॥ चा० ॥ निष्ठुरता सोडुन येई ॥ अति शीघ्र भेट मशिं देई ॥ हा प्राण विकल वनीं होई ॥ तुजसाठिं शोधिलीं गिरिकंदरकांतारें ॥ अ० क० ॥ कुठे लपालिस जनककुमारे ॥ हे सिते कोमलगात्रे अतिसुकुमारे ॥ कुठे ॥ १ ॥ दोर्दंड करुनि प्रताप चाप मोडियलें ॥ वल्लभे तुला वरियेलें ॥ कसें प्रेमबंधन त्वां तोडियलें ॥ आठवीत मला सोडियेलें ॥ चा० ॥ करुं काय सुचेना कांहीं ॥ विश्रांतिस्थल मशिं नाहीं ॥ हें द्वैतचि त्रिभुवन द्वाहीं ॥ मज पाहे कृपानिधे शंकर हे मदनारे ॥ कुठे ॥ २ ॥ वनिंचे द्रुम आणि पाषाण मला भ्रम झाला ॥ ह्मणुनियां कवळितों त्यांला ॥ होतात कष्ट तुजवांचुन फार जिवाला ॥ काळजी लाविली माला ॥ चा० ॥ पहिलेंच क्लेश स्थळ सुटलें ॥ ऐशांत वनीं तुज लुटिलें ॥ मज वाटे दैवचि फुटलें ॥ तव गुणगण कुठवर

अठवूं श्रम हरणारे ॥ कुठे० ॥ ३ ॥ आतां मी कुठवर पाहूं ह्मणुन पुशी डोळे ॥ आंग टाकुन धरणीं लोळे ॥ गुणसरितेचे गुण आठवुन करद्वय चोळे ॥ रव ऐकुनि मृग तो पोळे ॥ चा० ॥ दुःखविरहीं श्रीरघुनंदन ॥ वुडला तो रविकुळनंदन ॥ हे भवतोडक भवभंजन ॥ या होइल निशिदिनिं स्मरतां शुभचरणारे ॥ कुठे ॥ ४ ॥

## गाणें १० वें, सीताविरह.

चाल—( मूर्तिमंत भीति उभी० )

शोधुं कुठे शोधुं कुठे तुजसि या वनीं सिते ॥
धीर मनीं नाहिं मुळीं भेट देइ तूं सखे ॥ शोधुं ॥अ०क०॥
लपुनि बसुनि प्रीत माझि लाविसी कसास कां ॥
घनांबुवांचुनी निघेल धीर काय चातका ॥ शोधुं॥१॥
मृदुल कमलतंतु जसे पाय तुझे चालती ॥ पहावयासि येसि कां कसा विरह जाचितां ॥ शोधुं ॥ २ ॥ राम राम ह्मणुनि या वनांत हिंडतां ॥ कांत काय श्रांत तुझा होतसेल चालतां ॥ शोधुं ॥ ३ ॥
सिंह व्याघ्र हिंस्र पशू या वनांत हिंडतां ॥ नाथ काय त्रस्त तुझा होतसेल चालतां ॥ शोधुं ॥ ४ ॥
मयूर सार कोकिल हो दीन वदन दावितां ॥ करुण रुदन करुनि सखे साहुं यांस मागुता ॥ शोधुं ॥५॥

बकुल आम्र वृक्ष तुह्मी प्रिया लतांस भेटतां ॥ काष्ठि राम पाहुनी मार्ग कां न दावितां ॥ शोधुं ॥ ६ ॥ भ्रमर कमलीं येउनिया सहालि स्वैर रंजतो ॥ सूख तसें नाहिं मनीं हा विचार जाचतो ॥ शोधुं ॥ ७ ॥

## गाणें ११ वें, सीताविरह.

चाल–( नंदगृहाच्या जवळ मुलींनों दिसतो रथ दुसरा )

सीतेवांचुनी कांहि गमेना ॥ भेटीचा हा योग जमेना ॥ कमल सुमोहित चित्त रमेना ॥ कपट्यानें नेलि हिरावुनी ॥ अ० क० ॥ राम ह्मणे या समायें वनामधें ॥ त्यजुनि कुठे गेली ॥ प्रिया मम ॥ १ ॥ चंद्रप्रभा बहु तापहि देती ॥ उष्णाच्या किति लहरी येती ॥ विरहानलज्वालेला भरती ॥ बहुतचि ती आली ॥ प्रियेविण ॥ राम० ॥ २ ॥ पाहुन सीतावयव सुरंगा ॥ शुक गज हंसहि मधुर कुरंगां ॥ हंसलों तें फळ आलें अंगा ॥ मैत्री तोडियली ॥ कुणाची ॥ राम० ॥ ३ ॥ शेषशयन नारायण यावें ॥ शोकाग्नींतें त्वां विझवावें ॥ द्विपद चतुष्पद किति विनवावे ॥ इकडुनि काय गेली ॥ जानकी ॥ राम ॥४॥ अनसूयेनें घातलि वेणी ॥ तेव्हांपासुन नाहिं विंचरणी ॥ गेली कैशी मजला त्यजुनी ॥ आश्रमीं हो न्हाली ॥ अत्रीच्या ॥ राम० ॥ ५ ॥

## गाणें १२ वें, मुद्रिका पहिली.

चाल—( कशाला परवा करूं लोकाची )

मुद्रिके सांग कुठें श्रीराम ॥ सांग कुठे श्रीराम॥अ० क०॥ कांचनमृग म्यां नयनिं देखिला ॥ पाठविला घनश्याम ॥ मु०॥१॥ दुर्वचनांनीं सौमित्र विंधिला॥ हृदयिं खोचला बाण ॥ मु० ॥ २ ॥ ब्रह्मादिक सुर निशिदिनिं ध्याती ॥ भक्तां दे निजधाम ॥मु०॥३॥ लक्षुमणासह वनीं हिंडतो ॥ मम जिविंचा आराम ॥ मु० ॥ ४ ॥ गंगा तव पदसेवा वांछित ॥ पुरवि मनींचा काम ॥ मु० ॥ ५ ॥

## गाणें १३ वें, मुद्रिका दुसरी.

चाल—( उद्धवा शांतवन कर जा. )

पापिणिनें म्यां सुकुमारा पाठविलें हरिणामागें॥पूर्णानंद सौमित्रातें दुर्वाक्यें छळिलें रागें ॥ राक्षसें मजला आणिलें फळ त्याचें हें फळलें गे ॥ चाल ॥ सेवेला निशिदिनिं झटला ॥ कां मजवर देवर विटला॥अंतरला श्रीरघुराजा ॥अ० क० ॥ मुद्रिके सांग मजलागे सुखि आहे राघव माझा॥१॥कां आलिस सखे मुद्रिके सोडुनि मम प्राणविसावा॥तुजला तरि तिळभर ऐसा अंतरिं हा भाव नसावा॥रघुकुलदिप करुणासिंधू कधिं भेटेल मज रघुराजा ॥चाल॥ जन सर्व सुखाचे वाई॥

अंतर सोडिति वापाही ॥ तुजला तरि ह्मणुं मी कांहीं ॥ आलिस तूं कवण्या काजा ॥ २ ॥ भास्करकुळमणि मजवरतीं निष्ठुरपण कां तुह्मि केलें ॥ पसरितें पदर मजकडुनी अन्याय बहुतची झाले ॥ वंधांतुनि काढा ऐसें कोण त्यांस कळविल वहिलें ॥ चाल ॥ चिंतेनं काळिज झडलें ॥ ते राक्षस कोपा चढले ॥ ह्मणती मज चावा भाजा ॥मु०॥३॥ प्राणनाथ माझ्याकरितां वनिं हिंडति कीं अनवाणी॥सोशिती सर्व तापांतें उष्ण थंड वारें पाणी ॥ करि सीते सीते ऐसें वदती कीं ते दिनवाणी ॥ चाल ॥ लक्षुमण विरक्त चित्तीं ॥ कोण त्यास सुखविश्रांती ॥ देतसे मायेविण ती ॥ सुतरंग हरिसि भजा जा ॥ मुद्रिके ॥ ४ ॥

## गाणें १४ वें, मुद्रिका तिसरी.

मुद्रिके सखे तूं होतिस रामापासीं ॥ सोडिले त्वां श्रीराम कुठे वनवासी ॥ भ्रमतात वनामधिं व्याघ्र सिंह आणि लासी ॥ राक्षिलें कीं वनीं भक्षिलें राक्षसीं॥माझ्या कंचुकिसाठीं राम हिंडे लवलाही ॥ मजपासून गेले तैसे देखिले मी नाहीं ॥ अ० क० ॥ जानकी शोक करी वनीं मुद्रिके बाई ॥ सोडिले त्वां श्रीराम कोणत्या ठायीं ॥ १ ॥ मुद्रिके सखे तूं आलिस कोण्या गुणीं ॥ नाहिं पंख तुला करपते पाठविलें कोणी ॥

कां बोलसना तरि काय वर्तलें चिन्ह ॥ वनफळां जातसे श्रीराम लक्षुमण ॥ जरि तृषा लागली फार मला उष्णानं॥वनिं सोडुनी करी जिव प्राण शांत जिवनानं ॥ चालतां वनामधं फोड येतसे पायीं॥या राघवनेत्रा जळ प्रवेशा वाही॥जानकी॥२॥ मुद्रिके सखे आह्मि वना चालिलों तीघं ॥ चालवेना मजला बहुतावरेना वेग ॥ अंतरलें ह्मणुनी राम पश्चा- तसे मागं॥या कर्मभवातें सिते नको भरु रागें ॥ मज- विणें रामाला न गमे क्षणभर कांहीं॥करि सिता सिता जानकी कोठें वैदेही ॥जानकी॥३॥ वृक्षावर होता अं- जनिचा पुत्र॥हा शोक ऐकतां स्रवति कपीचे नेत्र॥मग उडी टाकिली पुढें कपीकुळमित्र॥तूं कोण कुणाचा सांग तुझें कुळगोत्र॥तूं सेवक कुणाचा नांव तरी तुज कांहीं॥ कां बोलसनारे सांग मला लवलाहीं ॥जानकी॥४॥ मारुती ह्मणे हो अंजनि माझी माता॥कपिकूळ देहाचें नांव मारुती आतां ॥ तुझ्या शोधालागीं धाडियलें आनंता॥हे राम लक्ष्मण दोघे करिति तव चिंता॥हीं अठरा पद्मं वानर मिळालीं साह्यी॥हा समुद्र उतरुनि सुवेळवरती पाही ॥ जानकी ॥ ५ ॥

## गाणें १५ वें, मुद्रिका चवथी.

चाल--( जो चिदानंद आनंदकंद त्या नंदतनय हरिला ).

रावणें, करुनि धांवणें, आणिलें ज्यानें मला येथें

॥ कशी गत घडलि तेथें ॥ श्रीराम, सुखाचें धाम, करित विश्राम, कसे वनिं ते ॥ त्यागून मला ईथे ॥ सौमित्र, मित्रकुलदीप, चित्तसम रूप, गात्र सुकुमार ॥ काननीं तिष्ठती फार ॥चाल॥ मला आणिलें राक्षसें हो रा०॥ माझ्या मागें झालें कसें ॥ हो क०॥ उभयतां होउनी पिसे ॥ हो पि०॥ पातले कोणत्या दशे ॥ कोणत्या दिशे आचरूनि ॥अ० क०॥ हा प्रबल सिंधु तरूनी॥मुद्रिके, अग करपते,अलिस तूं इथे, कसें करुनी ॥ हा प्रबल ॥ १ ॥ नीवांत, उगीच कां भ्रांत, कुठे मम कांत, कसा विचरे ॥ कीं मारिलीं किचरें ॥ मजविशीं, होउनि तापसी, किंवा संन्यासी, मठीं नटले ॥ मोह प्रपंचासि विटले॥मजमुळें, वळें दुर्बळें, त्यागिलें मला लक्षुमणें ॥ आणिलें वळें यानें ॥ चाल ॥कां न बोलसी मजप्रती ॥ हो म० ॥ सद्गदित गहिंवरे सती ॥ हो स० ॥ तें ऐकुनिया मारुती ॥ हो मा० ॥ त्या घडी, झालि गडवडी, टाकिली उडी, तरूवरुनी ॥ हा प्रबल ॥ २ ॥ सचकीत, उपजली भीत, तरिच भित भीत, नेत्र उघडी ॥ कपि घालितसे फुगडी ॥ वय लहान, वांकुडी मान, लवलवित कान, दंत विचकी ॥ पाहून नेत्र मिचकी ॥ पायीं पडे, चेंडुसा उडे, पुढें गडवडां भुमी लोळे ॥ निद उगा झांकि ॥ डोळे पुच्छासिं, खाजवी कुशी, वांकुल्या तिशीं, दाविताहे ॥ लडिवाळ

दिसे माये ।। चाल।। मग चमत्कारली सिता।।हो सिता।। तुह्मि कोण कुठे आसतां ।। हो आ० ।। कधिं देखिलें उभयतां सांगतों अतां प्रीति करुनी ।। हा प्रबल।।३।। पद शिरीं, वंदि दृढ धरी, ध्यान स्तव करी, बद्धहस्तें ।। मुखिं वदे क्षेम स्वस्ते ।। घनशाम, राम सुखधाम, क्षेम कल्याण, स्वस्ति माये।।सौमित्र संगें आहे।।हातिं चाप, घेउनि बाण, कंठाची आण. तुझ्या माये।।सुवे-ळेस येत आहे ।। रघुपती, बंधु सुमती, करिति तव ख्याति, शोध करितां।।रावणें तुला हरितां ।।चाल।। हे सदयहृदय माउले ।। हो मा०।। मम वत्साचे गाउले ।।हो गा०।।पाउलें, वंदि सुफले,पाहती भले,प्रीति करुनी ।।हा प्रबल।।४।।पंचवटी, त्यजुन शेवटीं, वनीं संकटीं, कुठे भ्रमले।।सुकुमार वहू श्रमले।। तृण शेज, करून रघु-राज, सहज ये नीज, वृक्षछाये।। मी उगा वरुनि पाहें ।। चाल ।। मज ओळखिलें श्रीवरें।। हो श्री० ।। मीं चरण धरीले बरे ।।हो व०।। मी ब्रह्मचारी दृढ त्वरें।। हो त्वरें ।। निजदास, आहे हें खरें, वनीं वीचरे, राम स्मरुनी ।। हा ।। ५ ।।

## गाणें १६ वें, मुद्रिका पांचवी.

भंगुनिया शिवधनुष्य वरिलें मला ।। ग वरि० ।। वनीं आलों उभयतां बाई कांचनी हरिण

गाहिला ॥ मनिं वाटतसे मृग ऐसा ल्यावा कांचो-
ळिला ॥ पुरवावि हौस ही माझी असें वदतां राघव
गेला॥दुर्वचनें बोलुन छळिलें लक्ष्मणशशी ॥ तें पाप
साजणी अंगिं भोगितें मि दिवसानिशीं ॥अ० क०॥
मुद्रिके राम टाकून अलिस तूं कशी॥हा वृत्तांत सांग
सखे बाइ सोडि मौन बोल तूं मसीं ॥१॥ राघवें तुला
धाडिलें मज समजलें॥मी नव्हतें साह्य ग तुतें तेव्हां
तुला कुणी फिरविलें ॥ लक्ष्मणासि छळिलें ह्मणुनी
दैवाचि फिरलें॥ देईन प्राण मी आतां वेणीदोर गळां
बांधिले॥ धावुनियां मारुती किं नमिलें तिशीं॥ ह्मणे
माते आण तुज माझी धाडिलें तुझ्या शुद्धीसी॥ मुद्रिके
॥२॥सद्गदीत जानकी मुद्रा हृदयीं धरी ॥ खरें बोल
शपथ तुज माझी कधीं भेटेल राघव तरी॥अशा दीन
वनामध्यें मुद्रे एकलि मी असें॥ लोटले दिवस आजि
साचे उदकाविण माछिलें जसे॥मुद्रिके॥३॥अमृतसुता
मनीं आनंद झाला कसा ॥ कृपाघन स्मरणीं वर्षला
लाभला शकून बरवा जसा॥श्रीरामदर्शनें प्रेमा नांदे
जसा ॥ कुठे नाहीं सुखाचा वारा हा अनुभव गुरुला
पुसा ॥ मुद्रिके० ॥ ४ ॥

## गाणें १७ वें, मुद्रिका सहावी.

सितादेवी मुद्रेशीं बोलली कोठें लक्षुमण॥त्याविण

मजला ती गत घडली हरणी पाडसाविण ॥ त्यानें चवदा वर्षें वनामधें केलें उपोषण ॥ बालक माझें कोठें गेलें सोडाया पारण ॥चाल॥त्याविण मी झालें पिशी ॥ कैसें पाडस चुकलें हरणिसी ॥ अ० क० ॥ असा कसा वनवास मजवर कोपले हरिहर ॥ किं मजवर कोपले शंकर ॥ आतां कधिं हे दृष्टी पडतिल वर माझे हे दिर ॥ १ ॥ काय सांगुं साजणी ग आतां मी गत कैसी करूं ॥ रामाविण चरण कुणाचे धरूं ॥ या दुःखसागरांत पडला जिव करितो हुरहुर ॥ जैसें उदकाविण सुके शरीर ॥ असा० ॥ २ ॥ काय सांगुं साजणी ग माझ्या दुःखाचे डोंगर ॥ राम लक्षुमण केव्हां भेटातिल मजला शिवशंकर ॥ चाल ॥ कधिं भेटेन त्या प्राणेश्वरा ॥ ऐसी धरणीवर लोळे सुंदरा ॥ असा० ॥ ३ ॥ श्रीरामाच्या करिंची मुद्रिका कां रामें टाकिलें ॥ असुन जिवाचे प्राणप्रिया कीं रामांतर पाडिलें ॥ चाल ॥ हनुमंतें जोडुन दोन्ही कर ॥ माते आहें मी तुझा किंकर ॥ सीते मम वचनिं धरावा धिर ॥ भेटेल रघुराज तुला सत्वर ॥ असा० ॥ ४ ॥

## गाणें १८ वें, मुद्रिका सातवी.

प्रभाकरा भानुभास्करा सूर्यनारायणा॥सवित्रा मित्रा

तमनाशना ॥ वासरमणी चंडांशा हिरण्यगर्भा दिन-
कारणा ॥ सहस्रकिरणा रविदिनेशा हंसगती चालणा
॥चाल॥ अगा तूं स्वयंप्रकाशा सर्वहि साक्षा तूं ॥ अगा
तूं आमचे वंशीं मूळवृक्षा तूं ॥ अरुणउदयीं येउनि
तुझ्या वनामध्यें नित्य स्तोत्र जंत्र पढे ॥ श्रीरामाविण
कष्टी करसंपुष्टीं मुद्रिका पडे ॥ ध्रु० ॥ अशोकवनीं
सीता चिंतनीं पाहे सूर्याकडे ॥ १ ॥ आराध्यदैवत
प्रसन्न होतां प्रसाद फळ लाधलें ॥ अर्घ्य करीं
अर्पितां करतळीं मुद्रेप्रती देखिलें ॥चाल॥सांग गे मुद्रे
सखये कां त्यजिलें रामाला ॥ सांग ग रजनीं असुरें
त्रास कां दिधला ॥ सांग सांग स्वामिनी माझा
त्याग कां केला ॥ कर्मगती टळेना प्राक्तनीं लिहिलें
तैसे घडे ॥ श्रीरामा ॥ २ ॥ भरताग्रजाविरहिता
शोकार्णवा जनकजा सती ॥ मजमतीं किं युद्धे समयीं
प्राणासि मुकले पती ॥ पक्षी हातिं कर नेतां आकाशि
मुद्रा पडली क्षिती ॥ चाल ॥ आतां मि कोण्या अर्थी
दुःख पाहुं हें ॥ आतां मी कोण्या कार्या देह ठेवूं हा ॥
अंग टाकी धरणीवरी तेव्हां तो वानर देखिला पुढें॥
श्रीराम ॥ ३ ॥ कळलें वायुसुता सत्य पतिव्रता
नसे अंतर ॥ निजधामा गेलियावरी स्वामिसी काय
देउं उत्तर ॥ दंडवत घाली लोटांगण जोडुनि दोन्ही
कर ॥ चाल ॥ आले रघुराज समुद्रा वेढुनी कपींचा

भार ॥ आले रघुराज समुद्रा सीते ऐके तूं ॥ गोविंद-राव कवी ह्मणे पावन करा रोकडे ॥ श्रीराम ॥४॥

## गाणें १९ वें, शबरी.

चाल—( दिनरजनि नमितें मी कुलदेवता या. )

मुनिवाक्या विश्वासुनि शांत मानसीं ॥ रामनाम-स्मरण सर्वदा अहर्निशीं॥दिधलि भेट आज कृपा केलि शबरिसी ॥ रामपुजन करुन चरणिं ठेवि मस्तका ॥ अ० क० ॥ बदरिफळें घ्या हिं प्रार्थि शवर-कन्यका ॥ कमलवदन राजीवाक्ष रघुनायका ॥ ब०॥ ॥ १ ॥ पुनित जन्म आज रामचंद्रदर्शनीं ॥ रोमांचित होय तनू रामचिंतनीं ॥ बद्धांजळि राहे उभी अश्रु लोचनीं ॥ घ्या हीं फळें घालि मुखीं त्र्यंबकांतका ॥ बद० ॥ २ ॥ घेउनि करीं वदत राम काय हीं अशीं ॥ पक्षिगणें चंचुपुटें टोंचिलीं जशीं ॥ दिसति नखांकुरेंकरुनि भेदिलीं तशीं ॥ भिल्ली ह्मणे पूर्णकाम जगच्चाळका ॥ बद० ॥ ३ ॥ भेदिलीं न पक्षिमुखें दीनवत्सला ॥आम्ल कटु क्षार अशीं भासलीं मला ॥ ह्मणुन शुद्धदंतिं चाखिलीं मि आपुल्या ॥ मधुर असति भक्षि अतां विश्वव्यापका ॥ वद०॥४॥ बघुनि भाव सदय राम तोपला मनीं ॥ हर्ष होय शांत क्षुधा उच्छिष्टभक्षणीं ॥ आत्मपदप्राप्ति दिली भक्त

भिल्लिणी ॥ चरणिं वाहे गंगा शिर दशमुखांतका ॥ वद० ९ ॥

## गाणें २० वें, चंद्रसेना.

चाल–(नंदगृहाच्या जवळ मुलींनों दिसतो रथ दुसरा.)

रामचरण लागतां कडकडे ॥ साध्वी-हृदय पाहुनी गडबडे ॥ दाशरथी मग तेथुन मुरडे ॥ आनंद बहु झाला ॥ मानसीं ॥ अ० क० ॥ मंचकभंगा करुनि प्लवंगा ॥ आनंद बहु० ॥ १ ॥ अरे मर्कटा खोट्या मेल्या ॥ घातचि केला मंचक कोरविला ॥ सचित सुखासी रघुविर आला ॥ परि नाहीं पुरला ॥ मनोरथ ॥ मंचक० ॥२॥ स्वपतिमृत्यू कथिलें तुजला ॥ दाशरथी हा सुख शरिराला ॥ वडेल पतिचा घातचि केला ॥ परि नाहीं पुरला ॥ मनोरथ ॥ मंचक ॥३॥ शापुनी भस्म करितें आतां ॥ जाळिन रविला काय तव कथा ॥ रामदास ह्मणे हरली चिंता ॥ परि नाहीं पुरला ॥ मनोरथ ॥ मंचक ॥ ४ ॥ राम ह्मणे तूं ऐके नारी ॥ पुरविन मनोरथ कृष्ण अवतारीं ॥ गोपीं-सहित राज्य तूं करी ॥ ऐसें प्रभु वदला ॥ समर्थि त्या ॥ मंचक ॥ ५ ॥

## गाणें २१ वें, चंद्रसेना दुसरी.

रुद्राव तुझें कार्य मजपाशीं घेउनी ॥ गोडुन

घेतिलें मजला वचनीं ॥ तयार केला रंगमहाल ॥ अ० क० ॥ रामा मजला ठाउक नव्हतें थोर होउनी असें फसवाल ॥ १ ॥ तूं माझी ऐसें सांगुनि मजला ॥ प्रेमांत अंतर कैसा पडला ॥ मनिं वाटे मज सुख द्याल ॥ रामा ॥ २ ॥ मम मानस हें घेउनि पहिलें ॥ अपलें कृत्रिम कां लपवीलें ॥ ही काय थोरांची चाल ॥ रामा ॥ ३ ॥ राम ह्मणे तूं ऐके वचनीं ॥ कृष्णअवतारीं करिन मी राणी ॥ संतापें होउं नको लाल ॥ चंद्रसेने ॥ संतापें होउं नको लाल ॥ रामा ॥ ४ ॥ दुष्ट हे भुंगे कोठुन आले ॥ रामसुखामधें अंतर पडलें ॥ गंगाला मोक्षपद द्याल ॥ रामा ॥ ५ ॥

## गाणें २२ वें, चंद्रसेना तिसरी.

चाल—( कुशली कीं नांदतो नाथ माझा ).

विफल हा माझा यत्न झाला ॥ येइल रघुराजा आज महाला ॥ धृ० ॥ रामपदाची करुनी आशा ॥ कारण झालें पतिच्या नाशा ॥ कपटी धिक्कार त्या वानराला ॥ वि० ॥ १ ॥ येउनि तुह्मी आज मम सदनीं ॥ आश्वासुनि मज अपुल्या वचनीं ॥ अंतीं वचनाचा भंग केला ॥ वि० ॥ २ ॥ मन्मन हरुनी सीताकांता ॥ आपुली वाणी असत्य करितां ॥ हा काय रघुकुलाचा धर्म झाला ॥ वि०॥३॥ वाटे तुह्मां

दुर्बळ स्त्री मी ॥ आपुनि भस्म करितें या सर्गी ॥ विझवी माझ्या क्रोधानलाला ॥ वि० ॥ ४ ॥ परिसुनि तिच्या संतप्त बोला ॥ दाशरथी भयचकित झाला ॥ नयनीं पाहवेना त्या सतीला ॥ वि० ॥ ५ ॥ वहु विनयानें जोडुनि पाणी ॥ रघुपति बोले मंजुळ वाणी ॥ ऐक चंद्रसेने घे वराला ॥ वि०॥६॥ कृष्णावतारीं होशिल पत्नी ॥ रथविन तव मन नाना यत्नीं ॥ रामपदीं गंगा ठेवि भाळा ॥ वि० ॥ ७ ॥

## गाणें २३ वें, रावणजानकीसंवाद.

चाल—( अर्धतनू वारुळीं बुडाली. )

लंकाभुवनीं रम्य मंदिरें पाहुनि सुर लाजती ॥ ह्मणति तुच्छ ही अमरावती ॥ राजमंदिरीं नवरत्नाचे दीप पहा लाविती ॥ कांचन अगणित वर्णूं किती ॥ शुभ्र पताका जशा तारका आकाशीं शोभती ॥ हिरकण्या कोंदणांत चमकती ॥ सुंदर उपवनिं फळपुष्पांनीं तरुवर जणुं डोलती ॥ हितगुज पवनाशीं बोलती ॥ चाल ॥ कलहंस चातकें मयूरादि नाचती ॥ विकसती कमलिनी मधुकर झेपावती ॥ याहुनी कायशी नंदनवनिंची स्थिती ॥ अशा नगरिचा स्वामि असें मी जाणे मम अंतरा ॥ संशय स्वमनीं न धरीं जरा ॥ अ० क० ॥ मग जानकिला प्राथि

दशानन जोडुनि दोन्ही करां ॥ चरणीं दास तुझ्या मी खरा ॥१॥ द्विगुणित लंका अशी अयोध्या काय सांगुं सोहळा ॥ झाली भूषण भास्करकुळा ॥ राघव नृपती असंख्य बसती सिंहासनिं निमळा ॥ ज्यांची कीर्ती दिग्मंडळा ॥ श्रीगुरु वसिष्ठ ज्याचे ऐसा राम घनःसांवळा ॥ त्याहून प्राण नव्हे वेगळा ॥ यागरक्षणा कौशिक नेतां तारि अहिल्या शिळा ॥ शिवधनु भंगुनिया अवलिला ॥ चाल ॥ भार्गवासि पायीं शरणांगत राखिलें ॥ त्राटिका सुबाहू त्रिशिरा खर मर्दिले ॥ मारिचास शरधनु घेउनिया विंधिलें ॥ ऐशा राघव वीरहरीचा भाग नेसि जंबुका ॥ शंका तुजला वाटे न का ॥ अ० क० ॥ एक रावणा नष्ट खळा तूं दावुं नको मज मुखा ॥ रघुकुलमणि मम जिविचा सखा ॥ २ ॥ जनकनंदिनी सुंदरवदने ऐके नानापरी ॥ राबती सुरवर माझ्या घरीं ॥ अष्ट दिशांचे लोकपालसह इंद्र करी चाकरी ॥ ब्रह्मा आज्ञा वंदी शिरीं ॥ भोळा शंकर प्रसन्न केला वरिली मंदोदरी ॥ हरिली यक्षपतीची पुरी ॥ ब्राह्मण कळिचा विश्रवमुनिचा सुत मी पृथ्वीवरी ॥ राज्य चौकड्या चौदा करीं ॥ चाल ॥ हा देह ठेविला तव पदकमलावरी ॥ सोडुनि दाशरथी या क्षणिं मजला वरीं ॥ मधुकरास नलिनी जेवि सुगंधित करी ॥

एकाछत्री राज्य असे जलनिधिवलयांकितधरा ॥ नाहीं मज शत्रू दुसरा ॥ मग जानकिला ॥३॥ ऐक दशमुखा कूलनाशका लज्जा तुज ना जरा ॥ नच ये अश्वमोल कधिं खरा ॥ राम सुखाचें धाम जगाचें शाम भुवनसुंदरा ॥ ज्याचे चरणीं रत इंदिरा ॥ पंकज रमवी मधुरसुवासें निशिदिनिं षट्पदवरा ॥ तेथें प्राप्ति नव्हे दर्दुरा ॥ विधिहरगौरी ध्याति जयाला भक्तजना सोयरा ॥ ज्याचा त्रयभुवनिं आसरा ॥ चाल ॥ येईल राम तो सागर उल्लंघुनी ॥ सौमित्र बंधुसह सुग्रीव वानरगणीं ॥ निर्दळील लंका सह-कुळ रणकंदनीं ॥ यापरि सीता वदे दशशिरा आठवि मनिं रघुविरा ॥ गंगा चरणीं घ्या श्रीवरा ॥ ऐक रावणा ॥ ४ ॥

## गाणें २४ वें, मंदोदरी.

चाल—( उद्धवा शांतवन कर जा. )

दशरथासि बहु जन्मींचा, पुण्याचा लाभ जहाला ॥ साक्षात विष्णुरूपानें, श्रीराम उदरीं आला ॥ सौमित्र बंधु तयाचा, शेषांश ह्मणती त्याला ॥ चाल ॥ आदिमाया सीता जननी ॥ ती कैसी आणिलि तुह्मी ॥ कुळिं तुमच्या होइल हानी ॥ हा निश्चय मनिं निर्धारा ॥ अ० क० ॥ रावणा आदिमाया ही, जानकी

द्या रघुवीरा ॥ १ ॥ श्रीराम दीनदयाळू, कनवाळू हा दिनबंधू ॥ भक्तांसि संकटीं पावे, करुणाघन करुणासिंधु ॥ पदपंकज ज्याचे हृदयीं, चिंतितां तुटे भवबंधू ॥ चाल ॥ बिभिषण हा बंधू तुमचा ॥ करि आश्रय रामपदाचा ॥ लाभला लाभ मोक्षाचा ॥ स्वानंद सुखाचा वारा ॥ रावणा० ॥ २ ॥ कुळदेव सदाशिव तुमचा, रामनाम माहिमा जाणे ॥ प्राशिलें हलाहल जेव्हां, विषकंठ झाला तेणें ॥ नामामृत वदनीं घेतां, मग शांत झाला त्यानें ॥ चाल ॥ मंदोदरि बोले पतिला ॥ सांगतें हीत अपुल्याला ॥ शरणागत रघुनाथाला ॥ व्हा चुकाल भवसंसारा ॥ रावणा० ॥ ३ ॥ रावण वदे मंदोदरिला, जाणिलें मी तव बोला ॥ श्रीरामहस्तें मृत्यू, नारदें मज कळवीला ॥ वृत्तांत सर्व मी जाणें, वाल्मीकि मुनीनें कथिला ॥ चाल ॥ जरि सहकुल मारिल मजला ॥ तरि पावेन रामपदाला ॥ जें दुर्मिळ योगिजनाला ॥ गंगाला पदिं द्या थारा ॥ रावणा ॥ ४ ॥

## गाणें २५ वें, लक्ष्मणविरह.

बंदी देव तुज काय ह्मणतिल ऐकुन ही वार्ता ॥ वाळा ऐकुन० ॥ नंदिग्रामीं भरत तुझी ही करीतसे चिंता ॥ चातकपरि वृक्षीं सिता बैसली, असेल

तुझी माता ॥ चाल ॥ मज सोडुनि एकटा वनिं या, निष्ठुर कां होसी ॥ अ० क० ॥ सांग सांग वा सुमित्रातनया मजवर कां रुससी ॥ १ ॥ तूं जरि ह्मणसी सीतेसाठीं गुंतुनिया पडसी ॥ बा० ॥ भरत-भेटिची आशा धरुनी माघारा फिरसी ॥ बा० ॥ लाज मज्ञा वाटते बालका निष्ठुर कां होसी ॥ सांग सांग ॥ २ ॥ मला वाटतें क्रोध आला तुज असेल वनिं फिरतां ॥ श्रम बहु झाले तुजसी सखया, फळें आणुनि देतां ॥ कष्ट झाले वाटतें पाडसा जासि कोण्या पंथा ॥ मज सोडुनि एकटा वनीं या निष्ठुर कां होसी ॥ सांग सांग ॥ ३ ॥ हनुमंतानें त्वरित जाउनी द्रोणाचळ आणिला ॥ बा० ॥ गुरुकृपेनें औषधि देउन बंधू उठवीला ॥ लक्ष्मण उठला आनंद झाला सर्वहि देवांला ॥ तव दासाकडे लक्ष असो कीं दाखवि चरणासी ॥ सांग सांग० ॥४॥

## गाणें २६ वें, सीतावृत्त.

जनकाची असे तनया, जानकी ह्मणति जन मजला ॥ वाढवी खेळवी प्रेमें, आनंद होत पित-याला ॥ मत्स्वयंवरालागीं, अयोध्यानृपतिसुत आ-णिला ॥ पत्रिका न पाठवितां, दशकंठ येत खळ मेला ॥ भंगुनि शिवधनुला ॥ रघुविरें ॥ भंगुनि० ॥

त्या क्षणिं मनिं मी वर वरिला ॥ अ० क० ॥ करि वृत्त कथन सीता ॥ आयके अगस्तिचि कांता ॥ होउनिया चित्ता ॥ सादर ॥ होउनिया चित्ता ॥आ० ॥१॥भार्गवास जिंकूनीया, मज घेउनि नगरीं आले ॥ आनंदें क्रमिला काळ, नकळे दिन कुणिकडे गेले ॥ सिंहासनिं बसतां राम, कैकयीस वर आठवले॥ देऊनि राज्य भरता, रघुपती वना पाठविले ॥ दंडकवनिं आले॥रघुविर॥दंडकवनिं॥ लक्ष्मणालागिं सवें आणिलें ॥ करि वृत्त० ॥ २ ॥ आह्मि पंचवटीं असतां, बैसलों होतों एकांतीं ॥ सुवर्णमृगाच्या मागें, धाडिले त्वरें दाशरथी॥चापास लावतां बाण, राक्षसें हाक दिलि भलती ॥ सौमित्रा पाठविलें, शरधनू घेउनी हातीं ॥ इतक्यामधें आला ॥ दशानन ॥ इतक्या०॥ रथावर घेउनि मज गेला ॥ करि वृत्त॥३॥ प्रियपती वनीं फिरतां, विश्रांति नसे देहाला ॥ धुंडितां मला विपिनीं, स्नेहभाव कपिशीं धरिला ॥ हनुमंत दूत करुनी, आशोकवनीं पाठविला ॥ करि शोकरहित मजला, देउनी राममुद्रेला ॥ गहिंवर मज आला ॥ त्या क्षणीं ॥गहिंवर०॥ आठवुनी रघुकुल-तिलकाला ॥ करि वृत्त० ॥ ४ ॥ मग भस्म करूनी लंका, मारुती परतला मागें ॥ वैदेही सुखरुप ऐसा, शुभ समाचार त्या सांगे ॥ बांधिला शिळेचा सेतू,

वानरगण घेउन संगें ॥ उतरुनियां सागर राम, पातले सुवेळामार्गें ॥ युद्धासी आला ॥ द्विदशभुज ॥ युद्धासी ॥ लक्ष्मणें इंद्रजीत वधिला ॥ करि वृत्त०॥५॥ रावणासि मर्दुनियां, बिभिषणा राज्य मग दिधलें ॥ आनंद होय सकळां, बंदिचे देव सोडविले ॥ पुष्पकांत बैसूनीया, रघुराज अयोध्ये वळले ॥ वाटतें आतां मजला, शुभ दीन परतुनी आले ॥ गंगा प्रभुचरणीं ॥ वाहे ॥ गंगा प्रभुचरणीं ॥ रक्षि दासि ही दीन ह्मणूनी ॥ करि वृत्त० ॥ ६ ॥

## गाणें २७ वें, लोपामुद्रा.

श्रीसरस्वतीगुण ध्यातों ॥ हरिकीर्तन गातों ॥ पापतापश्रम जातो ॥ श्रीगुरु पद ध्यातों ॥१॥ राम रंगली वाचा ॥ वर श्रीरामाचा॥लक्ष धरि श्रवणाचा॥ रामविजयाचा ॥ २ ॥ विचित्र हरिचें करणें ॥ जळिं पर्वत तरणें ॥ रावण कुंभकर्ण ॥ पावलेचि मरण ॥३॥ बिभिषण लंकेवरता ॥ स्थापुनि रघुनाथा ॥ संगें घेउनीयां सीता ॥ स्वनगरा येतां ॥ ४ ॥ पुढल्या आश्रमा येती ॥ तिथे अगस्ती ॥ सिता पुसे रघुपती ॥ इथे कुणाची वस्ती ॥ ५ ॥ स्वयें सांगतो रामा ॥ बरें पुशिलें आह्मा ॥ ऋषी अगस्ती नामा ॥ त्यांचा आश्रम ॥ ६ ॥ ऋषींमधें सिद्ध नरेंद्र ॥

नांवानें इंद्र ।। केशव करी समुद्र ।। स्त्री लोपामुद्रा ।।७।। भेटतांचि प्रसंगा ।। पुसे दक्षिण भागा ।। सर्व कथा तिशि सांगा ।। परि एकची त्यागा ।। ८ ।। सागरीं तारिल्या शिळा ।। या गोष्टी टाळा ।। मानिल हेचि कंटाळा ।। मग हंसेल बाळा ।। ९ ।। शहाणे ग मानूं शब्द ।। नाहीं गोष्ट अगाधू ।। मम कांत हे सिंधू ।। करि केशव बिंदू ।। १० ।। यासाठीं हें बरवं ।। किति मानिती सर्व ।। ऐसें न वदे बरव ।। होइल तिसी गर्व ।।११।। बोलुनि सीता रामा ।। पावले ऋषिधामा।। पाहुनि त्या आश्रमा ।। मग हरतिल श्रम ।। १२ ।। अगस्ती आडवा आला ।। भेटे रामाला ।। स्वकरें धरून नेला ।। पुसे पति आदराला ।। १३ ।। अगस्ती रामचंद्रा ।। करि चर्चा आदरा ।। सितेसि लोपा-मुद्रा ।। धरि आडव्या पदरा ।। १४ ।। स्नान भोजन सारा ।। षोडशोपचारा ।। तोषवुनी रघुविरा ।। करि आवडी आदरा ।। १५ ।। नमन करूं रघुनाथा ।। धरि हस्तकिं सीता ।। स्वयें सदनाप्रति येतां ।। बैसा क्षणभर ।। १६ ।। अगस्ती रामचंद्रा ।। करि चर्चा आदरा ।। सितेसि लोपामुद्रा ।। पुसे गृहाच्या छिद्रा ।। १७ ।। वेणीफणी तुज न्हाणें ।। काय वनांत खाणें ।। हार घातिला सुमनें ।। नाहीं सुकलें वदन ।। १८ ।। राम विरक्त अंगें ।। वागावि

मज संगें ॥ पायीं चालतां मार्गे ॥ नेइ रावण अंगें ॥ १९ ॥ कैकयीच्या वचनास ॥ घडला परदेश ॥ सोडुनी राज्यपदास ॥ आलों दक्षिण देश ॥ २० ॥ वल्कलें ग वस्त्रें बाई ॥ गृहसंगम नाहीं ॥ पातलोंचि आश्रमाही ॥ आलों ठायीं ठायीं ॥ २१ ॥ अत्रि ऋषीच्या छाया ॥ गुरुमाउलि पाया ॥ दत्तात्रय मुळ माया ॥ भेटली अनसूया ॥२२॥ राम लक्ष्मण पुजिला ॥ मग बोले मजला ॥ कृपा उपजली तिजला ॥ वनीं कोण ग तुजला ॥२३॥ वेणीफणी तुज सीते ॥ कोण करिल वनातें ॥ न्हाउं धुऊं आद-रातें ॥ घालि आपुल्या हस्तें ॥ २४ ॥ सुगंध चर्चुनि सुगळां ॥ वरि गुंफुनी कुरळा ॥ त्यावरी पुष्पमाळा ॥ करि कुंकुम निढळा ॥ २५ ॥ नानापरी उपचार ॥ अनसूया फार ॥ करून दिधला वर ॥ अक्षय शृंगार ॥२६॥ जोंवरी तुह्मां वनवास ॥ तोंवरी लेणें ऐसें ॥ फुललें त्या पुष्पांस ॥ आणि त्या वदनास ॥ २७ ॥ ऐसा हा वर तीनें ॥ दिला सतीनें ॥ निरोप घेउनी पतीनें ॥ आलों पहात वनें ॥ २८ ॥ मृगशीराश्व-वटाला ॥ आलों गंगे तटाला ॥ वसंत पंचवटीला ॥ आलों गंगे तटाला ॥ २९ ॥ मृगरूपी असतां माव ॥ वदें घेई धांव ॥ लक्ष्मणा रे धांव ॥ मी नेणें माव ॥ ३० ॥ कपटें मारुनि हाका ॥ ह्मणे बळाच्या धोका ॥

रक्षण मजला होतां ॥ जाइ उठोनि तैसा ॥ ३१ ॥ मग त्या आश्रमासी ॥ रावण संन्यासी ॥ भिक्षा वाढितां त्यासी ॥ नाहीं बुद्धी मनासी ॥ ३२ ॥ परस्त्रियेचा अभिलाष ॥ धरिला मनास ॥ ब्रह्मशाप हा त्यास ॥ करी लटकी आस ॥ ३३ ॥ रावण मजला नेतां ॥ मागें रघुनाथा ॥ अपार पडली चिंता ॥ करि उपाय पुरता ॥ ३४ ॥ रामें धाडिला शुद्धी ॥ मारुति शतबुद्धी ॥ लंका जाळुनी आधीं ॥ आखयासी वधी ॥ ३५ ॥ आखयासी जो वधिला ॥ जटायु उद्धरिला ॥ वाळी निर्दाळीला॥सुग्रीव राज्यपदाला ॥ ३६ ॥ अठरा वीर कपिराजे ॥ रघुराज विराजे ॥ दळवानर हें साजे ॥ अति पर्वत गाजे ॥ ३७ ॥ अठरा वीर कपिमेळा ॥ करि आज्ञा नळा॥ सागरें तारुनी शिळा ॥ घेतली सुवेळा ॥ ३८ ॥ रामें वर्जिलें असतां ॥ न तरे शिळा सेता ॥ हास्य करी ऋषिकांता ॥ मनिं चमके सीता ॥३९॥ सांगितलें रघुविरें ॥ हें कथिलें सारें ॥ मजला भरलें वारें ॥ कशानें निवारे ॥४०॥ कळतांच बाई अशाला॥ शिविनात विषाला ॥ विवेक लावी मशाला ॥ हसतसे कशाला ॥ ४१ ॥ ऐके लोपामुद्रा ॥ वीरयोग कपींद्रा ॥ शोषुनि सप्तसमुद्रां ॥ तळीं पाडिति छिद्रा ॥ ४२ ॥ वानर हरिचे मैत्र ॥ सर्वज्ञ पवित्र ॥

जाणुनि हें ऋषिसूत्र ॥ न स्पर्शति पात्र ॥४३॥ रावण कुंभकर्ण ॥ ठाव दिधला सैन्य ॥ स्थापुनिया बिभिषण ॥ मज आणिलें जाण ॥४४॥ सिता सती चतुर॥ समयास उत्तर ॥ गर्व हराया फार ॥ जाणे रघुवीर ॥४५॥ गर्व हराया युक्ती ॥ जाणे रघुपती ॥ निरोप घेउनि रघुपती ॥ स्वनगरा येती ॥ ४६ ॥

## गाणें २८ वें, सीतास्वयंवर.

चाल—( उद्धवा शांतवन कर जा. )

आयके अये अनसूये ॥ मज वरिलें श्रीरघुरायें ॥ अ० क० ॥ ब्रह्मनिष्ठ मिथिलाधिपती, जनकाव्हय राजा सुकृती ॥ व्यासयाज्ञवल्क्यप्रभृती, मुनिजन यद्गुणगण गाती ॥ तो स्वयें एकदां नृपती, करूं इच्छी अध्वरावितती ॥चाल॥ शुद्ध्यर्थ भूमि नांगरितां॥ लाभलें मि त्या शुभनिरता ॥ मानुनियां मज निज दुहिता ॥ पाळिलें नृपें सदुपायें ॥ आयके ॥१॥ जो कोणी वीर प्रतापी, गुण चढविल या शिवचापीं ॥ तो देव असो अथवापी, दानव वा मानव पापी ॥ ही कन्या त्या गुणवापी, देइन हें वचन नभा पी ॥चाल॥ पण दारुण ऐसा करुनी ॥ मनिं धैर्यशिलोच्चय धरुनी ॥ श्रीहरिचे चरण स्मरूनी ॥ मांडिलें स्वयंवर न्यायें ॥ आयके० ॥२ ॥ भूमंडळिं लिहिलीं

पत्रं, मिळविलें सकळ कुळ गोत्र ॥ सोयरे आप्तजन मित्र, धांवले वीर नृपपुत्र ॥ ऋषिमंडळ परम पवित्र, पातले पहाया चित्र ॥ चाल ॥ नव मणिमय मंडप साजे ॥ संपूर्ण मिळाले राजे ॥ नभिं गंभिर दुंदुभि वाजे ॥ गणिकाजन मंजुळ गाये ॥ आयके० ॥ ३ ॥ इतक्यांत अला ग वाइ मेला, दशवदन शैलसा ठेला ॥ सकळांस त्रास उदेला, त्यानं गर्ववाद बहु केला ॥ मग दावित भुजलीलेला, शिवकार्मुकसन्निध गेला ॥ चाल ॥ निज वाहुवळें वहु कढला ॥ परि नाहिं चापिं गुण चढला ॥ शेवटीं उरीं धनु पडला ॥ अंबिका दयेचे छाये ॥ आयके०॥४॥ भयचकित सर्व मग नृपती, कोणिही मुख न वर करिती ॥ प्रार्थितां करुनियां विनती, हूं ह्मणतां कोणि न उठती ॥ हें पूज्य अह्मां धनु ह्मणती, कर जोडुन दुरुनच नमिती ॥ चाल॥ तंव गर्जे मदुपाध्याय ॥ निर्वीर भूमि आजि काय ॥ शेवटा केंवि पण जाय ॥ ऋषिमंडळिं मग तो पाहे ॥ आयके० ॥५॥ रघुसिंहशाव मग उठला, वीरश्रीविभवें नटला ॥ गुरुकृपादृगमृतें भिजला, क्षण सस्मित पाहुन मजला ॥ ठेवुनिया गुरुपदिं निटिला, ऋषिसंघ सर्व नमियेला ॥ चाल॥ सावरुनी कुंतलजाला ॥ कटिं कशिला दृढ मृगछाला ॥ शिवचापासन्निध आला ॥ विप्राशीर्वाद मग साहे ॥

आयके० ॥ ६ ॥ नवपल्लवकोमल हातें, उचलुनियां शिवचपातें ॥ दृष्टिचें न लवतां पातें, चढविलें चापिं सीतातें ॥ ओढितां सहज भंगातें, पावलें लाज भूतातें ॥ चा० ॥ वर्षती देव कुसुमांला ॥ मी अर्पियली वरमाला ॥ वंदितां पादपद्माला ॥ आनंद मानसिं न माये ॥ आयके ॥ ७ ॥ धाडुनियां रथ गज वाजी, आणिले त्वरें मामाजी ॥ सौवर्ण मंडपा- माजी, विप्रब्रह्मक्षत्रसमाजीं ॥ जनकराय अध्वर- याजी, राघवा यथाविधि पूजी ॥ चाल ॥ रोमांच- कंचुकें सजला ॥ स्रवदश्रुनिर्झरें भिजला ॥ राघवा अर्पिलें मजला ॥ जलसहित कनकसमुदायें ॥ आयके ॥ ८ ॥ द्विजभक्ति दक्षिणा मोठी, मोत्यांनीं भरल्या ओटी ॥ खेळलों हळद फळगोटी, सहभोजन विडिया ओटी ॥ नामग्रहिं कौतुक पोटीं, किति सांगुं सोहळे कोटी ॥ चाल ॥ प्रभु पंत-विठ्ठल-स्वामी ॥ जो नित्य निरत निजधामीं ॥ होउनियां स्यंदनगामी ॥ मज- सहित स्वपुरा जाये ॥ आयके अये अनसूये ॥ मज वरिलें श्रीरघुरायें ॥ ९ ॥

## गाणें २९ वें, राम.

कपटवेष धरुनि मला नेलें रावणें ॥ त्याहि वेळे नाहिं कुणी केलें धावणें ॥ सुवेळेशि येउन म...

पाहिलें उणें ॥ येउन कठिण मन केलें आज मज-त्वरी ॥अ० क०॥ रामचंद्र नाहिं घरीं काय मी करूं॥ अशामध्यें किती तरी धीर मी धरूं ॥ राम० ॥ १ ॥ येउनि मज दोन मास लोटले जरी ॥ राम माझा प्राणसखा काय हा करी ॥ मजविणे प्रीय नसे त्यासि दुसरी ॥ पंचप्राण क्षीण होति किती आवरूं॥राम॥२॥ माझें वृत्त जाउनि त्यासि सांगा हो कुणी ॥ जाउनि भुवनिं त्वरित त्यासि आणवा कुणी ॥ समय मोठा कठिण आला नाहिं पावरूं ॥ राम० ॥ ३ ॥ निशिदिनिं मज चैन नसे ध्यास लागला ॥ हर्षयुक्त झालि सिता राम भेटला ॥ आनंदाचा दिवस सखे आज वाटला ॥ अखंडीत ध्यान धरुनि पाय मनिं धरूं ॥ राम० ॥ ४ ॥

## गाणें ३० वें, राम०

आधीं चुकलों मुकलों मी निज वेद स्वाध्याया ॥ कर्मे श्रौत स्मार्त न घडलीं सद्गति साधाया ॥ पुराण परिसुनि सादर झालों यशहि न तव गाया ॥ स्वस्थ-पणें कधिं नाहिं फावलें तुजला पूजाया ॥अ०क०॥ उत्तम जन्मा येउन रामा गेलों मी वांया ॥ तव पद-सेवा किमपि न घडली जन्ममरण चुकवाया ॥ उत्तम० ॥१॥ आर्जविलें बहु लवणभंजनें व्याह्या जावाया ॥

क्षुधित अतिथि कधिं नाहिं घेतला प्रेमें जेवाया ॥ उदार
कर कधिं नाहीं केला पैसा एक द्याया ॥ नाम फुकाचें
तेंहि न आलें स्वामी वदना या ॥ उत्तम० ॥ २ ॥
कपट करुनिया निपट भोंदिल्या बहुत आया बाया॥
केली धन गृह क्षेत्र स्त्री पशु शिशुवर बहु माया ॥
नित्य सजविली वसन भूषणें निंद्या ही काया॥ सिद्ध
ठेविली सदाहि रसना सज्जन निंदाया ॥उत्तम०॥३॥
वटवट निशिदिनिं केलि चहुंकडे मन हें रमवाया ॥
केलें स्नान न संध्या जपतप दुष्कृत शमवाया॥क्षणहि
न केला साधुसमागम भवदव निववाया ॥ सद्यःकामुक
झालों देखुनि परधन परजाया ॥ उत्तम० ॥ ४ ॥
नाहीं विद्या कला कुशलता तुजला रिझवाया ॥
शुद्ध मधुर ही वाणी नाहीं प्रभुला विनवाया ॥
बुद्धी नाहीं न कळे कांहीं शरणागत व्हाया ॥ थकलि
मजऊ ही सर्व दयाळा स्वहित आचराया ॥
॥उतम०॥५॥ हरि कनवाळू कारि दीनावरि करुणेची
छाया ॥ निगम-नगारा गर्जे ऐसा अखिलां कळ-
वाया ॥ यावरि विश्वासुनियां आलों जवळ तुझ्या
पाया ॥ शुद्ध दगड हा पंत विठ्ठल स्वामी रघुराय
॥ उत्तम० ॥ ६ ॥


## गाणें ३१ वें. रामलवांकुशसंवाद.

चाल—( अर्धतनू वारुळीं बुडाली ).

ह्मणे जानकीनाथ, शिशू हो, सांगा तुमचा पिता ॥ जननीनाम कुळ गोत्र तत्त्वतां ॥ आहां ऋषिंचे शिष्य पुत्र कीं एकोदर उभयतां ॥ तुह्मांला कोण गुरू शिकविता ॥ चाल ॥ देतसें राज्य हें तुह्मां, हो तुह्मां ॥ मागावें अपेक्षित आम्हां, हो आम्हां ॥ यावरी समरीं न श्रमा, हो श्रमा ॥ बैसुनिया निजरथीं चलावें मम सदनीं बालका ॥अ०क०॥ ऐकतां सुख उपजे भाविका ॥ वर्णावा किति जानकीतनय-संवाद परिसा निका ॥ ऐकतां ॥ १ ॥ देती उत्तर आह्मां नसे मनिं विभवाची वासना ॥ पुरवूं आह्मि तुमची मनकामना ॥ भोगी ही संपत्ति तुझी तूं अमर नरेंद्रा दिना ॥ त्यजिली अन्यायें विमलांगना ॥ दारासुत विरहित आवडलें राज्य कसें तव मना ॥ आतां करि समरिं आह्मां सामना ॥चाल॥ राहिली कीर्ति अजवरी, हो अजवरी ॥ आह्मि नव्हतों जंव भूवरी, हो भूवरी ॥ निज गर्व सर्व आवरी, हो आवरी ॥ जिंकुनि गजरथ तुरंग समरीं गाजवुं आपुला शिक्का ॥ ऐकतां ॥ २ ॥ ऐकुनि उपहासास्पद वाणी नाणि मनीं रघुपती ॥ होय संतोष दावी प्रिती ॥ पाहुनि ऐसें नवल वदति ते राघवासि सुत

प्रिती ॥ निमाली अशि कां तव वीरमती ॥ कळि-काळांतक हे भुज असतां या समयीं कांपती ॥ आतां आह्मी काय करावी गती ॥चाल॥ ह्मणे राम अहा सुकुमारा, हो सुकुमारा ॥ मज मारवेना लेकरा, हो लेकरा ॥ घेइना अपेश या करा, हो करा ॥ ऐकुनिया तें वचन सर्वही पिटिती करतालिका ॥ ऐकतां ॥३॥ पुससी सोडुनि युद्ध आह्मां कुल ऐक सांगतों तुला ॥ रविवंश असे आपुला ॥ सुरसरितासम जननि जानकी उदरिं जन्म घेतला ॥ सूड घ्यावया धरुन हेतुला ॥ गमला मज तव विक्रम बांधुनि उदधीवर सेतुला ॥ मारिलें रावणकुल वाळिला ॥ चाल॥ हें घडे शक्तिच्या बळें, हो बळें ॥ असें वदती आवळे जावळे, हो जावळे ॥ तंव सूर्योदय मावळे, हो मावळे ॥ दावा अपुली समूळ विद्या आमुचे तुळणीं तुका ॥ वंदूं मग दास होउनि पादुका ॥ ऐकतां ॥४॥

## गाणें ३२ वें, मारुती.



कटि कसुनि लाल लंगोटि भाळिं शेंदुर ॥ भाळिं शें०॥ हातावर द्रोणागिर ॥ हातिं गदा घेऊन गंभीर

चाले सत्वर ॥ चाले स० ॥ भरतानें मारिला तीर॥ पडे धरणिला महावीर लागतां शर ॥ लागतां शर॥ मुखिं वदे राम रघुवीर ॥ इतकें ऐकून भरत पातला कपी समोर ॥ कपी स० ॥ नेत्रांतुन वाहे नीर ॥ तूं कोण कुणाचा असिसि सांग सत्वर ॥ सांग स० ॥ कपटासि करुनिया दूर ॥ तुला माझि काय गरज तूं रे कोणाचा ॥ तूं रे को०॥घातकी परम रामाचा ॥ अ० क० ॥ अंजनीपुत्र मारुती तनय पवनाचा ॥ तनय प० ॥ अत्यंत भक्त रामाचा ॥ १ ॥ लक्ष्मणा लागली शक्ति झाला मूर्च्छित ॥ झाला मू० ॥ त्यासाठीं मी जातों त्वरित ॥ संजीवनिसाठीं त्वरें नेतों पर्वत ॥ नेतों प० ॥ तूं केला आमुचा घात ॥ दोन घटकेनें आतां होइल प्रभात ॥ होइल प्र० ॥ मग होइल त्याचा देहांत ॥ जाण्याचि शक्ति रे नाहिं माझ्या देहांत ॥ माझ्या दे० ॥ अतिशय दुःख वा होत ॥ घाबरूं नको ये बैस अग्रिं तीराच्या ॥ अग्रिं ती०॥पोंचवितों समिप रामाच्या ॥ अंजनीपुत्र ॥ २ ॥ गर्वरहित होउनी मारुती नमुन भरताला ॥ नमुन भ० ॥ वरदान द्यावें आह्मांला ॥ तव कृपें करुन भेटेन त्वरें रामाला ॥ त्वरें रा० ॥ प्रति-वचन द्यावें आह्मांला ॥ भरताचि आज्ञा घेऊन कपी निघाला ॥ कपी नि० ॥ आठवी मनीं रामाला ॥

वानरें शुद्धि पाहुनी सूर्योदय झाला ॥ सूर्यो०॥सांगती जाउनि रामाला॥कोपायमान रघुवीर शर काढीला ॥ शर का० ॥ कुळघातकी ह्मणे हा आला ॥ सोडोनि पूर्व उगवला अन्य दिशेला ॥ अन्य दि० ॥ मारीन ह्मणे सूर्याला ॥ सूषेण ह्मणे महाराज उदय हा गिरिचा ॥ उदय हा० ॥ आला घेउनि तनय पवनाचा ॥ अंजनीपुत्र ॥ ३ ॥ उतरून त्वरें मारुती धरणिवर आला ॥ धरणि० ॥ सन्नीध उभा राहीला ॥ सूषेण वैद्य चढुनियां गिरीवर गेला ॥ गिरीवर० ॥ सुगंध वल्लिचा सुटला ॥ काढून त्वरित घेतलें तया वल्लीला ॥ तया व०॥ वाटून चुराडा केला॥ काढून रस चालला समिप रामाच्या ॥ समिप रा०॥ लावून मुखीं क्षताच्या ॥ अंजनीपुत्र ॥ ४ ॥ काढून रस सत्वर पात्रिं भरियेला ॥ पात्रिं भ० ॥ आणून मुखीं लावीला ॥ रघुवीर ह्मणे मारुती पराक्रम केला॥ पराक्रम के० ॥ निद्रिस्थ वीर जागविला ॥ सुरवर सुमन वर्षती हर्ष बहु झाला ॥ हर्ष बहु० ॥ काय वर्णुं मी त्या समयाला॥गोविंदें श्रीधरमुखें ख्याल वर्णिला॥ ख्याल व० ॥ कविमधें श्रेष्ठ मानवला ॥ हें कवित्व करण्यामधें वर रामाचा ॥ वर रा० ॥ भरंवसा एकदंताचा ॥ अंजनीपुत्र ॥ ५ ॥

# गाणीं कृष्णाचीं.



## गाणें १ लें, गवळण.

कशी जाऊं मी वृंदावना ॥ मुरली वाजवितो कान्हा ॥ धृ० ॥ पैल तिरीं हरि वाजवि मुरली ॥ नदी भरली यमुना ॥ कशी० ॥ १ ॥ कासे पितां-बर केशरी टिळक ॥ कुंडल शोभे काना ॥ कशी० ॥ २ ॥ काय करूं कोणास सांगूं ॥ नामाची सांगड आणा ॥ कशी० ॥ ३ ॥ नंदाच्या हरिनें कौतुक केलें ॥ जाणे अंतरिंच्या खुणा ॥ कशी० ॥ ४ ॥ एका जनार्दनीं मनीं ह्मणा ॥ देवमाहात्म्य न कळे कोणा ॥ कशी० ॥ ५ ॥

## गाणें २ रें, गवळण.

जाउं दे रे जाउं दे रे कमलनयना ॥धृ०॥ अरे कृष्णा तुझी मुरली देखिली मी आज रे ॥ यमुनेच्या वाटें जातां दृष्टी पडली सहज रे ॥ कुंजवनामध्यें कान्हा छळिसी कां मज रे ॥ जातें शुद्ध पंथें कृष्णा आडविशी

कान्हा ॥ जाउं दे रे०॥१॥ घरीं द्वैतसासऱ्याचा जाच तो न साहे ॥ गृहीं मोठी सासू क्रूरदृष्टी मज पाहे ॥ पती माझा येतो क्रोध जीव माझा जाये ॥ दावी शुद्ध पंथा कृष्णा आतां मज कान्हा ॥ जाउं दे रे ॥ २ ॥ घरीं जाच दारीं जाच तुझा पुरवला ॥ दोहींपरिस आणि तिसरा मुरलीचा झाला ॥ देह-भान गेलें ह्मणुनी देहभाव गेला ॥ ह्मणुनी जीव आवरण्याला जाउं दे रे कान्हा ॥ जाउं दे रे ॥ ३ ॥ आतां मी कैसा करूं उपाय हा याला ॥ घडोघडी माझी अब्रू घेउं हा लागला ॥ जातें यमुनेच्या वाटे आडवितो मला ॥ माझें पातिव्रत्य सारें तुझ्या पायीं कान्हा ॥ जाउं दे रे ॥४॥ तुजविणें मज संसार झाला पाठमोरा ॥ तुझ्या मुरलीनें माझा बुडविला थारा ॥ तिच्या नादें ऐसें वाटे व्यर्थ हा पसारा ॥ एका जनार्दनीं झाल्या साऱ्या येरझारा ॥ जाउं दे रे०॥५॥

## गाणें ३ रें, गवळण.

नवयौवन मी कुलवधू नेटकी ॥ हरी हा बहुत उद्दाम ॥ कैशी जाऊं कुंजवनीं ॥ आहे मेघश्याम ॥ कशा० ॥१॥ गोरस घेउनि मथुरेसी जातां आडवुनी मागेल दाम ॥ कैशी०॥२॥ निबिडतरूतळीं येउनि वसतो न तया दुसरें काम ॥ कैशी० ॥ ३ ॥

# गाणें ४ थें, गवळण *

नार गवळ्याची निघाली ॥ हातीं घागर सोन्याची रे जडिताची ॥ वरि चुंबळ मोत्याची ॥ जशि पद्मिण इंद्राची रे स्वर्गींची ॥चाल॥ हांसत ज्योती दंतांची ॥ जशि प्रभा फांके चंद्राची ॥ बहु विशालता नयनाची॥बाळ नंदाच्या गोपिला रे धर हिला ॥अ०क०॥ आतां सोड सख्या घननिळा ॥ मला जाऊं दे पाण्याला रे यमुनेला ॥ १ ॥ हें बरें नव्हे चक्रपाणी ॥ रिति रांजण माथाणि रे नाहीं पाणी ॥ सासु स्वयंपाक करुनी ॥ पति आला नाहीं ह्मणुनी रे या क्षणीं ॥ चाल ॥ वाट पहाते अजुनी ॥ कां येईना ह्मणुनी ॥ आतां मारील आह्मांला रे दोघांला ॥ आतां ॥२॥ कृष्ण पदरासी झोंबती ॥ धरी मोहनमाळा हातीं रे यदुपती ॥ येई गवळण काकुळती ॥ बोले श्रीकृष्णा सांगाती रे तेव्हां ती ॥ चाल ॥ ह्मणे कोठुन येना पती ॥ खुण सांगतें श्रीपती ॥ एकांत पाहे त्या वेळा रे गोपाळा ॥ आतां० ॥ ३ ॥ इतकीं वचनें ऐकुनी ॥ दिलि गवळण सोडुनी रे पद्मिणी ॥ गेली घागर भरुनी ॥ भली ठकविली ह्मणुनी रे जाणुनी ॥चाल॥

---

* हीं फुली ज्या गाण्यावर आहे, तें गाणें फेरावर देखील सांगतां येतें

गदगदां हांसे नारायण ॥ आज दीनाचा सूदिन ॥ पांडुरंग वंदी चरण ॥ कोण गाति हरीची लीला रे कनवाळा ॥ आतां सोड ॥ ४ ॥

## गाणें ५ वें, गवळण.

वृंदावनांतुनी गोरस घेउनी ॥ जाऊं दे शाम-तमाला रे ॥ धृ० ॥ गोरसघट हरि भरुन घेउनी ॥ पाजिसी गोपमुलांला रे कान्हा ॥ यामाजी काय ये तुझ्या करीं ॥ येइल ते रिती करी घाला ॥वृं०॥१॥ आह्मी व्रजललना सासुरवासी ॥ सोडि सोडि पद-राला रे कान्हा ॥ जरी मम गृहीं समजे तरी मजला ॥ त्यजिती हे गोपमुला रे कान्हा ॥ वृं० ॥ २ ॥ कुलवधु मी पतिवांचुन दुसरे न गणी मी इतराला रे कान्हा ॥ तूं तरि येउनि अंगा झोंबसि ॥ येउ-नियां निकराला ॥ वृं० ॥ ३ ॥ जयराम जयजय अंकित विभु स्मरतां ॥ सोडी सोडी पदराला रे कान्हा ॥ शरण आलें तुज कृपें मुक्त करि चरणीं ठेवितें भाला रे ॥ वृं० ॥ ४ ॥

## गाणें ६ वें, गवळण.

वाजवी वेणू मुखें जगजेठी ॥ मार्गे मिळाल्या गौळणी दाटी ॥ जातो तयाची चपलता मोठी ॥

ह्यांत कशी सरसावूं ॥ अ० क० ॥ केवी जाऊं बा हरी शाम मुरारी ॥ कैसें शिरीं यमुनाजल वाहूं ॥ केवी ॥१॥ किती मी शिकवूं नंदकिशोरा ॥ न्यून पडलें कांहीं घरसंसारा ॥ गांजिती पदोपदीं दीर जाऊ ॥ केवी ॥ २ ॥ किती मी शिकवूं या श्रीधरासी ॥ गांजिल सासू मजला घरासी ॥ कैशी तिला समजावूं ॥ केवी ॥ ३ ॥ हा नटनाटकी गौळी भला ग ॥ मुखीं रामचंद्र सख्यांनों स्मरा ग ॥ तल्लीन हरिपदीं राहूं ॥ केवी ॥ ४ ॥

## गाणें ७ वें, गवळण. *

हा नटनाटकी नंदकन्हय्या चेंडु आह्मावर मारी ॥ भारी ग ॥ अ० क० ॥ कशि जाऊं मि यमुने तिरीं मार्गि उभा श्रीहरी ॥ हरि ग ॥ कशि ॥ १ ॥ भर तिनसांजा आडवित मार्गं ॥ धाक पतीचा भारी ॥ भारि ग ॥ कशि ॥ २ ॥ सांग सखे तूं याला कर जोडुनी ॥ आडवितो कंसारी ॥ हरी ग० ॥ कशि ॥ ३ ॥ यमुनातीरीं क्रीडत असतां ॥ चिर ने कळंबावरी ॥ वरी ग० ॥ कशी ॥ ४ ॥

## गाणें ८ वें, गवळण.

जो अनंत ब्रह्मांडें व्यापून अंतरीं बाहेर जो फिरतो ॥ जो लीलातनु धरितो ॥ जो क्रीडाकौतुकें

बाळचरित्रें नानापरि करितो॥मनमोहन श्रीहरि तो ॥ चाल ॥ झाला जो नंदकुमार ॥अहो कु०॥ जो शेषशायि सुकुमार ॥सुकु०॥ ज्या ध्यातो जगाचा पिता महेशादिक वंदिति ज्याला ॥ अ० कु० ॥ गोपिंनीं कुंभिं धरिला ॥ जो चिदानंद आनंदकंद त्या नंदतनय हरिला ॥ गोपिंनीं० ॥१॥ जंव कवाड लावुन गेली गवळण कालिंदीजीवना ॥ तेव्हां पावले मधुसूदन ॥ तो सजण येउनी भक्षी घृतकुंभ लावि वदना ॥ तों आली इंदुवदना ॥ चाल ॥ ती ह्मणे चोरट्या हरी ॥ अरे हरी ॥ तुज शिक्षा लाविन बरी ॥ अरे बरी॥जी गवळण धरूं धांवली सत्वर तिच्या घटीं शिरला ॥ गोपिंनीं ॥ २ ॥ दृढ बंधन करुनी घटा शिरीं घेऊनी निघाली ॥ मथुरे हाटा आली ॥ ह्मणे कोणी घ्या गे कृष्ण आळोआळीं विदीं फिरती झाली॥ चहूं वाटा उभी ठेली ॥चाल॥ भुमि उतरुनिया घागरी॥ घागरी ॥ पहात्या झाल्या नरनारी ॥ घटिं चिमणासा श्रीहरी ॥ श्रीहरी ॥ गोपिंनीं० ॥ ३ ॥ जों घटांतुन काढिते कृष्ण तों कुंभीं दुजा आहे ॥ आश्चर्य गोपिला होये ॥ जों दुजा काढि तों तिजा आश सहस्र संख्या देखा ॥ पाहतांना थकली लोक॥ चाल॥घटिं सुंदर मेघश्याम ॥ अहो श्याम ॥ जो मन-

मोहन मनविराम ॥ मनवि० ॥ जो मनमोहन नाटकी परम चेटकी तिनें विकिला ॥ गोपिनीं० ॥ ४ ॥

## गाणें ९ वें, गवळण.

वेडि मि झालें या हरिचे पायीं ॥ सर्वसंग पती त्यजिला ॥ अ० क० ॥ सये कोणि न्या ग वृंदावनिं मजला ॥ १ ॥ निद्रेमध्यें ऐकुन मुरली ॥ जिव हा गजबजला ॥ सये ॥ २॥ डोळे भरुन कधिं पाहिन मूर्ती॥सांवळी सुरत छबी सजला ॥सये॥३॥ऐक सये हा हृदयांतरिं मी॥भावें करुन प्रभु पुजिला॥सये॥४॥

## गाणें १० वें, गवळण.

चाल—( याचा वदनशशि माझी मति गुंगवी )

हरिचा मधुरध्वनि ऐकुन कुंजवनांत ॥ चला गडे पाहुं कमलानाथ ॥ अ० क० ॥ अंबर पिवळा कटीं मेखळा ॥ कदंबतरुतळिं शांत ॥ चला गडे० ॥ १ ॥ सगुण सांवळी अधरीं मुरली ॥ शोभत दोन्हि करांत ॥ चला० ॥ २ ॥ सरळ नासिका सुहास्यवदन ॥ स्वरूप जसें रतिकांत ॥ चला० ॥ ३ ॥ शामसुंदर मदनमनोहर ॥ ध्यान ठसे हृदयांत ॥ चला० ॥४॥ गंगाजलसम गंगा सुमनें ॥ वंदित लक्ष्मीकांत ॥ चला० ॥ ५ ॥

## गाणें ११ वें, गवळण.

यमुनातटिं वृंदावनिं खेळे ॥ गोपमुलांसह रात्र-दिवा ॥ मधुर मधुर मुरलीरव करितो ॥ परि न दिसे तो मेघ नवा ॥अ० क०॥ श्रीहरि तो नयनीं पाहिन केधवां ॥ मन्मथसुंदर कांत युवा ॥ श्री० ॥ १ ॥ आसनिं भोजनिं शयनीं पानीं कृष्ण सखा नयनीं भरवा ॥ कपटि सवत ही मुरली सांगे ॥ काय करूं भुलवीत जिवा ॥ श्रीहरि तो नयनीं ॥ २ ॥ दर्शन देणें नाहीं जरि तुज भेट यमाची ती करावा ॥ फुकट निकट आणा ह्या केश्या ॥ काय करूं हे वेणुधवा ॥ श्रीहरि तो० ॥ ३ ॥

## गाणें १२ वें, गवळण.

चाल—( जाऊं दे हे मम प्राणप्रिया. )

हें काय करिशी कमलाक्षा तूं ॥ जातें मी मथुरा-पुरीं ॥ मनमोहना ॥ जातें मी ॥ अ० क० ॥ राधा गवळण बोले मुकुंदा ॥ सोडी पदरासी हरी ॥ १ ॥ गोरस तुजला गृहिं न मिळे कां ॥ अडविशि मार्गो-वरी ॥ मनमोहना ॥ अड०॥राधा गवळण०॥२॥भलत्या सलत्या चेष्टा करिसी ॥ गोष्ट ही नाहीं बरी ॥ मन० ॥ गोष्ट० ॥ राधा गवळण० ॥ ३ ॥ वेणूरव हा ऐकुनि स्मर दे ॥ ताप रवीच्या परी ॥ मन० ॥

ताप ॥ राधा० ॥ ४ ॥ परतुनि गवळण आलि अुल्या घरिं ॥ प्रभुपद गंगावरी ॥ निशिदिनिं ॥ प्रभुपद० ॥ राधा गवळण० ॥ ५ ॥

## गाणें १३ वें, गवळण.

चाल—( राधे तुला पुसतो घोंगडीवाला. )

वाजवी मुरली आधरीं॥कटीं पीतांबर जरतारी ॥ कस्तुरी लाविली भाळीं ॥ अ० क० ॥ वृंदावनिं कृष्ण उभा कंसारी ॥ राधा गवळण बोलली ॥ वृं० ॥१॥ सुंदर श्याम श्रीरंग ॥ अंगीं उटी केशरी गंध ॥ जशी शशिप्रभा फांकली ॥ वृंदावनिं० ॥ २ ॥ हरि आनंदाचा कंद ॥ राधेसि लागला छंद ॥ गोपिं-सहित वेगें चालली ॥ वृंदावनिं० ॥ ३ ॥ विसरली सर्व देहभान ॥ कृष्णाचें लागलें ध्यान ॥ नंदनंदना-सन्निध आली ॥ वृंदावनिं० ॥ ४ ॥ हरिसंगें खेळते रास ॥ झाली संसारीं उदास ॥ चित्तवृत्ती कृष्णमय झाली ॥ वृंदावनिं० ॥ ५ दीनदयाळा लक्ष्मीवरा ॥ श्रीधरा भक्तवत्सला ॥ कृपादृष्टी गंगावरी करी ॥ वृंदावनिं० ॥ ६ ॥

## गाणें १४ वें, गवळण.

चाल—( वृंदावनीं कृष्ण उभा कंसारीं. )

तुह्मी गोकुळींचे मुरारी॥ घ्या दही दूध नका करूं

चोरी ॥ या गोष्टिनें जिव त्रासला ॥ अ० क० ॥ राधे तुला पुसतो घोंगडीवाला ॥ नित्य करी येः-झारा ॥ राधे० ॥ १ ॥ एके गौळणिनें गर्व केला ॥ कृष्ण तिच्या मंदिरीं गेला ॥ वेणी दाढीसि गांठ देऊन आला ॥ राधे० ॥ २ ॥ गोपी गेल्या होत्या स्नानासी ॥ वस्त्र बांधितो कळंबासी ॥ द्यावीं वस्त्रें आमचीं आह्मांला ॥ राधे० ॥३॥ धन्य धन्य यशोदे बाई॥कृष्ण तुझा लडीवाळ पाही ॥ आडवितो ठायीं ठायीं ॥ किति गाऱ्हाणिं सांगूं तुह्मांला ॥ राधे०॥४॥ विठ्ठलदास बोलिला ॥ लागे सद्गुरुचरणाला॥राधेनें कृष्ण मोहिला॥घेउन गेली मंदिराला ॥ राधे०॥५॥

## गाणें १५ वें, गवळण (चंद्रावळी.)

जेव्हां तेव्हां अडविशी जिला तिला ॥ तसें नव्हे मला गरतिला ॥ हरी रे ॥ तसें० ॥ भलतीच्या भुलसि सुरतिला ॥ ह० ॥ भ० ॥ काय तेज तुझ्या स्वरुपाला ॥ ह० ॥ का० ॥ नाहाक मारला जासि एखादा, सोशिल पति नाहीं भला ॥ अ० क० ॥ भला काय ह्मणुन झटशिल मला ॥ अशी कोण व्याली तुला ॥ हरी रे ॥ अशी०॥ मी चंद्रावळ तशी नव्हे रे, सोड नंदाच्या मुला ॥ मुला ॥ काय ॥१॥ बुडविशी आमुच्या कुला ॥ ह० ॥ बु० ॥ ही गोष्ट

काय रे खला ॥ ह० ॥ ही० ॥ सोड तुटल माझी मे-खला ॥ ह० ॥ सो० ॥ या कर्माला तुझी न हकमी॥ कुणिकडे ह्मणसी चला ॥ चला ॥ काय ह्मणुन ॥ २ ॥ अधिकार तुज कोणी दिला ॥ ह०॥ अ० ॥ हा मार्ग काय चांगला ॥ ह०॥ हा० ॥ तव तात कसा वागला ॥ ह० ॥ त० ॥ हा छंद तुला लागला ॥ ह०॥हा०॥ सोडुन दे मज आतांच घेइन कविराया ॥ तुझी अलाबला ॥ काय ह्मणुन ॥ ३ ॥

## गाणें १६ वें, गवळण ( उलटा शृंगार. )

वांधून, शिरीं लुगडीं,वर राखडी, नाकिं बुगडी॥ पायांत कंचुकी गळां शोभे तोरडी ॥ काजळ, लावुनि मस्तकीं, बिंदी धुकधुकी, कुंकू जें गाला ॥ शोभती सांखळ्या दोही भुजदंडाला ॥ पायांत, गोट पाटल्या, छंद बांगड्या, गेंद हातांत ॥ कमरपट्टा गळ्या-मध्यें दाब घालि डोक्यांत ॥ मोकळे, केंस सोडुनी, कृष्ण पाहुनी, त्वरित चालली ॥ ध्रु० ॥ जेथिच्यान तेथें कामें सकळ राहिलीं ॥ कृष्णानें, तेव्हां कृष्णानें, मुरली वाजविली, गोपी घाबरली ॥ जेथिच्यान० ॥ ॥ १ ॥ एक पाय, टाकि एकिकडे, चाले कुणिकडे, आली धावून॥मद्यपी जसा कीं चाले झुकत रस्त्यानं॥ वाटेंत, आहे मी कोण, कुणाची कोण, तिला कांहीं

नाहीं ॥ कोठुन आलें मी देहभान तिज नाहीं ॥ विषयांत, होउनियां दंग, लागला छंद, तिला कृष्णाचा ॥ राहिला नाहिं विषमभाव देहाचा ॥ तेथून, त्वरित चालिली, तिनें कृष्णाची, मूर्ति पाहिली ॥ जेथिच्यान० ॥ २ ॥ आनंदें, मनामध्यें खुले, गजापरि डुले, मस्त नादांत ॥ नाचतां हलतसे सुंदर नथ कानांत ॥ त्या क्षणीं, गृहा विसरुनी, कृष्ण पाहुनी टाकि संसारा ॥ चरणावर हरिच्या ठेवियलें घरदारा ॥ श्रीधरें, ख्याल वर्णिला, माथा ठेविला, गुरुपदकमलीं ॥ जेथिच्यान० ॥ ३ ॥

## गाणें १७ वें, गवळण.

चाल—( शहाणी नंदाची. )

पहिली बोले गजगमना ॥ गोकुळ सोडुनि जातों आतां आवारे मधुसुदना ॥ गृहीं गृहकाम करूं देइना ॥ रागें भरतां खदखद हंसतो कुणालाहि भीना ॥ जातां यमुनेच्या जीवना ॥ संगें घेउनि गोपमुलांना चेष्टा करि नाना ॥ जाच मी कोठवर सोसुं तरी ॥ अ० क० ॥ आह्मी व्रजवासी युवती अवला छळितो मुरारी ॥ कान्हा खेळतसे होरी ॥ आह्मी॥१॥ दुसरी बोले व्रजबाळा ॥ अवचित येउनि कृष्ण सांवळा झोंबे पदराला ॥ करावें काय तरी याला ॥ वृद्धा

माझी सासु असे हा वेडावी तिजला ॥ रा०। मम सदनीं आला ॥ होतें एकलि बसलें मंचकिं पति बाहेर गेला ॥ करितो विनोद मस्करी ॥ आह्मी व्रजवासी ॥ २ ॥ तिसरी ह्मणे गोपकांता ॥ ऐक यशोदे तुझ्या नंदनें पिडिलेंसे बहुतां ॥ काल मी मथुरेसी जातां ॥ उभ्या दुपारीं येउनि ह्मणतो दान देइ आतां ॥ भक्षुनी दहिंदुधनवनीता ॥ चित्तचोरटा पळुनी जातो न सांपडे धरितां ॥ खोड्या याच्या तुज किति सांगूं तरी ॥ आह्मी व्रज०॥ ३ ॥ चवथी बोले वेल्हाळी ॥ मोहक हरिनें कुंजवनामध्यें वाजविली मुरली ॥ माझी चित्तवृत्ति मुरली ॥ देहभान मी विसरुन गेलें स्मृति नाहीं उरली ॥ वृत्ती सगुण रूपिं जडली ॥ पति सुत सोडुनि धावुनि आलें भ्रांति जिवा पडली ॥ मोठा बाई टवाळ पुतनारी ॥ आह्मी०॥ ४ ॥ पांचवी आली नव तरुणी ॥ राधा गवळण स्वरुपसुंदरा अनयाची रमणी ॥ कडेवर कृष्णाला घेउनी ॥ चुंबन घेउनि वदन विलोकुनि आलि गृहा घेउनी ॥ पालखीं बसवि मोक्षदानी ॥ क्रीडा कौतुक आनंदानें हसे चक्रपाणी ॥ चरणीं गंगा रक्षि हरी ॥ आह्मी०॥५॥

## गाणें १८ वें, गवळण.

बोले गवळण यशोदे सासुबाई ॥ कामधंदा करीत

होतें गृहीं ॥ शिंक्यावरी ठेविलें दूध दहीं ॥ हरी येउनि भक्षि करुन हेवा ॥अ०क०॥ याच्या हातींचा वेणु कुणी घ्यावा ॥ वाजवूनी हारितो जिवाभावा ॥ याच्या ॥ १ ॥ दुसरी गवळण ह्मणे यशोदे मामी ॥ एके दिवशीं बैसलों होतों धामीं ॥ वेणु ऐकतां धावुन आलों आह्मी ॥ मुलेंबाळें टाकून सर्व ग्रामीं ॥ सासु सासरे दीर करिति हेवा ॥ याच्या ॥ ॥ २ ॥ तिसरि गवळण ह्मणे यशोदे नारी ॥ कृष्णापाशीं अभिमान केला भारी ॥ शयन केलें मी पतीशेजेवरी ॥ तिथे आला अवचित तुझा हरी ॥ दाढी वेणी बांधुन स्वयें करीं ॥ आपण गेला तेथून लांब दूरी ॥ मजा अमुची दाविली साऱ्या गांवा ॥ याच्या ॥३॥ चवथि गवळण ह्मणे यशोदे आई ॥ वृंदावनीं चारीत होतों गाई ॥ तिथे आला हरी हा लवलाही ॥ थट्टा आमुची अनिवार करितो बाई ॥ असा त्रास किती दिवस सोसावा ॥ याच्या० ॥४॥ पांचवी गवळण ह्मणे यशोदे माते ॥ मुलासारिखें पाळिलें नंदतातें ॥ तेंही सोडिल आतां या जगन्नाथें ॥ गोप मिळुनी सारे करिति कावा ॥ याच्या ॥ ५ ॥ बोले यशोदा त्या हो गवळणींला ॥ हरी हट्टी हा काय करूं याला ॥ तुमचे गृहीं नाहिं येउं देत त्याला ॥ गोपिकांनीं गृहमार्ग धरियेला ॥ यशोदेनें हरीस

बोध केला ॥ पूर्वक्रम हरीनें चालवीला ॥ असा हरि गंगाच्या मुखीं यावा ॥ याच्या ॥ ६ ॥

## गाणें १९ वें, गवळण.

चाल—( कुंती ह्मणे धांव श्रीहरी आतां गेली वौसुनिया. )

जलकुंभ शिरीं घेउनी ॥ चालिल्या यमुनातिर सोडुनी ॥ त्या व्रजललना गौळणी ॥ जशा कांहिं दिसती नवकमलिनी ॥ नंदनंदना ते क्षणीं ॥ संवगडे गडी वदति येउनी ॥ गायी चारित वृंदावनीं ॥ सांवळा ये हि मात ऐकुनी ॥ अडविल्या गोपकामिनी ॥ ह्मणे वरी वेळ साधिली वनीं ॥ ॥ गोपि ह्मणती मुरलीधरा ॥ अ० क० ॥ जाउं दे आह्मांस निजमंदिरा ॥ हें काय शामसुंदरा ॥ जाउं दे० ॥१॥ तंव बोले चंद्रावळी ॥ माधवा करिशि काय ही रळी॥ धेनु घेउनि संध्याकाळीं ॥ गृहा ये परतुनियां वनमाळी ॥ तुझी खोड नंदाजवळी ॥ सांगतें आतां जाउन गोकुळीं ॥ कोपे यशोदा वेल्हाळी ॥ मुकुंदा राग तिचा सांभाळी ॥ तुज शिक्षा करिन त्या वेळीं॥ तरिच गौळण मी चंद्रावळी ॥ सोडि वाट होइ माघारा ॥जाउं दे० ॥२॥ श्रीकृष्ण ह्मणे सुंदरी॥क्षणभरी गोष्ट ऐक ही बरी ॥ काल मथुरेच्या बाजारीं ॥ मला ठकवुनि गेलिस खरी॥॥ तें दान देइ झडकरी॥

तरिच मी जाऊं देइन घरीं ॥ भर रात्रीच्या प्रहरीं ॥ आली तव भगिनी शेजेवरी ॥ ही खूण जाण अंतरीं॥ उगिच कां श्रमसी नानापरी ॥ किति अंत घेसि मुरहरा ॥ जाउं दे० ॥ ३ ॥ ये दुसरी चंद्रानना ॥ ह्मणे आह्मी युवती व्रज-अंगना ॥ नेतां कालिंदी-जीवना ॥ मार्गीं कां छळसी जगजीवना ॥ गृहिं सासु उगा राहिना॥तिचा बहु जाच मला सोसेना ॥ पति रागिट करि ताडना ॥ वाटतो धाक माझिया मना ॥ सर परता मनमोहना ॥ राजसा सख्या कमललोचना ॥ हा मार्ग नव्हे कीं बरा ॥ जाउं दे० ॥ ४ ॥ मग बोले शारंगपाणी ॥ पुन्हां हा दीन नये परतुनी ॥ शरदिंचा चंद्र ज्या दिनीं ॥ सोळा कळिं पूर्ण फुले कुमुदिनी ॥ जरि येशिल वृंदा-वनीं ॥ वेणुचा ध्वनि ऐकुन त्या दिनीं ॥ दे वचन भाक घेउनी ॥ तरिच जा अपुल्या निज भूवनीं ॥ राजिवाक्ष पाहुनि मनीं ॥ दाटलें प्रेम उभी पद्मिणी॥ निर घेउन झडकरी घरा ॥ जाउं दे० ॥ ५ ॥ जशि चपला सौदामिनी ॥ राधिका मंजुळमृदुभाषिणी ॥ ह्मणे पति नाहीं भूवनीं ॥ येई खेळाया चक्रपाणी ॥ करि विलास आनंदानीं॥आतां तरी मार्ग देइ सोडुनी॥ हा बोल प्रीतिचा खरा ॥ गौळणी आल्या निज-मंदिरा॥संगें घेउन श्यामसुंदरा॥गौळणी आल्या०॥६॥

# गाणें २० वें, गवळण.

ही पहिलिच गवळण ह्मणे यशोदेला ॥ मी न्हात होतें गृहाला ॥ अवचीत तुझा हा कृष्ण कोठुनी आला ॥ सन्मूख उभा राहिला ॥ पदरानें पालवित होतें ऐकेनासा झाला ॥ कधिं उलथुन जाइल मेला ॥ रानसटवी गिळिना याला ॥ झाला एक महिना ॥ अ० क०॥ घालितो रोज धिंगाणा ॥ हा नंदनंदाचा कान्हा ॥ झाला एक महिना ॥ घालितो० ॥ १ ॥ ही दुसरिच गवळण ह्मणे काय सांगुं ग याचे गुण ॥ हरि मोठा अवलक्षण ॥ मंदिरिं मी निजलें होतें कवाड लावून ॥ आला साण्या वाटे उतरुन ॥ झोपेचे भरामध्यें पाहे मला हलवुन ॥ जागि झालें मी डचकुन ॥ चहुंकडे पाहुं लागलें पाहुं लागलें ॥ कडि काढुन बाहेर आलें ॥ त्याच्या मागुन धांवत गेलें मला गवसेना ॥ घालितो० ॥२॥ ही तिसरिच गवळण ह्मणे ग नवनित चोरी ॥ आम्ही सासुरवासी नारी॥धुणीं घेउनी गेलों होतों यमुनेतिरीं॥ आडवितो हा वाटेवरी ॥ जळो जळो ग याची मुरली याची मुरली ॥ घरिं सासू रागें भरली ॥ याच्या चरणीं मन गुंततां फिटून दे दैना ॥ घालितो ॥३॥

## गाणें २१ वें, गवळण.

चाल—( गोकूळ एलई चालोरे, या गुजराथी चालीवर. )

अक्रूर येउनि घाताचि केला नेउनि प्राणविसावा ॥ अ० क०॥ हरीविण चैन पडेना ॥ कुणि तरि नयनीं दावा ॥ हरी० ॥ १ ॥ हार गळ्याचा भार होतसे विरह किती सोसावा ॥ हरी० ॥ २ ॥ कुंजवनामध्यें वाजवि मुरली ॥ नटवरवेष दिसावा ॥ हरी०॥ ३ ॥ पंचप्राण हे व्याकुळ होती ॥ वाटतसे जिव जावा ॥ हरी० ॥ ४ ॥ आसन वसन मज शयन सुचेना ॥ नंदकन्हया यावा ॥ हरी० ॥ ५ ॥ कृष्ण सांवळा मदनमनोहर ॥ यदुविर हृदयिं ठसावा ॥ हरी०॥६॥ चरणपंकजीं गंगा ठेवी ॥ मस्तक उद्धरि देवा ॥ ॥ हरी० ॥ ७ ॥

## गाणें २२ वें, गवळण.

मंद मंद गति सुगंध कुंज डोलताती ॥ तरुवर नभ कुंज लता पवन वाहताती ॥ आज कुठे कमळभृंग गुंतला सये ॥अ०क॥ आज नाहिं सदनिं माधव ॥ मज नीज ही नये ॥ आज० ॥ १ ॥ मुदित काम-सिंधु पूर्ण इंदुतेज वाहे ॥ दीन गोपि नये आतां असुरमर्दना ये ॥ रम्य वाग देहिं बाण लागला सये

1307

॥आज०॥२॥ शिणले नेत्र माझे हरी आस पूरवा हे ॥ चंचल हृदिं सुमनेहारे कुसुमचापदा ये ॥ वाट तुझी पहात हरी अजुनि कां नये ॥ आज० ॥ ३ ॥ शेज करुनि मंचकाशि बैसली असें ॥ दीन होउनि हीन तुझी वाट पाहतसें ॥ आजि कुठें नलिनभृंग गुंतला सये ॥ आज० ॥ ४ ॥

## गाणें २३ वें, गवळण.

पति माझा रागिट, क्रूर असे भारी ॥ शांतता नाहीं मनीं ॥ अरे हरी शांतता ॥ अ० क० ॥ राधा ह्मणे नको येउं मम सदनीं ॥ सासुरवासी आह्मी ॥ अरे हरी ॥ सासुर० ॥ राधा० ॥१॥ जाउं दे मला यमुने पाण्या ॥ होतसे मग रजनी ॥ अरे हरी ॥ होतसे० ॥ राधा० ॥२॥ दाढिवेणिशीं गांठ देउनी ॥ केलिस काशि करणी ॥ अरे हरी ॥ केलिस काशि करणी ॥ राधा०॥३॥ मुरलीच्या नाद ऐकुन आलें ॥ वाजते मधुर ध्वनी ॥ किति तरी॥वा० ॥ राधा०॥४॥ हरि ह्मणे राधे केव्हां येउं सांग ॥ निश्चय वद वदनीं ॥ अरे हरी० ॥ रा० ॥ ५ ॥ जयरामदासी झालें उदासी ॥ लागतें तव चरणीं ॥ राधा० ॥ ६ ॥

# गाणें २४ वें, गवळण.

चाल—( ही का देवि वनींची. )

अरुणोदय उठ झाला।। भानू भास्कर शशि उद-यासी आला ।। मित्र हाका मारी तुजला ।। गोधन घेउनि जा यमुनेला।।अ०क०।।हें रे काय बालमुकुंदा।। तुज योग्य असे हें काय गोविंदा ।। हें रे० ।। १ ।। करुनिया वारासारी ।। कवाड लावुनि निजलें मंदिरीं ।। जाग्या करुनी पोरी ।। दही दूध भक्षुनी सर्वही हारी ।। हें रे० ।। २ ।। ऐक गे नंदाचे राणी ।। पुत्राची करणी ऐकावी कानीं।।ओढी अमुची वेणी ।। संसारीं आमुच्या ओतिलें पाणी ।। हें रे० ।। ३ ।। कुंभ घेउनी जातां ।। वाटेंत आडवूनी धरी मम हस्ता।। याची कां एवढी सत्ता ।। नंदाला सांगुनी करि बंदोबस्ता ।। हें रे० ।। ४ ।। हातीं घेउनि काठी ।। लागतें तुझ्या कृष्णाचे पाठी ।। पडेना हा नंदाच्या दृष्टी ।। प्राणनाथाच्या कृपेनें रचिल्या ह्या गोष्टी ।। हें रे० ।। ५ ।। कपटी कठोर मनाचा ।। मला ठाउक आहे पहिल्या दिसाचा ।। असतांना वरषाचा ।। यानें येउन केलें राधाविलासा ।। हें रे ०।। ६ ।।

## गाणें २५ वें, गवळण.

चाल--( क्षणभरी तरी हरी राहे घरीं. )

घेउनि ये हरि मंदिरीं ॥ चैन नसे मज सुंदरी ॥ अ० क० ॥ विरहानळें मी व्याकुळ झालें ॥ भीष्म जसा जरपंजरीं ॥ घेउन०॥ १ ॥ सुस्वर मुरलीवादन करितो ॥ मधुर वाजे खंजिरी ॥ घेउन० ॥ २ ॥ सुरासुरांतें कोठुन प्राप्ती ॥ तप करिती गिरिकंदरीं ॥ घेउन० ॥ ३ ॥ रामसुताचें मन भ्रमरापरि ॥ चरणिं रुळे जाशि मंजरी ॥ घेउन० ॥ ४ ॥

## गाणें २६ वें, गवळण.

चाल--( इसतनधनकी )

मीन जसा जळिं हीन पडे हा ॥ तैसी मी दीन दीसें ॥ मी नत दारा ॥ अ० क० ॥ विरह कथूनी मजला तारा ॥ जा विनवा तुह्मि नंदकुमारा ॥ विरह० ॥ १ ॥ हारमणी मज हा रमणी जड ॥ हा रविसा करि चंद्र उबारा ॥ वि० ॥ २ ॥ कामजनक हा कां मजवरि रुसला ॥ कामदायित भयें ताप निवारा ॥ वि० ॥ ३ ॥ आनंदात्मज आद्यगुरू हा ॥ योग विलय भयें योग दरारा ॥ वि० ४ ॥

## गाणें २७ वें, गवळण.

कितिक गौळणी, कुंजवनांतुन, तुळशिवनांतुन,

चाफ्याखालीं, बकुळ मालती, मोगरा शेवती, जाइच्या वेलांतुन, पहात फिरती ॥ फुलझाडें ॥अ०क०॥ पाहुं चला हरि कोणिकडे ॥ पहात सांवळा न सांपडे ॥ पाहुं चला० ॥ १ ॥ आणिक शोधिति, गुलाबांतुन, गुलतुऱ्यांतुन, लाल कलगितुन, केतकी वनांतुन, केवडे॥ पाहुं चला० ॥२॥ वृक्षांचि दाटी, घनदाट मोठी, सूर्य-किरण हे जरा न दिसती, पक्षी जैसे किलबिल करिती, अशांत मैना कीर बोलती, तनू चमकती, उजड पडे ॥ पाहुं चला० ॥ ३ ॥ तेथुनि गजगामिना निघती, पायिं खडावा मृदू चालती, हातिं मुद्रिका हिरे लखलखती, गळां पाचेचे हार रूळती, भांगांत मोतीं चंद्रवदन मुखिं, रंगले विडे ॥ पाहुं० ॥ ४ ॥ राधा गवळण घेउन कडेवर, गेला मुरलीधर, वक्षःस्थळिं तिची गुंफुन वेणी, घे खांद्यावर, गर्वे सुंदरा, ह्मणे मनामध्यें, सोळा सहस्र गोपी असतां, त्या नावडे, एक हरीला, मी आवडें ॥ पाहुं० ॥ ५ ॥ तिच्या अंतरा श्रीरंग जाणुनि, फल वृक्षाच्या खालीं आणुनि, सुगंध सुमनें तोडी ह्मणुनी, तेव्हां तिनें ढाळी धरिल्लि करांनीं, पुष्पें तोडी आनंदानीं, गर्व न साहे त्यालागूनी, गुप्तचि झाला, हरि तिकडे॥ पाहुं० ॥ ६ ॥ आरक्त पद हरिचे उमटले, त्या मार्गानें येती सकळा, राधेभोंवति होउनि गोळा,

कोठें आहे सांग सांवळा, मग ती वृत्तांत सांगे बाळा, मी तर धरलेंसे ढाळीला, सुगंध सुमनें तोडायाला, गुप्तचि झाला नट नाटकी, न दृष्टी पडे ॥ पाहुं० ॥ ॥ ७ ॥ यमुनेच्या तिरीं एक घटका धुंडुन, श्रमल्या हिंडुन, उभ्या राहिल्या, गर्व सांडुनी, चिमण्या मोर, बदक चकोर, राजहंस मुक्ताचे चारे, घेती त्यांसी पुसती नारी, घननीळ देखिला, का इकडे ॥ पाहुं०॥८॥ यमुनेच्या तीरीं, गोपींचा मेळा, मिळुनी सकळा, नटति गोपाळा, कृष्ण सांवळा, होउनि करिती, गोपालकाला, खाउन हात पुसे घोंगड्याला, होउनिया व्रज वांकडे ॥ पाहुं०॥९॥ कुणी चिमणासा कृष्णचि होती, पुतना शोषुनि त्या मारीती, असंख्य वळिया दैत्य वधीती, कुणी काळियामर्दन करिती, कोणी होताती, सौंगडे ॥ पाहुं० ॥ १० ॥

## गाणें २८ वें, राधाविलास.

या हरीचें मुख अती लहान, मानिती चंद्र अभिमान ॥ मस्तकीं कुरुळ जावळ गुंफिलें पिंपळपान ॥ नासिकीं बुलाकी छान, आकर्ण नयन समान॥कर्णांत कुंडलें ओप देति हनुवटी ठेंगणी मान ॥ चाल ॥ अशि सगुण मूर्ति बरवी ॥ बरवी ॥ कंठीं वाघनखें मिरवी ॥ मिरवी॥जसा चंद्र पुनवेचा उगवला सोळा

कळिं पूर्ण ॥ तो न पावे तुलना ॥ अ० क० ॥ राधे गृहीं पाळणां बैसले देवराणा ॥ गीत गाउन हालवित ह्मणत मनामध्यें, अमळसे मोठे कां व्हाना ॥ १ ॥ तो पूर्ण काम हरि तिचा, जाणुनी भाव मनिंचा ॥ झालासे व्रजकिशोर थोर हा षोडश वर्षांचा ॥ दाटला मदन साचा ॥ आनंद वृत्ति पाहुन शोषिला कंठ राधिकेचा ॥चाल॥झाप घालि हरीवरती॥वरती॥ मिसळली कृष्णसुरतीं ॥ सुरतीं ॥ पूर्ण काम करुनिया तिच्या शांत करी मदना ॥राधे०॥२॥ तों तिचा पती अनया, आलासे गोरस न्याया ॥ ह्मणे सुंदरी उघड दार मला तातडी असे जाया ॥ तो शब्द ऐकुनीया, घाबरली हरिची प्रीया ॥ काय करूं भक्तसुरतरू ह्मणुन लागली प्रभुपाया॥चा०॥हे दीनबंधु दिनपाळ॥ दिनपाळ ॥ करि दासीचा सांभाळ ॥ सांभाळ ॥ हातिं खुळखुळा रांगु लागला कृष्ण बाळ तान्हा ॥ राधे० ॥ ३ ॥ सतीनें उघडिलें दार, पति पाहुन जगदुद्धार ॥ दे चुंबन घे कडिये ऐक राधिके एक विचार ॥ घरीं आणुनी जगदुद्धार ॥ घरीं आणुनी नंदकुमार ॥ सोडुनी, सर्व धंद्यासीं, जगदवंद्यासी खेळवी फार॥चाल॥पुरतील सर्वही कोड ग ॥ कोड ॥ उगवला मनींचा मोड ग ॥ मोड ॥ हा रंग, गाउनिया दंग, झाला निशात्मज दिनरजनी ॥ राधे० ॥ ४ ॥

# * गाणें २९ वें, मुरली.

चाल—( असें सांग कधीं मज घडलें. )

शरद्ऋतु उदय चंद्राचा॥ वनिं वृंद उभा गौळणींचा॥ सुगंध सुटत सुमनांचा ॥ ये पवन मलयगिरीवरचा ॥ हा थाट उभा रासाचा ॥ धरुनिया हस्त राधेचा ॥ श्रीरंग कुठे अजि जावा ॥ अ० क० ॥ हृदयींचा प्राणविसावा ॥ मुरलीधर कुणि तरि दावा ॥ हृदयीं० ॥ १ ॥ वृक्षांसि पुसति जंव युवती ॥ पदकमलें उमटलीं दिसती ॥ राधेवर करि बहु प्रीती ॥ घेउनि आला एकांतीं ॥ शिरिं फुलें गुंफि निजहस्तीं ॥ घे तिजला स्कंधावरती ॥ हा मत्सर किति सोसावा ॥ हृदयीं० ॥ २ ॥ कुंजांत असेल प्रभु बसला ॥ यदुपती आह्मांवर रुसला ॥ मग विचारीत तुळसीला ॥ मालती आम्रबकुलीला ॥ तुह्मी कुठे कृष्ण देखीला ॥ ठकवून गोपिंना गेला ॥ तो मदनतात हरि यावा ॥ हृदयीं० ॥ ३ ॥ यापरी मिळुन व्रजयुवती ॥ शोकाकुल अंतरिं होती ॥ यमुनेतिरिं येउनि बसती ॥ रामानुज अठविती चित्तीं ॥ यदुविर मग त्या स्थळिं आला ॥ जाणुनि गोपीप्रेमाला ॥ गंगासि चरणिं द्या ठावा ॥ ४ ॥

## गाणें ३० वें, मुरली २ री.

चिर घेउनीया, कळंबावरता ॥ कां चढलासी गोविंदा ॥ आनंदकंदा बालमुकुंदा ॥ आतां मला सोड ॥ अ० क० ॥ वाजविशी मुरली गोड ॥ कान्हा किति बा धराशिल ओढ ॥ वाजवि० ॥ १ ॥ आह्मी गोपी नग्न नारी ॥ नहात होतों यमुने तीरीं ॥ अवचित आला तुझा मुरारी ॥ जळो याची खोड ॥ वाजवि० ॥ २ ॥ अवघ्या गोपी जळासि आल्या ॥ क्रीडा करिती साऱ्या॥कांहीं काळ्या कांहीं गोऱ्या ॥ करितो डोळेमोड ॥ वाजवि० ॥ ३ ॥

## गाणें ३१ वें, मुरली ३ री.

गाई चारी यमुनेतीरीं संगें गोपाळा ॥ व्रजासहित मुख चुंबित नारी परि त्या व्रजबाळा ॥ राही राधा सत्यभामा जांबुवंति बाळा ॥ आसक्त परी ज्या क्रीडा करितो वाजवि मधुरध्वनी ॥ अ० क० ॥ मदनतात मनमोहन मुरली वाजवि कुंजवनीं ॥ सारिगम पधनिसा गायन करितो सप्तसुरावरुनी ॥ मदन०॥१॥ नानाछंदें बहु आनंदें नाचति सौंगडे ॥ टाळ विणा ते मृदंग मंडित वाजति हरिपुढें ॥ सुस्वर मुरली ऐकुनि गोपी धांवाति यमुनेकडे ॥ तें सुख देखुनि आनंद-

तनय गातो निशिदिनीं ॥ मदन० ॥ २ ॥ देव विमानीं बैसुनि गगनीं ह्मणती जय कृष्णा ॥ लीलावतारी सुरनरमुनींच्या हे मनरंजना ॥ मृगमदटीळक बहु अति कुसरी भाळीं रेखूनी ॥ मदन० ॥ ३ ॥ सोळा सहस्र भोगुन नारी ह्मणतो ब्रह्मचारी ॥ दैत्य मारुनी शोषुनि पुतना शूर्पनखा मारी ॥ गोवर्धन हा उचलुन हारी मधूकैठभारी ॥ दिनानाथ हें ब्रिद तुज साजे लक्ष्मी तव चरणीं ॥ मदन० ॥ ४ ॥

## गाणें ३२ वें, मुरली ४ थी.

वाहूं राहे यमुना ॥ मंद गती पवना ॥ वृक्षहि हालेना पान ॥ ऐसी परी जाहली ॥ अ० क० ॥ कां ग बाई हरिनें वाजविली मुरली ॥१॥ रात्र झाली दोन प्रहर ॥ माझ्या निद्रेचा भर ॥ नाठवत घरदार ॥ वृत्ति वेडी जाहली ॥ कां ग० ॥२॥ भुलविल्या नागिणी अप्सरा विसरल्या गाणीं ॥ वृंदावनीं गौळणी ॥ दाटी भारी झाली ॥ कां ग० ॥३॥

## गाणें ३३ वें, मुरली ५ वी.

काय करावें कांहिं सुचेना ॥ चिंता जडली नवी ॥ अ० क०॥ गडे ही मुरली गुंगवी ॥ या तनुवर सुखकर भर भर या रोमांचा ऊठवी ॥ गडे० ॥ १ ॥

वृंदावनिं हा वाजवि वेणू ॥ गोपिजना भूलवी ॥ गडे० ॥ २ ॥ पति सुत सोडुनि धावुनि आलें ॥ प्रेम मनीं भरवी ॥ गडे० ॥ ३ ॥ कोठें असशी भेट किं देवा ॥ बलवंता निववी ॥ गडे० ॥ ४ ॥

## गाणें ३४ वें, मुरली ६ वी.

किन्नरादि अप्सरगण ॥ नाचताति थैक थैक ॥ कर्ण विणा जेविं उरग ॥ डोलवी फणा ॥ अ० क०॥ दुरुन मुरलि ऐकतांच पुरलि कामना ॥ १ ॥ सहा राग छत्तिस कुल ॥ रागिण्यादि सप्त सूर ॥ आळवितो यथाकार ॥ ताल मूर्छना ॥ दुरुन०॥२॥ जलज जारज अंडज जिव ॥ स्वेदजादि गमन गती ॥ वायु स्थिर मंदगती ॥ जलहि वाहिना ॥ दुरुन ॥३॥ श्रीरणछोड प्रभू॥अधर सुधा पिऊन नादें॥ भुलविल्या नाना छंदें ॥ गोपी कामिना॥दुरुन ॥४॥

## गाणें ३५ वें, मुरली ७ वी.

निर्विकार आकारा येउन ॥ त्वां उद्धरिले ते पतित महादारुण ॥ केली क्रीडा गोकुळीं राहुन ॥ त्या भागवतीं असे आदि अंतिं कथन ॥चाल॥ परि चमत्कार बहु झाला एके दिनीं ॥ ते गोधन चारित असतां वृंदावनीं॥ह्या वसंतऋतुनें तरुवर फुलले वनीं॥ त्या प्रभातसमयीं उठला मंजुळ ध्वनी ॥ ती वंश कशी

त्रिभुवन भरुनी उरली ॥ अ० क० ॥ तूं अधरिं धरुनिया बरवि वाजवी मुरली ॥ सगुण स्वरूपा तुज पाहुन मतिही स्फुरली ॥ तूं ॥१॥ मुरलीनादें सुरवर मोहित झाले॥रविरथ आडुकला गगनिं लेश न चाले॥ गण गंधर्व गायनशब्द निमाले ॥ अप्सरा नृत्याचि भुलल्या पदहि न हाले ॥ चाल ॥ पाताळ-भुवनिं झालें याचीपरी ॥ महीसहित अहिपती डोल-तसे अंतरीं ॥ भूलोकीं तृण जल सांडीलें जळचरीं ॥ ते मयूर शुक बक मैना कुंठित स्वरीं ॥ गोकुळीं पाहतां जनवृत्ति हरिरुपीं भरली ॥ तूं अधरिं० ॥ २ ॥ ह्या गोपिका गृहधंदा सर्व विसरल्या ॥ देहिं ठेवुन पंचप्राण तूज अनुसरल्या ॥ ज्या नहात होत्या तैल-सुगंधीं भरल्या ॥ त्या तशाच उठल्या कुंजवनीं मोहिल्या ॥ चाल ॥ किति करितां शृंगार भुलल्या कशा ॥ ह्या नेत्रांजन भाळीं लाविती चक्षुशा ॥ ह्या रत्नजडित आभरणें लेति भलतशा ॥ ह्या देहभावविं-वर्जित जशा बावऱ्या पिशा ॥ हरि ऐशी दशा किंवा घातली भुरली ॥ तूं अधरिं० ॥ ३ ॥ हरि तुंच तूं आलासी या स्थाना॥सर्वे घेउन सौंगडे गोपगोपिका नाना ॥ ह्या गोकुळिंचा समारंभ जो रचना ॥ तूं यथासांग प्रत्यक्ष दाविशिल रचना ॥ चाल ॥ तूं कोठें बालक होउनि लोळसि पाळण्यावरी ॥ कोठें मंथन

करितां दधी भक्षिसी करीं ॥ कोठें तुळशीवृंदावनीं उभा क्षणभरी ॥ कोठें टाळ विणा मृदंग नित्य सुस्वरी ॥ तूं अधरिं० ॥ ४ ॥ कोठें काळीया टाकुनि नृत्यचि करिशी ॥ कोठें गोवर्धन पर्वत नखें उचलीशी ॥ कोठें गोपिका धावुन बळेंचि धरिसी ॥ कोठें वस्त्रें चोरुन कदंबक्रीडा करिशी ॥ चाल ॥ कोठें फागाचीं झुरमुटें दाविशी बरीं ॥ त्या मिळुन गौळणी तुला वेष्टिती हरी ॥ किति गरद गुलाली रंग उडे चीरिरी ॥ मग घाई होउनिया धरिशि रूपें दोन चारी ॥ अशी तरी करणी लिहुं जातां न पुरे धरणी ॥ तूं अधरिं० ॥ ५ ॥ हे अरूपरूपा काय मि वर्णूं तुजला ॥ हा शेष वर्णितां सहस्र मुखानें श्रमला ॥ तेथें मंदमती ज्ञान किती तें मजला ॥ परि पाहुनी स्वरूपीं लोभ काय उद्भवला ॥ चाल ॥ हे अतसी-कुसुमसम कांति तुझी गोजिरी ॥ हे मोर मुकुट पीतांवर कटिं केशरी ॥ देहुडी त्रिभंगीठाण मुरली आधरीं ॥ चमकती कार्णि चौफुल्या चटक रविपरी ॥ कस्तुरीटिळक मुखमंडण शोभा भरली ॥ तूं अधरिं० ॥ ६ ॥ पदतल जैसे अरुणोत्पल त्यापरि शोभा ॥ वपु सुंदर पहातां इंद्रनिळाचा गाभा ॥ दिव्याभरण वर कौस्तुभाची शोभा ॥ मुखकमळ सुरेखित रदन हिऱ्याची आभा ॥ चाल ॥ हे कोमलांग कमलाक्ष

मूर्ति धाकुटी ॥ ते पाहुनि वेधलि भक्त जनांची दिठी॥ तूं तया सांभाळीं कृपावह संकटीं ॥ त्र्यंबकसुताची मनोवासना पुरली ॥ तूं अधरिं० ॥ ७ ॥

## गाणें ३६ वें, मुरली.

चाल--( उद्धवा शांतवन कर जा. )

ऐकतांच मुरलीरव तो,महीसहित अहिपति डोले॥ कोकिळादि शुक वक मैना, काननीं शब्द ना बोले॥ खुंटलाचि रविरथ गगनीं, वायू तो मार्ग न चाले ॥ चाल ॥ वृक्षांचें पत्र न हाले ॥ अप्सरादि नृत्य निमालें ॥ गंधर्व थक्कीत झाले ॥ अ० क० ॥ वृंदावनिं वाजवि मुरली, हरि मंजुळ कुंजविहारी ॥ १ ॥ लुब्धुनिया मग मृग गाई, व्याघ्रावरि टाकिति माना ॥ गर्जना मेघ न करिती, नाचती मयूरी जाणा॥ होत्या ज्या वंध्या ललना, प्रसवती पुत्रनिधाना ॥चाल॥ थक्कीत मग ते नाना ॥ सुर न करिती अमृतपाना ॥ विसरले मुनी जप ध्याना ॥ वृंदावनिं० ॥ ॥२॥ गुंजारव विसरुनि भ्रमर, मुरलींत जाहले मग्न॥ सोडुनियां पतिसुत गोपी, लाविती हरीशीं लग्न ॥ किति एक रानीं फिरती, नाहीं त्यां देहभान ॥ चाल ॥ नेत्रांत ज्याचे अग्र ॥ जो जनासि करि निर्विघ्न ॥ झाले ते हरिशि सुलग्न ॥ वृंदावनिं० ॥३॥

विंचरितां एकी वेणी, मस्तकीं राहिली फणी ।। नाह-
तांच एकी उठली, केसांतुन वाहे पाणी ।। वाटे कैलासा-
हूनी, पातला पिनाकपाणी ।। चाल ।। गंगा आणि
यमुना दोन्ही ।। चालिल्या कुंजरगमनी ।। लागल्या
मुरलीध्यानीं ।। वृंदावनिं० ।। ४ ।। ऐशा या आल्या
जवळी, जाणुनिया हृषीकेशी ।। आवरली मुरली
तेव्हां, देहभान आलें त्यांसी ।। विस्मीत होउनी
वदतां, आनंदमूत प्रभूसी ।। चाल ।। ऐसा तूं कैसा
होसी ।। हें तुझें कोण वा सोशी ।। विषयाची फार
असोशी ।। वृंदावनिं० ।। ५ ।।

## गाणें ३७ वें, मुरली·

आह्मी तर परनारी गौळणी ।। कां लुब्धले शारंग-
पाणी ।। ऐकतील घरचे धनी ।। तुजवर करतील
वरचरणी ।। देतिल फांशी ।। अ० क० ।। कां मुरली
वाजविशी ।। हृषिकेशी ।। कां मुरली० ।। १ ।। दुसरी
ह्मणे कान्हा चोरा ।। पाजित होतें मी लेकरा ।।
वृंदावनीं तुझा थारा ।। मुरली ऐकुन आलें घरा ।।
जीव उदासी ।। कां मुरली० ।। २ ।। तिसरी ह्मणे
मी बरवी शेज केली ।। पतिशेजेवर निद्रा केली ।।
तेथें मुरली आयाकिली ।। ह्या वेळेशी ।। कां मुरली०
।। ३ ।। चवथी बोलली वेल्हाळी ।। मुरली आहे

तुझ्याजवळी ॥ तूं तर नेशील गोकुळीं ॥ आमुचीं तोंडें करशिल काळीं ॥ ह्या नगराशीं ॥ कां मुरली० ॥ ॥ ४ ॥ पांचवी बोलली हांसत ॥ होतें जात्यावर दळीत ॥ आलें धांवत पळत ॥ हरि तुजपाशीं ॥ कां मुरली० ॥ ५ ॥ सहावी बोले क्रोधें करुन ॥ लज्जा नाहीं तुजकारण ॥ कळलं तुझं शहाणपण ॥ हरी मजशी ॥ कां मुरली०॥६॥ सातवी ह्मणे नारायणा॥ तुह्मि तर जेवण जेवीतां ॥ पहिला घांस मुखांत घेतां ॥ ठेवा आह्मांसी ॥ कां मुरली० ॥ ७ ॥ आठवी ह्मणे हा मातला ॥ दहि दुध खाउन मस्तिस आला॥ अवघ्या मिळून मतलब केला ॥ ठोकूं यासी ॥ कां मुरली० ॥ ८ ॥ नववी बसली न्हायाकारण ॥ सासू करितसे विंचरण ॥ सून जातसे पळून ॥ मोकळ्या केशीं ॥ कां मुरली०॥९॥ दहावी ह्मणे मी तर सोळी ॥ हातांत उंडा पुरणपोळी ॥ मुरली ऐकुन जीव तळमळी ॥ चूलीपाशीं ॥ कां मुरली० ॥ १० ॥ अकरावी ह्मणे मी तर लहान ॥ घरीं कळेल वर्तमान ॥ पतिचें तुजला येइल धरणें ॥ धरला जाशी ॥ कां मुरली० ॥ ११ ॥ बारावी ह्मणे मी सुंदर ॥ बारिक पातळ अति सुकुमार ॥ नेसतां दिसतें गरोदर ॥ धांवतां कष्ट होती फार ॥ दों जीवांसी ॥ कां मुरली० ॥ १२ ॥ तेरावी ह्मणे कर्म खोटं ॥ गायी वळून झालं चावट ॥

यास कुणाचा नाहीं धाक ॥ धरून नेऊं नंदापाशीं ॥ कां मुरली० ॥१३॥ चौदावी ह्मणे कां पडसी माझ्या ख्यालीं ॥ फोडिन तुझी रे मुरली ॥ गौळणिंना जी मोहून घाली ॥ पाडी पाशीं ॥ कां मुरली० ॥ १४ ॥ पंधरावी ह्मणे हा कारटा ॥ यशोदेचा हा पोरटा ॥ कां धरितो अमुच्या वाटा ॥ जातां मथुरेसी ॥ कां मुरली० ॥ १५ ॥ सोळावी ह्मणे मी तर थोर ॥ घरीं आहे माझें पोर ॥ रडून करील एकचि गजर ॥ सोड हरी पदरासी ॥ कां मुरली० ॥ १६ ॥ सतरा गौळणी मीळूनी ॥ हरिनें नेल्या वृंदावनीं ॥ क्रीडा खेळे चक्रपाणी ॥ त्या गोपींशीं ॥ कां मुरली०॥१७॥

## गाणें ३८ वें, ठकडा.

मेघाचे परि दिसे सांवळा पिवळा चंदन शरीरीं ॥ भाळीं शोभे कस्तूरी ॥ खांद्यावरती शाम घोंगडी उंच जरीची किनारी ॥ सुंदर पीतांबरधारी ॥ कोटि मदन ओंवाळुन टाकिन हरिच्या स्वरुपावरूनी ॥ अ० क०॥ कां ग येइना अजूनी ॥ श्रीरंगाची वाट पाहतां नेत्र गेले शिणोनी ॥ कां ग० ॥ १ ॥ भुलविलें आह्मां गोपवधूंला वेणुरवें श्रीमुरारी ॥ चैन पडेना घरदारीं॥ अशांत रात्रीं धुंडत धुंडत अह्मी तर व्रजिच्या व्रजनारी ॥ सोडुनि पति हा शेजारीं ॥ पहातां पहातां

गुप्ताचि झाला गेला ठकडा ठकवूनी ॥ कां ग० ॥ २ ॥ या वनिं वनिता वनांत रात्रीं टाकुन जाइल कोण असा ॥ स्त्रीवांचुन जन सर्व पिसा ॥ व्यर्थच नाग· वलों अभिमानें अह्मांला कळला नाहिं असा ॥ ह्याचा त्रैलोक्यांत ठसा ॥ दीनबंधु हा इंदुप्रमाणें प्रगटे गोपींमधूनी ॥ कां ग० ॥ ३ ॥

## गाणें ३९ वें, पीतांबर·

कर ठेवुनी कटीं ॥ उभा भिवरे तटीं ॥ गायी राखिता गोवळा ॥ अ०क० ॥ या घननीळा ॥ शोभे पीतांबर पीवळा ॥ १ ॥ अनंत नामें ज्याला ॥ राजा ह्मणती हो त्याला ॥ पाहूं चला सांवळा ॥ या घन० ॥ २ ॥ सांडुनी सर्वही लाज ॥ करितसे भक्तांचें काज ॥ चतुर्भुज हा सांवळा ॥ या घन० ॥३॥ अनंत पुण्याच्या कोटी ॥ झाल्या रामाच्या भेटी ॥ मोठी कृपा या दयाळाची ॥ या घन० ॥ ४ ॥

## गाणें ४० वें, कृष्णाचें.

चाल—( त्या व्रजवासी गौळणी ह्मणती. )

कोण सुशीला प्रसवलि तुजला ॥ साकार मन्मथ गाभा रे ॥अ० क०॥ श्याम मनोहर कोमल तूं शिशु पाहुन चित्त निवालें रे ॥ अंतकालसम आहे हा

निर्दय ॥ जागतांच मरण आलें रे ॥ कोण० ॥ १ ॥ डोह भयंकर नदि यमुनेचा ॥ सलिल हलाहल ज्याचें रे ॥ अंतरिक्षगण पक्षिहि त्रासति नाहिं कसें भय याचें रे ॥ कोण० ॥ २ ॥ वाटे माय असा गुणसुंदर तनय कधीं न विसंबे रे ॥ आश्चर्य हें तव सदृश बहु सुत तेणें अनादर अंबे रे ॥ कोण० ॥ ३ ॥ देतिल प्राण पिता जननी तव जाय मुला बाहेरी रे ॥ एका जनार्दनिं रक्षि तथाप्रति त्र्यंबक भीति निवारी रे ॥ कोण० ॥ ४ ॥

## गाणें ४१ वें, कृष्णाचें.

चाल—( नवल मनीं वाटतें पाहुनिया श्रीगंगेतें. )

निशिदिनिं मजला ध्यास हरीचा ॥ वृंदावनिं जो वाजवि पावा ॥धृ०॥ या श्रीरंगा कुणि तरि दावा ॥ हृदयींचा हृत्ताप हरावा ॥ या० ॥ १ ॥ चंदनचर्चित श्यामतनू हा ॥ राधाधर जणु नयनिं लुटावा ॥ या० ॥ २ ॥ राजिवनयना सुंदरवदना ॥ स्मरतां सुखिं विरहाग्नि विझावा ॥ या० ॥ ३ ॥ तुळशी माळा कंठिं जयाच्या ॥ वाटे त्या देह प्राण वहावा ॥ या० ॥ ४ ॥ व्रजयुवतींचा काम हरी जो ॥ तो गंगाच्या वदनिं वसावा ॥ या० ॥ ५ ॥

## गाणें ४२ वें, कृष्णाचें.

चाल—( जाउं जाउं सखयांनों तुळसीबागेला. )

मोरपिच्छमुगुट शिरीं शोभे श्रवणिं कुंडलें ॥ कुरुळ केश मेघपंक्ति रम्य काय रेखिले ॥ मकरध्वजबाण जसे नयन दिसति चांगले ॥ नासिका ही चंपककळी भाळिं रेखि कस्तुरी टिळा ॥ ध्रृ० ॥ हास्यवदन कांति सघन पाहुं श्याम सांवळा ॥ नंदनंद श्रीमुकुंद नटत गोपवेष गोवळा ॥ हास्य० ॥ १ ॥ उभय बाहु दंड सरळ अंगदादि भूषणीं ॥ वैजयंति माळ गळां पतिपट्ट नेसुनी ॥ चरणिं झणत्कार करिति नूपुरादि किणकिणी ॥ अधरिं वेणु सप्त सूर वाजे रागरागिणी कला ॥ हास्य० ॥ २ ॥ वृंदावनिं कुंजपुंज सुमनगंध येतसे ॥ मुरलीरव ऐकुनियां स्मरहि ताप देतसे ॥ व्रजयुवती हरिस बघत जाति लागलें पिसें ॥ यमुनातटिं वृंदावनिं पाहति नंदानंदकंदाला ॥ हास्य० ॥ ३ ॥ राजिवाक्ष रास रमे घेउनि गोपअंगना ॥ पूर्णकाम करुनि चुकवि जन्ममरणयातना ॥ दिनरजनीं कृष्णचरणध्यान लागलें मना ॥ भक्तप्रिया कां त्यजिसी मूढ दासि दीन गंगाला ॥ हास्य० ॥ ४ ॥

## गाणें ४३ वें, शकुन.

अंगणिं माझ्या काग बोले ॥ कोकिळ बोले मधुर

सुरीं ॥ धृ० ॥ कधिं भेटेल मजला देव हरी ॥ शुभ शकून सांगा कोणि तरी ॥ कधिं० ॥१॥ डावा डोळा लवतो वाम ॥ बाहू माझा स्फुरण करी ॥ कधिं० ॥२॥ हतिंचा माझ्या पडला ग्रास ॥ तळमळ तळमळ जीव करी ॥ कधिं० ॥३॥ मध्वमुनीश्वर स्वामि रमापति ॥ सद्गुरुचरणीं प्रीत धरी ॥ कधिं० ॥ ४ ॥

## गाणें ४४ वें, कृष्णाचें.

चरणकमल ज्याचे मृदू ॥ सुंदरता काय वदूं ॥ गोपिकेचि घालि वेणी ॥ अ०क०॥ देखिला गे काय कुणी ॥ कृष्ण माझा प्राणसखा ॥ देखिला गे० ॥१॥ धन्य धन्य नंदराणी ॥ पायावरी ब्रह्म न्हाणी ॥ पाल-खांत गाये गाणीं ॥ देखिला गे० ॥२॥ गोवर्धन उच-लुनी ॥ इंद्रपद हरिल जनीं ॥ मर्दियेला काळीय फणी ॥ देखिला गे० ॥३॥ कृष्ण बाळ नंदाघरीं ॥ आनंदल्या नरनारी ॥ गोपी सांगती गाऱ्हाणीं ॥ देखिला गे० ॥४॥

## गाणें ४५ वें, रास.

*चाल—( कधिं येतिल राघवा तुं सांग रे मला. )

जडित मुगुट शोभे शिरीं मस्तकीं तुरा ॥ वैजयंति माळ हार तुळशिचा गळां ॥ पीतवसन कमलवदन श्याम सांवळा ॥ वाट तुझी बघत उभा निरोप आयके ॥ अ०क० ॥ कुंजवनीं रास असुनि रुसासि राधिके ॥

हरिनें मज पाठविलें चाल तूं सखे ॥ कुंजवनीं०॥१॥ राग रंग ताल चंग दंग दश दिशा ॥ पूर्ण चंद्र शुभ्र कला शांत ही निशा॥ कुसुमबाण करुनि जाण गोपि दीनशा ॥ मधुर मुरलि वाजवितो श्रवणिं आयके ॥ कुंजवनीं० ॥ २ ॥ चंपकादि वृक्षजाति पवनिं डोलती ॥ नृत्य करिति मयुर शुकाहि शब्द बोलती ॥ कोकिलाहि पंचसुरीं गाति नाचती ॥ मदन-तात जोडि हात तूज शशिमुखे ॥ कुंजवनीं०॥३॥सकल गोपि मिळुन हरिस येउन भेटती ॥ श्रीरंगरंगिं दंग होउनि प्रेम लूटिती ॥ भक्ति पाहुनि मुक्ति देइ हा यदूपती ॥ लाभ हा अपूर्व असे येइ तूं सखे ॥ कुंज-वनीं० ॥४॥ कृष्णचरणिं प्रीति धरुनि चाले राधिका॥ चक्रपाणि मोक्षदानि भक्ताचा सखा ॥ पूर्णकाम करुन मुक्त करित गोपिका ॥ कृष्ण कृष्ण येवो नाम गंगाच्या मुखें ॥ कुंजवनीं० ॥ ५ ॥

## गाणें ४६ वें, रास २ रा.

चाल—( भांडती दोघीजणी सवती. )

शरदऋतू गोड चांदणें शुद्ध पूर्णिमेसी ॥ यांनीं रास मांडिला वृंदावनासी ॥ धाडून दूत मुरलिचा गोपिकेशीं ॥ यांनीं वेडचि लाविलें मोहिलें चित्तासी ॥ वेणुचा मंजुळ रव येतां श्रवणासी ॥ बहु कामचि

भरला गोपिकेच्या चित्तीं ॥ विसरून गृहधंद्यासी ॥ एक धांवत चालली मोकळ्या ग केशीं ॥ परोपरी करुन शृंगार नेसुन शालूसी ॥ एक गळ्यांत घालिते चिंचपेट्याशीं ॥ घालून हातामध्यें हात जाति वेगेंशी ॥ एक गदगद हंसते एकामेकींशी ॥अ०क०॥ पूर्णब्रह्म सखा वनमाळी ॥ यानें वाजविली मुरली रासमंडळीं ॥ १ ॥ एका मागें एक चालल्या कुंज-वनाला ॥ एक तशिच चालली नेसुन साडिला ॥ वेणीफणी करुन साजणी पाहति आरशाला ॥ एक नेसुन पितांबर भरजरिचा पिवळा ॥ घालून वाकि गुजराथि बाजुबंदाला ॥ एक वेणिंत खोंविते केत-किपत्राला ॥ पूर्ण ब्रह्म० ॥ २ ॥ व्रजवासी गोपि सुंदरी आल्या हरिजवळी॥एक न्याहाळुन पहाते मूर्त सांवळी ॥ पाहून थाट गोपिंचा हसे वनमाळी ॥ एक ह्मणते हरीप्रती बोले पुतनारी ॥ कां आलां एवढ्या निशीं सोडुनी पतिसी ॥ हें उचित न दिसे तुह्मां कुलस्त्रियांसी ॥ ऐकून कठोर भाषणें दचकल्या चित्तीं ॥ एक ह्मणत हरीप्रती ऐका विनंती ॥ वेधका मनमोहना सख्या श्रीपती ॥ आह्मी त्यजुन आलों हरी सुहृसुत पतिशी गोकुळिंच्या व्रजयुवती हरिवश रमती ॥ एक ह्मणति चला ग जाऊं यमुनेशीं ॥ पूर्ण ब्रह्म० ॥३॥ एक गोपी एक सांवळा नेती घरासी ॥

एक मंजुळ सुस्वर गाती गाण्याशी ॥ षण्मासी करु-
निया निशी भोगि गोपींशीं ॥ एक चुंबन हृदयीं ठेवी
हस्ताशीं॥घालून गळ्यांमध्यें हात पाहति वदनासी ॥
एक घेउन हातामध्यें तांबूलपात्रासी ॥ घेऊन पदर
शेल्याचा पुसाति घामासी ॥ एक वारिति हरीवर
मयूरपिच्छासी ॥ पूर्ण ब्रह्म० ॥ ४ ॥ विमानीं नभ-
मंडळीं सुरांची दाटी ॥ एक पाहुन हरीवर पुष्पें
वर्षती ॥ नानापरी वाद्य वाजती अप्सरा गाती ॥
एक ह्मणती नव्हे हा गोपी यदुपती ॥ मागणें राधा
मागते सख्या श्रीपती ॥ नको अंतर देऊं ठेवी
पायाशीं ॥ पूर्ण ब्रह्म० ॥ ५ ॥

## गाणें ४७ वें, पिचकारी.

हातिं पिचकारी घेउनि॥तुह्मांवर रंग हरी टाकिन॥
करें हार तुरे गुंफिन ॥ गळां घालिन मी आज
हौसेनं ॥ तुम्ही समुद्र मी शिंपला ॥ अ० क० ॥
बोलते राधा श्रीहरिला॥आज गडे वसंत खेळूं चला॥
बोलते० ॥ १ ॥ उंची चंदन मैलागिरी ॥ सुवासिक
केशर मी कस्तुरी ॥ तुह्मी मोहन मी बासुरी ॥
नाजूक शोभे तुमच्या करीं॥जसा चंद्र वदनिं रेखिला॥
बोलते०॥२॥ तिथे होती एक सुंदर॥ क्रिडा तिशिं खेळे
शारंगधर ॥ इतकें ऐकुनियां सत्वर ॥ बोलला सखा

कृष्ण यदुविर ॥ तुह्मी हजार मी एकला ॥ बोलते० ॥ ३ ॥ हरिसहीत गजगामिनी ॥ मिळाल्या बारा सोळा जणी ॥ आपुलाला रंग घेउनी ॥ मिळाल्या सर्वहि वृंदावनीं ॥ श्रीरंग रंगिं रंगला॥बोलते० ॥४॥

## गाणें ४८ वें, कृष्णाचें.

काळि घोंगडी बहु मोलाची ॥ पदरीं शोभे कोर जरीची ॥ अ० क० ॥ अति कोमल तनु या हरिची ॥ १ ॥ नित्य खेळे हरि गोप मुलांमध्यें ॥ सुंदर वाजवि गत भैरविची ॥ अति० ॥ २ ॥ अद्यापि फिरतो वत्सांमागें ॥ आलि सुंदरि सांवळी छवेली ॥ अति० ॥ ३ ॥ राधामानस बहु आनंदलें ॥ प्रीति असूं दे हरिचरणासी ॥ अति० ॥ ४ ॥

## गाणें ४९ वें, कृष्णाचें.

चाल--( घेउनी ये हरि मंदिरीं. )

न जाइ मम युवतीसदना ॥ छळितिल तुजला परोपरी ॥ अ० क० ॥ क्षणभरि तरि हरि राहि घरीं ॥ १ ॥ दहिं दुध नवनीत चोरून खासी ॥ काय उणें तुज मंदिरीं ॥ क्षण० ॥ २ ॥ हरि ह्मणे माता दे मज आतां ॥ मागे वदन पसरोनि करीं ॥ क्षण० ॥३॥ जयराम जयसुत अंकित प्रभुचा ॥ देइन गोरस पोटभरी ॥ ४ ॥

# गाणें ५० वें, सोहळा.

चाल--( यशोदे बाळ तुझा कान्हा. )

राधा ह्मणे- रडुं नको घनश्यामा ॥ यशोदेशिं करूं दे गृहिं कामा ॥ चल माझ्या गृहासि खेळाया॥ नेई म्हणे राधेसी माया ॥ कडेवर घेउनि कृष्णातें ॥ नेई मग अपुल्या सदनातें ॥ पालखि बसवुनि गोपाळा ॥ अ० क० ॥ राधेच्या घरिं होतो सोहळा॥ कृष्णरूपिं जडली ती बाळा ॥ राधेच्या०॥१॥ सांवळी पाहुनि मूर्तीतें ॥ आवरि अपुल्या लज्जेतें ॥ हास्य-वदन करुन तेव्हां ॥ म्हणे तूं थोर होशिल केव्हां ॥ माझ्या मनिं आनंदें खेळावें ॥ तुह्मि आह्मि मंचकिं लोळावें ॥ हरि ह्मणे थोर होतों या वेळा ॥राधेच्या०॥ ॥ २ ॥ सिंहकटी मृगनयना बोले ॥ थोर कसा होशिल ये वेळे ॥ मंत्रसामर्थ्य मजपाशीं ॥नवल काय वाटे ग तुजसी ॥ थोर होतां बोलति गुजगोष्टी ॥ धरी हरी राधेसि मनगटीं ॥ पुष्पांची शेज केलि त्या वेळा ॥ राधेच्या० ॥३॥ सखया कोमलरुप यावें ॥ लागेन चरणिं दृढ भावें ॥ बोलती अशा गोष्टी सखया ॥ आला असे ते वेळीं अनया ॥ कोणासि विचार हा पससी ॥ कवाडें लावुनियां बससी ॥ अमृतघटिं पडे विषगोळा ॥ राधेच्या० ॥ ४ ॥ दहिंभात मिश्रित

कालवुनी ॥ हरिला भरवी ती तरुणी ॥ पतिसी म्हणे क्षणभर बैसा ॥ कृष्णमुखीं घालितसें ग्रासा ॥ आला भ्रतार पुरे हेत ॥ लज्जा राखी आनंत ॥ यांलागीं झाला सांवळा ॥ राधेच्या० ॥ ५ ॥

## गाणें ५१ वें, राधाविलास.

लहानसा थोर होउनि विलास करिसी ॥ परोपरि मला सुख देशी ॥ दासि मी तुझी लागतें चरणासी ॥ भेद नाहीं तूंशीं मशीं ॥ अ० क० ॥ राधिका म्हणे तुम्हांवीण कांहीं ॥ देवा मजला सुचत नाहीं ॥ १ ॥ रूप पाहतां अति सुंदर ॥ नयन कमलपत्राकार ॥ कानीं कुंडलें कुंडलें मत्स्याकार॥ नूपुराचे झणत्कार ॥ राधिका० ॥ २ ॥ पितांवर पिवळा कटीं कसूनी ॥ काल पाहिले चक्रपाणी॥उभी होतें मी होतें अंगणीं ॥ तेव्हां पाहिले शारंगपाणी ॥ राधिका० ॥ ३ ॥ पोवळी गाय गाय चुकली वनीं ॥ उशिर लागला कमलनयनी ॥ रूप बहु तुझें तल्लिन निशिदिनीं ॥ चला जाउं ह्मणे पुष्पशयनीं ॥ राधिका० ॥ ४ ॥ राधेचा विलास ऐकुन हृषिकेषी ॥ जवळ आले तिच्या पाशीं ॥ घेउन अंकीं चुंबन दिलें तिसीं ॥ चला जाउं म्हणे वनासी ॥ राधिका० ॥ ५ ॥ राधिका म्हणे म्हणे मुरहारी ॥ घरामधें सासू म्हातारी ॥ रागें

भरेल हें भय अंतरीं ॥ नको अंत पाहूं श्रीहरी ॥ राधिका० ॥ ६ ॥

## गाणें ५२ वें, राधाविलास.

यशोदा म्हणे राधेसी ॥ ह्याला क्षणभर बाहेर नेशी ॥ हा घुसळुन देइना मजला ॥ कशी गत करूं मी याला ॥ चाल ॥ बाहेर जातो, गोपींशि छळितो, यमुनेच्या कांठीं, क्रीडेसि करितो ॥ कशी गत करूं मी याला ॥ ने राधे खेळायाला ॥ अ० क० ॥ हरि चतुर्भुज ग झाला ॥ घे राधे मुखावर शेला ॥ १ ॥ गोकुळामधें कृष्णाला ॥ कुणि बरें म्हणेना याला ॥ चोरटा कसा अवतरला ॥ तो भीना मज नंदाला ॥ चाल ॥ घरांत शिरतो,दहिं दुध खातो,शिंक्यावरच्या दुड्या उतरितो, वांकुल्या दावितो मजला ॥ घे राधे० ॥२॥ तिनें नेला सदनाप्रती॥बसाविला मंचकावरती॥ हरि षोडशवर्षी झाला ॥ राधेशीं विलास केला ॥ चाल ॥ हरिशीं राधा तल्लिन झाली ॥ हरिचरणासी मिळुनी गेली, चमत्कार दाखवी सकळां ॥ घे राधे मुखावर शेला० ॥ ३ ॥

## गाणें ५३ वें, राधा.

एकटा फिरसी वृंदावनासी ॥ राधा पदर धरी झडझडून ॥ अ०क० ॥ नको रे जाऊं राधिकेला वनीं

सोडून ॥ असा रे हरी स्नेह तोडून ॥ नको रे०॥१॥ धुंडुन धुंडुन श्रमले चरण ॥ कुठें बैसलासी दडून ॥ नको रे० ॥ २ ॥ महालिं मी सादर पतिसेवेसी ॥ मुरलीरव कर्णी पडून ॥ नको रे० ॥ ३ ॥ दीनदयाळ प्रभू प्रगटले ॥ द्या दर्शन कडकडून ॥ नको रे०॥४॥ तुझ्या दर्शनें पुनित मी झालें ॥ तान भूक गेली हरून ॥ नको रे० ॥५॥ श्रीहरिचरणीं दर्शन घेतां ॥ उभि राधा कर जोडून ॥ नको रे० ॥ ६ ॥

## ❀ गाणें ५४ वें, राधा.

चाल—( राधा गवळण बोले मुकुंदा. )

जाउन सांगेन, नंद मामाजीला ॥ मोडिन तुझि तरि खोड ॥ अरे कृष्णा मोडिन० ॥ अ० क० ॥ जाउं दे, हे मम प्राणप्रिया ॥ माझि वाट तूं धरूं नको सोड ॥ जाउं दे० ॥ १ ॥ तूं तर गवळी, मी आहें राधा॥तुझि माझी कैशी रे जोड॥ अरे कृष्णा०॥तुझि माझी ॥ जाउं दे० ॥ २ ॥ मी आहें गोरी, तूं आहे काळा ॥ मम पदरासी तूं सोड ॥अरे कृष्णा०॥ जाउं दे० ॥ ३ ॥ नंदाघरचा तूं गुरराखी ॥ जळो जळो ही तुझी खोड ॥ अरे कृष्णा ॥ जळो० ॥ जाउं दे० ॥ ४ ॥ माणीक प्रभू, अनुभव जाणे ॥ नाम असे बहु गोड ॥ अरे कृष्णा० ॥ जाउं दे० ॥ ५ ॥

# गाणें ५५ वें, राधा.

चाल--( आज सभेंत द्रौपदी कौरव. )

राजहंस राजहंसिनी, दिसे वृंदावन चांगलें ॥ किं तरुवर, नानापरि लागले ॥ किं तरुवर० ॥ जाई जुई बकुळ शेवती, गुलाब चंपक फुलें ॥ किं केतकी वनें बाग फूलले ॥ किं केतकी० ॥ हार तुरे गुंफिती सुवासिक गजरे अवघ्या मिळून ॥अं०क०॥ नको जाऊं, रात्रिकेला वनिं सोडून ॥ राजविलासा यदूनायका गेलि प्रीत तुजसी जडून ॥ नको रे जाऊं० ॥ १ ॥ श्यामसुंदरा ह्मणे पद्मिणी, रत्नखचित बंगले ॥ किं मंडप द्राक्षांचे लागले ॥ किं मंडप० ॥ गुलालगोटे रंग पिचकाऱ्या, नाना विलासीं झुले ॥ किं झुलती, आतरदाण्या चौफुले ॥ किं झुलती० ॥ श्रीहरिला घेउनि कामिनी, गेलि रंगमहालीं चढून ॥ नको रे जाउं० ॥ २ ॥ केळि नारळी बकुळ पोफळी, आम्रवृक्ष भले भले ॥ किं पिंपळ, गगनासी लागले ॥ किं पिंपळ० ॥ आंवळी डाळिंबी खिरण्या जांभुळी नारंगी बहु डुले ॥ किं मयुर त्या छायेला बैसले ॥ किं मयुर त्या० ॥ राधा ह्मणे तारा प्रभुजी, गेलें भवसागरिं बुडून ॥ नको रे जाउं० ॥ ३ ॥

# गाणें ५६ वें, पायघड्य.

चाल--( तुह्मी थोराचे आहां परंतु. )

कांहिं तरि वृंदावनिं विपिनीं ये ।। समकीर्ती कधिं होईन ।। जाणा ह्या मम चित्तीं दिधल्या कृष्णा तारा गोपाळा ।।अ०क०।। राधा आग्रह करी हरीला पायघड्या आज मज घाला ।।१।। कृष्ण ह्मणे शालुच्या अथवा पितांबर निरमितया ।। सांगे राधे केव्हां घालूं, कोमल पंकजरूपाला ।।राधा०।।२।। शालु नको पीतांबरहि नको कोमलपंकीं रुततिल हे ।। मधुमालती सुमन किंजल्काच्या, कृष्णा घाला ह्या मजला ।। राधा०।।३।। हरिनें सर्वहि गोप मिळवुनी ।। मालति पुष्पें आणविलीं ।। त्याचे किंजळ काढुनि राधे, मार्ग शोभन जो केला ।।राधा०।।४।। या पद्धतिनें नेउनि सुंदरा यमुनेतीरीं वैसविल्या ।। कमलकर्णिका घेउन हातीं घाशी तीच्या पदकमला ।। राधा० ।। ।। ५ ।। क्षाळुन चरणा हरि वदला गे, धन्य धन्य मी आज झालों ।। घासाया निज पंकज हरिचे सांपडलों आज प्रभूला ।। राधा०।। ६ ।। श्रीआनंता कमलाकांता किती मी शरण येउं आतां ।। राधे तुझी मंजुळ वाणी, विनवितसे कीं श्रीहरिला ।। राधा० ।। ७ ।।

## गाणें ५७ वें, चंद्रावळ.

ह्मणे चंद्रावळी ग कैशा गोकुळिंच्या नारी ॥ पतिव्रतेचें लक्षण नाहीं भोगी मुरहारी ॥ हा नंदाचा मूल मातला छळितो परनारी ॥ हजार कपटें करुनि परी न गवसे श्रीहरी ॥ मी नांवाची चंद्रावळी होईन जरी ॥ कढईमध्यें तेल तेवुनी काढिन मोहर कोरी ॥ चाल ॥ ऐशी पतिव्रता कामीन, ऐकुन पण हा श्रीकृष्णानं, परब्रह्म तो जगजीवन, या नंदाचें बालक तान्हं, तेज लपविलं सूर्य भानुनं ॥ वेष किं धरियेला, किं दुसरी राही अवतरला ॥ अ०क० ॥ गोकुळवासी तो हृषिकेशी राहिरूप झाला ॥ कपटें करुनी हरिनें मोहिलें चंद्रावळीला ॥ १ ॥ देव करुनि शृंगार दागिने घालुनि लखलखित ॥ मकरकुंडलें काढुन घाली तानवडे कानांत ॥ हरि व्रजवासी काळि लकेरी हिरा चमकत ॥ मृगनयनामध्यें अंजन सुरमा खंजनाचि ज्योत ॥ नाकीं मुक्ताफळ लखलखे वाऱ्यानें हालत ॥ ऐसे शृंगार केले नाटकी आहे भगवंत ॥ चाल ॥ वैजयंतिची काढुन माला, चंद्रहार तो घालुनि गळां, चिंचपेटया कीं चाफेकळ्या, वर मोत्याचा भांग टिळा, नेसुन काळी चंद्रकळा, कुंकूं लावुनिया कपाळा, शोभत वदनाला ॥ किं हिरा जडला नथणीला ॥

गोकुळवासी० ॥ २ ॥ चंचलनयना वारिक कंवर सुंदर आकार ॥ भिंवया कमानी कंठ कोकिळा आलाप सुस्वर॥हनुवट बोटीं जोड जोडवीं नेपुराचा गजर ॥ राहीवेषें कृष्ण सांवळा दिसे मनोहर॥वाळे सांखळ्या वाक्या तोरड्या पायीं पैंजण ॥ अंगुलिमध्यें घालुन मुद्रा वरतें कंकण ॥ चाल ॥ नट नटलासे शारंग-पाणी, बाळ्या बुगड्या घालुन कानीं, सारी करुनी वेणी फणी, मग निघालासे तेथूनी, गेली चंद्रा-वळिच्या भुवनीं, भेटी झाल्या दोघी वहिणी, गहिंवर आलासे दाटूनी, चंद्रावळिला॥किं वैसा ह्मणे राहिला॥ गोकुळवासी० ॥ ३ ॥ बहुतां दिवसां वहिण भेटली ह्मणे चंद्रावळ ॥ धरुन हस्तकीं उठवि स्नानासि राहीला त्या वेळ ॥ लगबग लगबग देउन पाणी सारून घंगाळ ॥ चाल ॥ उटणें लावुनि, मळी काढुनी, सारुनि घंगाळीं उन पाणी, काढुनि टिकली कुंकूं कोरुनि, शोभत वदनाला ॥ किं अंजन रेखिलें डोळ्यांला ॥ गोकुळवासी० ॥ ४ ॥ सोळा शृंगार करुनी श्रीहरी त्यावरि करि काय ॥ नट नटलासे शारंगपाणी आरशांत मूख पाहाय ॥ साजुक नाजुक पाक करूनी वैसावि जेवाया ॥ अडणीवरती ताट रुप्याचें चौरंग वैसाया ॥ सुगंध उदकें झारि भरोनी जडिताच्या समया ॥ ऊन पाणी त्यामध्यें वाळा

घंगाळ आंचवाया ॥ चाल ॥ लवण लोणचें वाढुन तिखट, शाखा भाज्या वाढुन नीट, फेण्या सांजोऱ्या आणि वळवट, तूप गाइचें फार चोखट, भक्षण करुनी पुशिले ओठ, ढेकर कीं दिधला ॥ सुगंध उदकीं चुळ भरिला ॥ गोकुळवासी० ॥५॥ जेउनि खाउनि तृप्त होउनी बैसे एकांत ॥ पानें गंजिरीं पिकलीं साजुक आणुनिया त्वरित ॥ वेळा लवंगा चिकण सुपारी कोंकणिचा कात॥ मोती भाजुनि केला चूना पानासि लावित ॥ चौरंगावर दोघी बैसुनि हितगुज सांगत ॥ चाल ॥ शेज फुलांची केली लवलाही, अबीर अत्तर गणना नाहीं, उदबत्या जळती त्या ठायीं, निजली चंद्रावळि ती राही, दोन प्रहर रात्रींच्या समयीं, स्त्रियेचा पुरुष कीं अवतरला ॥ किं भोगिली चंद्रावळिला ॥ गोकुळवासी ॥ ६ ॥ देव करी आज्ञा किं नको करूं भानु प्रकाश ॥ सहा महिन्यांची रात्र आंधेरी पूर्ण केलि आस ॥ जागि झालि चंद्रावळ पाहे पितांबरास ॥ श्यामवर्ण तो हरी पाहिला लागते चरणास ॥ चाल ॥ नंदनंदा तूं गोविंदा, आत्मघटींच्या प्रेमानंदा, झाली तल्लिन हरिच्या नादा, ब्रीद वर्णितां शिण आला वेदा, साक्षात अवतरला ॥ भोगीली चंद्रावळिला ॥ गोकुळवासी ॥ ७ ॥

## गाणें ५८ वें, शिदोरी.

माझी घोंगडी कोठें आई ॥ इथे ठेविली काठी नाहीं ॥ माझ्या वहाणा झाल्या कायी ॥ माझा पावा दिसतच नाहीं ॥ अ०क० ॥ आइ शिदोरी दे ग मला ॥ माझिं गोधनें गेलिं रानाला ॥ उशीर झाला वासराला ॥ मग मी कसा जाउं एकला ॥ आइ० ॥१॥ माझा चेंडु चकीत भोरा कुठे ॥ पदर धरून ओढितो नेटें ॥ क्रोधें करून यशोदा दाटे ॥ दह्या दुधाचें अनुसट ॥ आई शिदोरी० ॥ २ ॥ आई अनुसट ह्मणजे काय ॥ तुझ्यासाठिं बा नवसलें आहे ॥ आई आह्मी देवाचें लागतों काय ॥ इतकें बोलुन उगा न राहे ॥ आइ० ॥ ३ ॥ यशोदा देवाचे घरांत गेली ॥ दिवा लावुन धुप वर घाली ॥ दह्यादुधाचीं पुढें ठेविलीं ॥ देवा तुला पावो असें बोलली ॥ आइ० ॥ ४ ॥ तेव्हां चतुर्भुज कृष्णनाथ ॥ दही दुध तें आपणच खात ॥ देव टकमका पाहत ॥ देखुन यशोदा झाली विस्मित ॥ आइ० ॥५॥ देव भावाचा भूकेला ॥ गोरस आपणच भक्षिला ॥ एका जनार्दनिं देखिला ॥ आई० ॥ ६ ॥

## गाणें ५९ वें, अक्रूर.

अक्रूर येउनी रथ सजवीला ॥ वर बैसविलें

९५ 73४७

रामकृष्णाला ॥ अं० क० ॥ हरी मथुरेसी हो चालला ॥ टाकुनियां गोपींला ॥ कान्हा मथुरेसी हो चा० ॥१॥ अन्न पाणी गोड न लागे ॥ चैन न पडे जिवाला ॥ हरी मथुरेसी० ॥२॥ पूतना शोषुनी कंस वधी तो ॥ कसा रतला कुब्जेला ॥ हरी मथुरेसी० ॥ ३ ॥ जनीं जनार्दन विनवितो भावें ॥ दुःख झालें गौळणिला ॥ हरी मथुरेसी० ॥ ४ ॥

## गाणें ६० वें, अक्रूर.

असे नाम तया अक्रूर परी बहु क्रूर आह्मांसी कळलें ॥ कसें चित्त तया श्रीहरिचें युक्तिनें वळलें ॥ बोलून नंद यशोदेस करुन उपदेश त्यास यश मिळलें ॥ जातोचि खचित ऐकतांच मन कळवळलें ॥ चाल ॥ ऐशापरि बोलून राधिका गहिंवरली अनिवार ॥ निश्चयें त्यागीन सकळ अविचार ॥ अं० क० ॥ कुणि मार्गामधें अवघड जाउनि कुणि सुघड रथाचा विघड कुणि तरि करवा ॥ नेतो अक्रूर हरी मथुरासि कुणि तरी फिरवा ॥ १ ॥ आह्मि सकल गोपी दीन जळाविण मीन तशा तळमळतों ॥ नाटोपे विरहतक्षक आह्मांला छळितो ॥ घरीं आहे सासुरवास परी दिवसास एक वेळ मिळतों ॥ हरी हरी ह्मणुन यमुनेच्या वाटेवर पळतों ॥ चाल ॥ वत्सें त्यागून गोधनें फिरती

दाही दिशा ॥ कधिं परतुन याल कान्हा दिसाल नयनिं जगदिशा ॥ कुणि० ॥ २ ॥ आह्मि सकल गोपि नर नारि मिळुन कंसारि बाळकें रडती ॥ कुणि उभ्या बशा कुणि वशा महीवर पडती कुणि न्याहळून करी दुरदृष्टि होउन अति कष्टि गोपुरें चढती ॥ जिवजंत वृक्ष झाले सुक्ष पाल्य्य झडती ॥ चाल ॥ एक हरीविणें जगास अंधःकार ॥ यावें करुणाकर भगवान ॥ कुणि० ॥ ३ ॥ कांहीं दिवस राहुनि मथुरेस कंसगृहिं हौस हरीची पुरली ॥ अंतरीं साक्ष भगवान ह्मणुन वृत्ति स्थिरली॥चालोनि मनोवेगांत क्रमुनि निशि शांत वाट नाहिं चुकली ॥ पाहुं कशी हरी रे वाजविली तूं मुरली ॥चाल॥सांगून आमुची आस जाउनिया त्यास कुणि तरी कळवा ॥ घेउनि गोकुळास एक वेळ मिरवा० ॥ कुणि० ॥ ४ ॥

## गाणें ६१ वें, अक्रूर.

चाल—( केव्हांची आळवितें कां जागा होइना. )

गौळणि ह्मणती यशोदेला कोठें गे सांवळा ॥ कां-रथ शृंगारीला सांगा हो मजला ॥ अक्रूर उभा असे बाई गे साजणी ॥ अ० क० ॥ नंदाच्या अंगणीं मिळाल्या गौळणी ॥१॥ बोले नंदाची पट्टराणी सद्ग-दित होउनी॥मथुरेसी चक्रपाणी जातो गे साजणी ॥

निश्चळ मनीं झाल्या हें वचन ऐकुनी ॥ नंदा० ॥२॥ अक्रूरा चांडाळा तुज कोणी धाडिला ॥ कां घात करूं येसी बांधिसी कां सर्वांला ॥ अक्रूरा तुझी नामा ऐशीच करणी ॥ नंदा० ॥ ३ ॥ रथिं चढला वनमाळी आक्रांत गोकुळीं ॥ भुमि पडल्या ब्रजबाळी कोण त्यां सांभाळी ॥ नयनींच्या उदकांनीं भिजली धरणी ॥ नंदा० ॥ ४ ॥ देव बोले अक्रूरासी वेगें हांकी रथासी ॥ गोपिंच्या शोकासी पहावेना मजसी ॥ एका जनार्दनीं ह्मणे रथ गेला निघुनी ॥ नंदा० ॥ ५ ॥

## गाणें ६२, अक्रूर.

कंसें अक्रुर पाठविला गोकुळासी ॥ घेउन यावें बळराम श्रीकृष्णासी ॥ ऐकुन गोपि विनविती अक्रुरासी॥आह्मांस टाकुन जातोस मथुरेसी ॥अ० कृ०॥ सांवळ्या कृष्णा परतुन केव्हां येशी ॥ गोपाळा रामा मागुती भेटी देशी ॥१॥ बंदीशाळे वसुदेव देवकीशा॥ भक्तवत्सला गोपाळा ह्मणवीशी ॥ तेव्हां तुजला आणिलें गोकुळासी ॥ सांवळ्या० ॥ २ ॥ अग बग मारिले दैत्य केशी॥शोषीयेली पुतना ति मावशी ॥ तुझा पार न कळे ब्रह्मयासी॥सांवळ्या॥३॥वनीं गाई चारितां भागलासी ॥ गिरी धरुनी रक्षिलें गोपाळांसी ॥ यमुने डोहीं मर्दिलें काळियासी॥सांवळ्या० ॥४॥ गौळणींचें

दाही दिशा ॥ कधिं परतुन याल कान्हा दिसाल नयनिं जगदिशा ॥ कुणि० ॥ २ ॥ आह्मि सकल गोपि नर नारि मिळुन कंसारि बाळकें रडती ॥ कुणि उभ्या बशा कुणि बशा महीवर पडती कुणि न्याहळून करी दुरदृष्टि होउन अति कष्टि गोपुरें चढती ॥ जिवजंत वृक्ष झाले सुक्ष पालव्य झडती ॥ चाल ॥ एक हरीविणें जगास अंधःकार ॥ यावें करुणाकर भगवान ॥ कुणि० ॥ ३ ॥ कांहीं दिवस राहुनि मथुरेस कंसगृहिं हौस हरीची पुरली ॥ अंतरीं साक्ष भगवान ह्मणुन वृत्ति स्थिरली॥चालोनि मनोवेगांत क्रमुनि निशि शांत वाट नाहिं चुकली ॥ पाहुं कशी हरी रे वाजविली तूं मुरली ॥चाल॥सांगून आमुची आस जाउनिया त्यास कुणि तरी कळवा ॥ घेउनि गोकुळास एक वेळ मिरवा० ॥ कुणि० ॥ ४ ॥

## गाणें ६१ वें, अक्रूर.

चाल—( केव्हांची आळवितें कां जागा होइना. )

गौळाणि ह्मणती यशोदेला कोठें गे सांवळा ॥ कां रथ शृंगारीला सांगा हो मजला ॥ अक्रूर उभा असे बाई गे साजणी ॥ अ० क० ॥ नंदाच्या अंगणीं मिळाल्या गौळणी ॥१॥ बोले नंदाची पट्टराणी सद्गदित होउनी॥मथुरेसी चक्रपाणी जातो गे साजणी ॥

निश्चळ मनीं झाल्या हें वचन ऐकुनी ॥ नंदा० ॥२॥ अक्रूरा चांडाळा तुज कोणी धाडिला ॥ कां घात करूं येसी वधिसी कां सर्वांला ॥ अक्रूरा तुझी नामा ऐशीच करणी ॥ नंदा० ॥ ३ ॥ रथिं चढला वनमाळी आक्रांत गोकुळीं ॥ भुमि पडल्या व्रजबाळी कोण त्यां सांभाळी ॥ नयनींच्या उदकांनीं भिजली धरणी ॥ नंदा० ॥ ४ ॥ देव बोले अक्रूरासी वेगें हांकी रथासी ॥ गोपिच्या शोकासी पहावेना मजसी ॥ एका जनार्दनीं ह्मणे रथ गेला निघुनी ॥ नंदा० ॥ ५ ॥

## गाणें ६२, अक्रूर.

कंसें अक्रूर पाठविला गोकुळासी ॥ घेउन यावें बळराम श्रीकृष्णासी ॥ ऐकुन गोपि विनविती अक्रूरासी॥आह्मांस टाकुन जातोस मथुरेसी ॥अ० कृ०॥ सांवळ्या कृष्णा परतुन केव्हां येशी ॥ गोपाळा रामा मागुती भेटी देशी ॥१॥ बंदीशाळे वसुदेव देवकीशा॥ भक्तवत्सला गोपाळा ह्मणवीशी ॥ तेव्हां तुजला आणिलें गोकुळासी ॥ सांवळ्या० ॥ २ ॥ अग बग मारिले दैत्य केशी॥शोषीयेली पुतना ति मावशी ॥ तुझा पार न कळे ब्रह्मयासी॥सांवळ्या॥३॥वनीं गाई चारितां भागलासी ॥ गिरी धरुनी रक्षिलें गोपाळांसी ॥ यमुने डोहीं मर्दिलें काळियासी॥सांवळ्या० ॥४॥ गौळणींचें

हहीं दूध लोणी खासी ॥ नित्य गाऱ्हाणीं सांगती मजपासीं ॥ तेव्हां तुजला वांधिला उखळासी ॥ ह्मणुनी सखया मजवरी रुसलासी ॥ सांवळ्या०॥५॥

## गाणें ६३ वें, अक्रूर.

नाहिं सुचत मसी काम धाम आणि धंदा ॥ आठवितें आनंदकंदा ॥ मुळपासुन मी होतें प्रभूच्या छंदा ॥ कशि दया नाहिं गोविंदा ॥ चाल चाल गडे चरण प्रभूचे वंदा ॥ व्हा तल्लीन प्रेमानन्दा ॥ चाल ॥ सांवळी मूर्ति आज पाहूं ॥ युक्तिनें वहुत समजावूं ॥ उत्तम गुण हरिचे गाऊं॥मसि धीर नसे जिव हा व्याकुळ झाला ॥ अ० क० ॥ सखे काळ कोठुन आला ॥ आज अक्रूर हा नेतो श्रीकृष्णाला ॥ सखे० ॥ १ ॥ ह्या कृष्णानें ममता लावुन लटकी ॥ हा कपटी पुरता चटकी ॥ वश कुब्जेल झाला नागर नटकी ॥ आतां हरी तिशीं लंपट कीं ॥ वाई व्यर्थ आतां रिकामि ही कटकट कीं ॥ झाली गोड प्रभूला वटकी ॥ चाल ॥ सखे पुण्यभाग आज सरला ॥ मुरलीधर प्रभु अंतरला ॥ सर्वस्वी उपाय हरला ॥ जसें निष्फल तें रत्न जडित अंधाला ॥ सखे० ॥ २ ॥ या कृष्णाची कैशी मदनमूर्ती ॥ सच्चिद्घन आनंदस्फूर्ती ॥ मुख चंद्राचें काय वर्णु

खुपसुरती ॥ दर्शनें कामना पुरती ॥ दुष्ट दैत्यांची होती वहु खुरखुरती॥नेले गतिला त्वरितात्वरितीं ॥ चाल ॥ धन्य धन्य यशोदेवाई ॥ मनमोहन शेषशायी ॥ कुंजांत चारितो गायी ॥ परब्रह्म अशी मूर्ति दिसे आह्मांला ॥ सखे० ॥ ३ ॥ या कृष्णाची कैशी अघटित लीला ॥ काय सृष्टिक्रम निर्मीला ॥ त्या गोपींनीं यदुपति जो विनवीला ॥ शिव विधिनें जो वंदीला ॥ जेणें प्राणांतीं गजेंद्र तो रक्षीला ॥ दैत्यादिक नेले गतिला ॥ चाल ॥ ह्मणे गणपतिसुत पामर ऐसा ॥ भवसिंधू तरेल कैसा ॥ मी अज्ञान वालक ऐसा ॥ द्या दर्शन हो गोब्राह्मणप्रतिपाळा ॥ सखे० ॥ ४ ॥

## गाणें ६४ वें, कृष्णाचें.

चाल—( नंदगृहाच्याजवळ मुलींनों. )

जन्मापासुन तुजसांगातीं ॥ खेळ खेळलों सोडुनि भ्रांती ॥ नाहिं तुज याची वाटत खंती ॥ गेले श्रम वायां ॥ वाटतें० ॥ अ० क० ॥ जाउं नको रे कृष्णा सखया ॥ सोडुनि अशि माया ॥ वरी कीं ॥ १ ॥ गोकुळ नगरी सोडुनि आतां ॥ काय मिळविशी मथुरे जातां ॥ सोडुनि अमुची सर्वहि चिंता ॥ गेले श्रम वायां ॥ वा० ॥ जाउं

नको रे० ॥ २ ॥ सासुरवासी अह्मी व्रजनारी ॥ विलास केला अजवरि भारी ॥ ठेवुनि चित्त तुजवर हारी ॥ पाहसि बुडवाया आह्मांला ॥ जाउं नको रे० ॥३॥ आज आह्मांवर ईश्वर कोपे ॥ विषयसुखाचा ग्रंथ हा सोंपे ॥ न कळे यदुराया ॥ सांवळिया ॥ जाउं नको रे० ॥ ४ ॥ हें काय कपट्या ऐसें करिशी ॥ राम सितेला धाडि वनासी ॥ अन्याय रे नसतां ॥ तिळभरी ॥ जाउं नको रे० ॥ ५ ॥

## गाणें ६५ वें, कृष्णाचें.

चाल–( कमलवदनारविंदाक्षा. )

विपरित काळ हा आह्मावरी आला ॥ अक्रूर येउनी अमुचा प्रभू नेला ॥ बघुनी शामसुंदरशा स्वरूपाला ॥ चाल ॥ दिवस रजनी ॥ चक्रपाणी आठवि स्वमनीं ॥ कुणी जा गे आणा त्याला ॥ श्रीकृष्णाला ॥ अ० क० ॥ कसा हा संग कुब्जेचा तया रुचला ॥ यदुपति सोडुनी आह्मां दुरी गेला ॥ १ ॥ विरह–अनळें करुन तनुही बहू तापे ॥ कसा जगदीश परमात्मा अह्मां कोपे ॥ पहा हा सूर्य गोकुळिं या क्षणीं लोपे ॥ चाल ॥ नदीपुलिनीं ॥ मिटति नलिनी ॥ आलि रजनी ॥ अहा चंद्रा शितल करिसी मनुजाला ॥ कसा हा०॥२॥ युगसम

वाटते घटका सखे गडणी ॥ सुदृढ संबंध पूर्वींचा जरी असुनी ॥ भला कपटी कसा गेला व्रजा त्यजुनी ॥ चाल ॥ श्रीरंगा ॥ कोमलांगा ॥ चरणिं गंगा ॥ सतत वाहे सुमन तुळसीदला माला ॥ कसा हा० ॥ ३ ॥

## गाणें ६६ वें, रथ.

चाल–( कोण कुटिल तूं चोर जार कीं. )

प्रथम रथाचा ध्वज सखे मोठा ॥ दिसतो हा ग अक्रूर खोटा ॥ यानें आमुचा केला तोटा ॥ नसे आसरा दुसरा ॥ जागें या ॥ अ०क० ॥ नंदगृहाच्या जवळ मुलींनों दिसतो रथ दुसरा ॥ कुणाचा० ॥१॥ आला जेव्हां अक्रूर आला ॥ भ्यालों आह्मी बघुनी त्याला ॥ येउनि अमुचा प्राणचि नेला ॥ पदर तरी पसरा ॥ तयाला ॥ नंदगृहाच्या० ॥२॥ हरि गेल्यापासुनि लेणें नेसणें ॥ कांहिं सुचेना वेणी खिंचरणें ॥ कोठुन चंपक चंद्र पहाणें ॥ न करी सण दसरा ॥ कुणि जन ॥ नंदगृहाच्या० ॥ ३ ॥ उद्धव भाउजी प्रियानुसंगें ॥ वेढुनि वेष्टुनि प्रियानुरागें ॥ हरिचरणासि स्मरा ॥ गोपिंनों ॥ नंदगृहाच्या० ॥ ४ ॥

## गाणें ६७ वें, कृष्णाचें.

चाल—( नंदगृहाच्या जवळ मुलींनो. )

एक वदे श्रीहरिला नेतो ॥ बलरामहि त्यासंगें जातो ॥ उगिच वदे हरि सत्वर येतों ॥ जगणें कैशाला ॥ किं आतां ॥अ०क०॥ नंद यशोदे सदनिं सखे बाइ हा कोण रथवाला ॥ आला गे० ॥ १ ॥ अक्राभिध हा मथुरापुरिंचा ॥ परि दिसतो क्रूर वृषभ धुरीचा ॥ काढुन नेतो हरि हा उरिंचा ॥ आकांत झाला ॥ किं तेव्हां ॥ नंद यशोदे ॥ २ ॥ घेजा प्राण अशा त्या कामीं ॥ विलाप करिती राजारामीं ॥ प्रासादिक हे शोक वदेन मी ॥ त्यांनीं जो केला ॥ तेव्हां कीं ॥ नंद यशोदे० ॥ ३ ॥

## गाण ६८ वें, पलंग.

परमेष्टी नाभिकमळीं गोवर्धन धरिला बोटीं ॥ कंसारी मन्मथजनका ब्रह्मांड जयाचे पोटीं ॥ घेतिला अवतार ज्यांनीं, जननी जठरासि नमनीं ॥ पांडवांसि विजयि करोनि ऐशा परि खेळ जयाचा ॥ अ० क० ॥ सखयांनों तो हरि अमुचा ॥ शेषाचा पलंग ज्याचा ॥ १ ॥ पाताळीं बळिच्या सदनीं, द्वारपाळ होउन राहे ॥ सद्भावी मित्र सुदामा भेटीसि नेले पोहे ॥ लागली आवड मोठी कुब्जेच्या सदनीं

राहे ॥ न कळे हा भाव जयाचा ॥ शेषाचा०॥ २ ॥ द्रौपदीलागीं वस्त्रें पुरविलीं शत्रुसभेसी ॥ ऋषि आले अर्ध्या रात्रीं भोजन मागावयासी ॥ पार्थाचीं धुतलीं घोडीं उच्छिष्ट ऋषींचीं काढी ॥ खिल्लारी नंदा घरचा ॥ शेषाचा० ॥ ३ ॥ खेळतां उडाला चेंडू तो पडला यमुनाडोहीं ॥ आनंदें होतो गजर गजर तो यमुने ठायीं ॥ हातिंचा तुं सोडुन देशी पदरासी सोडित नाहीं ॥ भ्रांतिनें नाकळे मनिंचा ॥ शेषाचा पलंग० ॥ ४ ॥

## गाणें ६९ वें, उद्धव.

चाल—( उद्धवा शांतवन कर जा. )

उद्धवा जन्मला येथें हरि पाहे त्याची न्हाणी ॥ या स्थळीं घातलें पायीं कृष्णाशीं उष्ण मी पाणी ॥ ऐकुनी हरीसी छळिलें गोपींचीं बहुत गाऱ्हाणीं ॥ चाल ॥ पाठविला धेनूपाठीं ॥ ही त्याचि घागडी काठी ॥ घालितां जेवुं या ताटीं ॥ वदला मज पान्हा पाजा ॥अ० क०॥ उद्धवा सुखी आहे कीं मनमोहन तो हरि माझा ॥ १ ॥ मृत्तिका भक्षितां मज कीं धावुनियां लगबग जातां॥धावुनियां धरितां वदला आइ मजला सोडी आतां॥परि मारीं उखळीं बांधीं कैशी मी निष्ठुर माता ॥ चाल ॥ तें दुःख आतां ओसणतें ॥ स्मरतां मनिं हृदयीं हणतें ॥ दुष्ट या भूमिवर

ह्मणतें ॥ अशि नसेल दुसरी भाजा ॥ उद्धवा० ॥२॥ अवरेना दुःख नंदासी हंबरडा फोडुनि बोले ॥ उद्धवा केवळ अमुचें गोकुळिचें भूषण गेलें ॥ अक्रुरें दुष्टें कैसें मोहक मज करुनी नेलें ॥ चाल ॥ उठ जेवी आतां नंदा ॥ ह्मणे कोण अभाग्या मंदा ॥ बोळवितां मी गोविंदा ॥ वदला मज मागें जा जा ॥ उद्धवा० ॥३॥ त्या गोकुळिंच्या व्रजनारी उद्धवासि बोलति भारी ॥ मथुरेसि ठेवुनि कंसारी अपुली आली का स्वारी ॥ हा प्राण आहे तों यावें हें कळवा त्या अविकारी ॥ चाल ॥ तो कृष्णाचि राजारामीं ॥ पाववी प्रसादिक धार्मीं ॥ राहिला स्वसुखविश्रामी ॥ मथुरेचा होउन राजा ॥ उद्धवा० ॥ ४ ॥

## गाणें ७० वें, उद्धव.

चाल —( त्यासि नाहिं प्रीय कोणि मजवांचुनी. )

उद्धवजी या गोकुळांत काय करावें ॥ हरीविण दीन आह्मी कोण स्मरावें ॥ ऐसें वाटतें किं जहर घेउन मरावें ॥ घडोघडी दुःख बहू होतसे जिवा ॥ अ० क० ॥ हरीवीण धीर धरवेना रे उद्धवा ॥ जाउनि मथुरेसि घेउनि यावें माधवा ॥ हरी० ॥१॥ वेणिफणी काजळ कुंकु त्यागिलें जरी ॥ उद्धवराज गोष्ट हरिचि सांगाही बरी ॥ मंदिरांत बाळ माझें रडतसे जरी ॥ नवस करुन शांतविलें पूजिलें देवा ॥

हरी० ॥ २ ॥ हरि गेल्यापासुनिया गोकुळ सुनें ॥ वृंदावानिं वृक्ष पक्षि सुकलीं वनें ॥ धेनु घेइनात चारा श्रीहरीविणें ॥ शून्य दिसे गोकुळ मज दावि यादवा ॥ हरी० ॥ ३ ॥ गोकुळांत गोपी दीन होउन बैसती ॥ आले उद्धवराज त्यास काय पूसती ॥ कुब्जेच्या रत्नगृहीं आहे किं श्रीपती ॥ रोड कशी गोड झालि तूज केशवा ॥ हरी० ॥ ४ ॥

## गाण ७१ वें, उद्धव.

सुखसमुद्रीं आह्मी बुडालों पडलों भवसागरीं ॥ उद्धवा हो ॥पडलों०॥ आह्मांवर निष्ठुर झाला हरी ॥ देहांत पेटला डोंब लागला वणवा सर्वांतरीं ॥ उद्धवा हो ॥वणवा०॥ प्राण व्याकुळ मीनाचे परी ॥ अ० क०॥अशामध्यें तूं संधि साधुनी जा लवकरि उद्धवा॥ मथुरेशीं ॥ जा लवकरि० ॥ प्राण वांचवा हरी भेटवा ॥ १ ॥ अघटित करणी केलि उद्धवा अक्रुर जेव्हां आला ॥ उद्धवा ॥ अक्रुर० ॥ त्यांनीं मतलब कैसा केला ॥ कानगोष्ट ही करून हरिशीं बळेंच फुसलाविला ॥ उद्धवा ॥ बळेंच० ॥ एकाएकीं नेउन रथीं बसविला ॥ ममता लटकी लावुन अमुचा कृष्णानें गळा कापिला ॥ उद्धवा ॥ कृष्णानें०॥ आह्मांवर घाला कैसा घातला ॥ इष्ट गोष्टही स्पष्ट सांगतों अवघी चरित माधवा ॥ उद्धवा ॥अवघी०॥ प्राण वांचवा ॥२॥

झालें आतां निर्वाण प्राण कसे हरिले दामोदरा ॥ उद्धवा ॥ हरिले० ॥ सांड कां केलित विश्वंभरा॥ढक-लुनि आडामध्यें आह्मां मधेंच तोडिला दोरा ॥ कपट्याहुन कपटी खरा ॥ अशामधें० ॥ ३ ॥

## गाणें ७२ वें, रुक्मिणीस्वयंवर.

चाल-( हें रे काय बाल मुकुंदा. )

धाडुनी सुदेव द्विजाला ॥ पत्रिका घेउनी द्वारा-वतिला ॥ भाव मनींचा लिहिला ॥ शरण असें तव पदकमलाला ॥ झडकरी ये घननीळा ॥ सोडवीं मजला दीनदयाळा ॥ अ० क० ॥ बंधू दे मज शिशुपाळा॥इच्छीत वर मी तुज गोपाळा ॥ बंधू दे० ॥ १ ॥ ह्मणसि ही जरी नृपबाळा ॥ पाठविलें कां मज लिखिताला ॥ हा दोष कुलधर्माला ॥ वाटेल तुजला परि ही अबला ॥ जरी भाळीं चैद्येश लिहिला ॥ विधिनें परि मी न वरीं तयाला ॥ बंधू दे० ॥२॥ ही कन्या जरि नृपतीची ॥ ह्मणसिल मग करिं येइल कैची ॥ पूजा जगदंबेची ॥ करिन मी येतां घडि लग्नाची ॥ इच्छा जननीपित्याची ॥ तव करिं मजला अर्पायाची ॥ बंधू दे० ॥ ३ ॥ भ्रांति पडे मदनाला ॥ पाहुनिया तव मुखचंद्राला ॥ चातक जिव हा झाला ॥ पाणिग्रहणीं वर्ष घनाला ॥ करुनी

राक्षसाविधिला ॥ घेउनि जा मज मोक्षपुरीला ॥ बंधू दे० ॥ ४ ॥ येशि न या समयाला ॥ श्रीरंगा ऐके एक पणाला ॥ हा देहे अर्पण केला ॥ तव पदिं रक्षि उपेक्षी याला ॥ पणीं न मी अन्याला ॥ येइल तें करि तव चित्ताला ॥ बंधू दे०॥५॥ पत्रिका देखुनी नयनीं ॥ अंतरीं गहिंवरे शारंगपाणी ॥ प्रेमें हृदय भरोनी ॥ चैन नसे मग निज सुखशयनीं ॥ रथ वेगें सिद्ध करोनी ॥ जाइ त्वरें न सरतां रजनी ॥ रुक्मिणीहरण करोनी ॥ विजयी झाले यदुकुळ-दिनमणी ॥ गंगा विनवित चरणीं ॥ सोडवि या भवसंसारांतुनी ॥ बंधू दे० ॥ ६ ॥

## गाणें ७२ वें, रुक्मिणीस्वयंवर.

चाल-( रामा तुमच्या दर्शना मि योग्य नाहिं का. )

वरिलें निज प्रेमें तुला येइ यदुविरा ॥ देतो मम बंधु मला चैद्य नृपवरा ॥ अ० क० ॥ लग्नसमय समिप तरी ॥ येइ त्वरित मजासि वरी ॥ तत्पर शिशु-पाल जरी ॥ नच मन्मन त्यासि वरी ॥ प्राण हरीनें न वरी नवरि त्या वरा ॥ वरिलें० ॥१॥ लिखितार्थी हाचि भाव ॥ धरिली तव चरणिं हाव ॥ यास्तव तो द्विज सुदेव ॥ प्रेषितसें करि ही कींव ॥ करुणा करि त्वरित धांव पाव श्रीधरा ॥वरिलें०॥२॥

लग्नाआधिं हाचि नेम ॥ पुजित अंबिकेस सुरम ॥ तीच संधि धरुनि सुगम ॥ येउन हरी मज तुं परम ॥ चैद्यादिकां येउनि आधिं ग्रहण करि करा ॥ वरिलें० ॥३॥ विनय भावि सदय हरी ॥ येई कौंडिन्यपुरीं ॥ घेइ रथीं वधुहि बरी ॥ आलिंगुनि हृदयिं धरी ॥ पाहुनि मति खवळ वीरीं ऊठला पुरा ॥ वरिलें० ॥ ४ ॥ हरुनि चैद्यमागधांसि ॥ त्रिटंबूनि अग्रजासी ॥ रुक्मिणि वरि संभ्रमेंसी ॥ सौख्य सकल सुरनरांसी ॥ जगन्नाथ स्मरी मनासी त्याच वधुवरा ॥ वरिलें० ॥ ५ ॥

## गाणें ७४ वें, रुक्मिणीस्वयंवर.

शुभांगे तुला वराया विबुधोद्यानवसंत ॥ आला भगवंत ॥ अ० क० ॥ पैल हा गरुडध्वज झळके ॥ यादववीर अनंत ॥ आला० ॥१॥ पत्र तुझें पाहतां घाबरला ॥ क्षणभर नाहिं उसंत ॥ हरीला ॥क्षण०॥ आला० ॥ २ ॥ वरिल तुला जगदीश्वर ज्यातें ॥ शुकसनकादिक संत ॥ वंदिती ॥ शुक० ॥ आला० ॥ ३ ॥ नाभी नाभी स्वभीं जल्पे ॥ त्रिभुवनिंचा श्रीमंत ॥ हरी तो ॥ त्रिभु० ॥ आला० ॥ ४ ॥ अंबे सेवी एकाजनार्दनीं ॥ तुज प्रभू तो महंत ॥ त्र्यंबक॥ तुज० ॥ आला० ॥ ५ ॥

## गाणें ७५ वें, रुक्मिणीस्वयंवर.

ऐकूनी सुंदरा कोणाचे हो देशीं ॥ हरी मम हृदयीं मानस ध्याये ॥ अ० क० ॥ पत्र हें लवकर न्यावें ॥ यदुविरासी तुह्मी द्यावें ॥ १ ॥ मम मानसीं आवडी ऐसी ॥ विनती ही माझी शाश्वत राहे ॥ पत्र० ॥ २ ॥ कमलदलाक्षा तुपची ही कांता ॥ शिशुपाळ नेइल सत्वर यावें ॥ पत्र० ॥ ३ ॥ मिळुनीया सर्वहि यादवसेना ॥ अंबिकेच्या देऊळीं येउन रहावें ॥ पत्र० ॥ ४ ॥

## गाणें ७६ वें, रुक्मिणीस्वयंवर.

धिक्कारुनी मातापिता ॥ निंदियलें कृष्णनाथा ॥ आणवुनी चैद्यसूता ॥ बंधु भ्रमला ॥ आज हो० ॥ बंधु० ॥ अ० क० ॥ श्रीरंग पती म्यां मनें वरिला ॥ आज० ॥ मनें० ॥ शिशुपाळ वर मज न मानला ॥ श्रीरंग० ॥१॥ पाचारुनी सुदेवासी ॥ पाठविलें द्वारावतिसी ॥ पत्र पाहुनी हृषीकेशी ॥ त्वरें पातला ॥ आज० ॥ त्वरें० ॥ श्रीरंग० ॥ २ ॥ सुदेवासि धाडूनीया ॥ पातलीसे अंबालया ॥ भावें भक्ती पूजूनीया ॥ हार दीधला ॥ जननिनें ॥ हार० ॥ श्रीरंग० ॥ ॥३॥ करूनिया पाणिग्रहण ॥ विरा घातलेंसे मौन ॥

लग्नाआधिं हाचि नेम ॥ पुजित अंबिकेस सुरम ॥ तीच संधि धरुनि सुगम ॥ येउन हरी मज तुं परम ॥ चैद्यादिकां येउनि आधिं ग्रहण करि करा ॥ वरिलें० ॥३॥ विनय भावि सदय हरी ॥ येई कौंडिन्यपुरीं ॥ घेइ रथीं वधुहि बरी ॥ आलिंगुनि हृदयिं धरी ॥ पाहुनि मति खवळ वीरीं ऊठला पुरा ॥ वरिलें० ॥ ४ ॥ हरुनि चैद्यमागधांसि ॥ त्रिटंबूनि अग्रजासी ॥ रुक्मिणि वरि संभ्रमेंसी ॥ सौख्य सकल सुरनरांसी ॥ जगन्नाथ स्मरी मनासी त्याच वधुवरा ॥ वरिलें० ॥ ५ ॥

## गाणें ७४ वें, रुक्मिणीस्वयंवर.

शुभांगे तुला वराया विबुधोद्यानवसंत ॥ आला भगवंत ॥ अ० क० ॥ पैल हा गरुडध्वज झळके ॥ यादववीर अनंत ॥ आला० ॥१॥ पत्र तुझें पाहतां घावरला ॥ क्षणभर नाहिं उसंत ॥ हरीला ॥क्षण०॥ आला० ॥ २ ॥ वरिल तुला जगदीश्वर ज्यातें ॥ शुकसनकादिक संत ॥ वंदिती ॥ शुक० ॥ आला० ॥ ३ ॥ नाभी नाभी स्वर्शी जल्पे ॥ त्रिभुवनिंचा श्रीमंत ॥ हरी तो ॥ त्रिभु० ॥ आला० ॥ ४ ॥ अंबे सेवी एकाजनार्दनीं ॥ तुज प्रभू तो महंत ॥ त्र्यंबकीं तुज० ॥ आला० ॥ ५ ॥

## गाणें ७५ वें, रुक्मिणीस्वयंवर.

ऐकूनी सुंदरा कोणाचे हो देशीं ॥ हरी मम हृदयीं मानस ध्याये ॥ अ० क० ॥ पत्र हें लवकर न्यावें ॥ यदुविरासी तुह्मी द्यावें ॥ १ ॥ मम मानसीं आवडी ऐसी ॥ विनती ही माझी शाश्वत राहे ॥ पत्र० ॥ २ ॥ कमलदलाक्षा तुपची ही कांता ॥ शिशुपाल नेइल सत्वर यावें ॥ पत्र० ॥ ३ ॥ मिळुनीया सर्वहि यादवसेना ॥ अंबिकेच्या देऊळीं येउन रहावें ॥ पत्र० ॥ ४ ॥

## गाणें ७६ वें, रुक्मिणीस्वयंवर.

धिक्कारुनी मातापिता ॥ निंदियलें कृष्णनाथा ॥ आणवुनी चैद्यसूता ॥ बंधु भ्रमला ॥ आज हो० ॥ बंधु० ॥ अ० क० ॥ श्रीरंग पती म्यां मनें वरिला ॥ आज० ॥ मनें० ॥ शिशुपाळ वर मज न मानला ॥ श्रीरंग० ॥१॥ पाचारुनी सुदेवासी ॥ पाठविलें द्वारावतिसी ॥ पत्र पाहुनी हृषीकेशी ॥ त्वरें पातला ॥ आज० ॥ त्वरें० ॥ श्रीरंग० ॥ २ ॥ सुदेवासि धाडूनीया ॥ पातलीसे अंबालया ॥ भावें भक्ती पूजूनीया ॥ हार दीधला ॥ जननिनें ॥ हार० ॥ श्रीरंग० ॥ ॥३॥ करूनिया पाणिग्रहण ॥ विरा घातलेंसे मौन ॥

आड करुनि सुदर्शन ॥ रथ लोटिला ॥ त्वरेनें ॥ रथ०
॥ श्रीरंग० ॥ ४ ॥

## गाणें ७७ वें, तुळसरुक्मिणीचें भांडण.

चाल—( शरदृतू गोड चांदणें. )

रुक्मिणी ह्मणे ग ऐक, तुळसीबाळा ॥ नसे सुगंध मुळीं तुजवरती हिरवा पाला ॥ भुलविलेंस कसें, कवटाळिगि गोपाळाला ॥ प्रतिवर्षिं हरीशीं, लाविलसे लग्नाला ॥ मारुन जालंदरनाथ, झालिस योगीनी ॥ अ० क० ॥ बोलती एकमेकींचें, वर्म काढूनी ॥ भांडती दोघि जणि सवती, तुळस रुक्मिणी ॥ बोलती ॥ १ ॥ तूळस ह्मणे ग ऐक, रुक्मिणी साजणी ॥ ऐकतें तुझ्या मी, कीर्ति मुळापासोनी ॥ वरिलेंस कसें गोपाळा, शिशुपाळा त्यजुनी ॥ आणिला हरी तूं, पत्रिका धाडूनी ॥ विटंबून बंधु रुक्मया, बसलिस स्वस्थानीं ॥ बोलती० ॥ २ ॥ रुक्मिणी ह्मणे ग सवति, परति हो आतां ॥ होतीस कोणीकडे, न कळे तुझी मुळवार्ता ॥ उपजून स्मशानीं आलिस, हरिच्या हाता ॥ कुळ गोत्र नसे तुज, कोण तुला निमिंता ॥ बैसून शिरीं विष्णुच्या लागलिस कानीं ॥ बोलती० ॥ ३ ॥ तूळस ह्मणे ग सवति, किती जल्पसी ॥ दिलें दान नारदा भामेनें कृष्णासी ॥ ओतिल्या तुळेवर

कितिक, धनाच्या राशी ॥ आगिला हरी तूं एका तुळसीपत्रासी ॥ गुरुदास ह्मणे समतोल, झाल्या भांडुनी ॥ बोलती० ॥ ४ ॥

## गाणें ७८ वें, कृष्णरुक्मिणीसंवाद.

चाल—( सुंदरी काय करित आहे. )

रुक्मीण ह्मणते कृष्णाला ॥ आज कां राधेगृहिं गेलां ॥ सोळा सहस्र आठजणी ॥ यांची केली धुळधाणी ॥ लागलां राधेचे ध्यानीं ॥ चेटकी आली कोठूनी ॥ चाल ॥ एवढी प्रीती माझ्यावरती कसे निष्ठुर झालां ॥ आज कां० ॥ १ ॥ कृष्ण ह्मणे ग रुक्मिणी ॥ होतों पांडवां सदनीं ॥ प्रतिज्ञा केली भीष्मांनीं ॥ निःपांडवी करिन धरणी ॥ चाल ॥ उदयिक मारिन पांडवांना वाटे न जीवाला ॥ आज ॥ २ ॥ कृष्णा ह्मणते रुक्मिणी ॥ वाढलां गवळ्याचे सदनीं ॥ भक्षिलें दहीं दुध चोरोनी ॥ सोडिलें गोकुळ हलवूनी ॥ चाल ॥ ब्रह्मचारी ह्मणती याला वाटे न तुह्मांला ॥ आज० ॥ ३ ॥ कृष्ण बोले मृगनयना ॥ नको करूं माझ्या अपमाना ॥ दाविल्या अंतरींच्या खुणा ॥ समाधी गेली लागून ॥ दासी ह्मणते तव चरणाला देहअर्पण केला ॥ आज० ॥ ४ ॥

## गाणें ७९ वें, कांकण.

काजळ कुंकू हळद लागली तुह्मां कुठुन श्रीपती ॥

हरी हो तुह्मां० ॥ तुमच्या मंचकावरी रात्रिची कोण निजली सखी ॥ पैठणि पातळ चोळि अंजिरी मेंदि लाविली नखीं ॥ हरी हो ॥ मेंदि० ॥ झारी उदकाची भरुन ठेविली तबकिं पेढे बरफी ॥ वेळा लवंगा पिकलीं पानें वर्ख सुपारी चिकण ॥ हरी हो ॥ वर्ख० ॥ अ० क० ॥ तुमचे अंगीं हुतलें सांगा कोणाचें कांकण ॥ कमललोचना पुतनाशोषणा प्रभुच्या हृदयीं खुण ॥ तुमचे० ॥ १ ॥ रुक्मिणि बाळे ऐक वेल्हाळे गूज सांगतों तुला ॥ सखे ग गूज० ॥ अंधपुत्रानें सभेसि आणिलें छळिलें द्रौपदिला ॥ लगबगीनें धावुन गेलों आलिंगीली तिला ॥ सखे ग आ० ॥ काजळ कुंकू तिचें लागलें मुख पुसलें पदराला ॥ माझ्या अंगीं उमटली तिच्या गोटतोड्यांची खूण ॥ तुमचे अंगीं० ॥ २ ॥ चंदन सुवासिक अत्तर अर्गजा वास तुमच्या अंगाला ॥ हरी हो वास० ॥ धुंद कशानें होउन गेलां मुखीं विडा रंगला ॥ हरित पीतशी तुमच्या अंगीं खुण ही दिसते मला ॥ नाना परिचीं करुनि भाषणें ठकवीतां हो मला ॥ सोळा सहस्र कामिनी असतां मंचकिं आणिली कोण ॥ तु० ॥ ३ ॥ ऐक रुक्मिणी प्रभुच्या वचनीं विश्वास ठेवुनी ॥ सखे ग वि० ॥ राजसूययज्ञामध्यें अग्रपूजा केली होती धर्मांनीं ॥ चंपक केतकि मालति शेवंती हार गळां घालुनी ॥ आलि

सुभद्रा भेटलि मजला दिला विडा करुनी ॥ श्रम वहु झाले नेत्र धुंदले झोंप नाहिं ह्मणून ॥ तुमचे०॥४॥ शामसुंदरा भामावरा दासि तुझी इंदिरा ॥ दीनानाथा करितें स्तूती परात्पर सोयरा ॥ नारदमुनीजन तुज ध्याती सदा योगी जन ॥ तुमचे० ॥ ५ ॥

## गाणें ८० वें, कृष्णरुक्मिणीविनोद.

एके दिशीं मंचकावरी, जवळ सुंदरी रुक्मिणी सती ॥ आनंदसागरीं क्रीडा करून दिला विडा हरीच्या हतीं ॥ न्याहाळून पाहे गोपाळा वर्ण दिसे काळा आली काय चित्तीं ॥ जसा माझा गोरा रंग नाहीं श्रीरंग शुभ्रा आकृती ॥ सर्वगुणसंपन्न जगामध्यें धन्य विश्व बोलती ॥ एका गुणें रूप आहे उणें संचिता ह्मणे कर्माची गती ॥ ती पतिव्रता आदिमाया व्यर्थ गेली वाया बोलली विटून ॥ जगमाता परमेश्वर त्याचे अंतरीं न कळेल कुठून ॥चाल॥ भीमकीहृदयिं कल्पना अशी आली हो ॥ सर्वसाक्षि तो हरीनें परीक्षा केली हो ॥ गुप्त खुण दावून हासून बोले श्रीकांत गौळी धादांत पती केला येऊन ॥ ॥ अ० क० ॥ श्रीकृष्ण ह्मणे रुक्मिणी ऐक पद्मिणी स्वरूप तुझें पाहून ॥ राजांच्या पडल्या मिठी अशा संकटीं आलों आह्मी धावून ॥ १ ॥ लावण्य रूप

राजसे स्वरुप तुझें दिसे राजे आले चालून ॥ सकळांत मागधेश्वर आणिक आले वर प्रतिज्ञा बोलून ॥ एकाहून एक बळी रणाचे फळी बाण मेखळून ॥ आह्मांस करावें ठार चहुकडुन मार ह्मणती द्या झेलुन ॥ आले अंग वंग राव कलिंग बळाचे धिंग कवच अंगीं घालून ॥ झाली साह्य मला भगवती दिलें तुला हातीं पडलि सारी भुलून ॥ चाल ॥ युद्ध संग्रामीं दुष्टांनीं वल्गना केल्या ग ॥ प्रिये तुजसाठीं मनास नाहिं आणिल्या ग ॥ आजुन सावध हो तरी होंचि अंतरीं द्या ह्मणे शोधून ॥ श्रीकृष्ण० ॥ २ ॥ तूं राजयाची सुकुमार स्वरुप अनिवार दुसरी नाहिं जगांत ॥ ब्रह्मयानें घडिली तुला जोडा नाहिं दिला असा बोले रागांत ॥ आह्मी काय केली बळजोरी सांग तुजवरी आमचा नाहिं प्रघात ॥ केलि जतन पत्रिका अजुन बदलशिल ह्मणुन सुदेव आहे दोघांत ॥ चाल ॥ ऐशी केली शब्दाची पुरवणी ग ॥ आणिन ह्मणे गोवळा आज रणीं ग ॥ गोपाळांसवें नाचलों मोठा पोसलों उच्छिष्टं खाऊन ॥ श्रीकृष्ण० ॥ ३ ॥ तूं राजयाची कन्या जगामध्यें धन्य ऐक रुक्मिणी ॥ रानट आह्मी गोवळे गोधनें चारिलीं वनीं ॥ चोरिच्या ख्याति ऐकिल्या कीर्ति जाहल्या आल्या तव कानीं ॥ निर्वाण शब्द ऐकुनी पडली त्या

क्षणीं मंचकावरून ॥ थरथरा कंप सूटला बोल खुंटला मनीं गेली चिरून ॥ व्याकूळ कांहीं सुचेना बोल रुचेना नेत्र आले भरून ॥ शरिराची विसरली दशा पाहे जगदिशाकडे ती स्मरून ॥ हा सकळ जगाचा नाथ आणि ध्यानांत पोटासी धरून ॥ ह्मणे नको रुसुं वद हसून कधीं आजपासून न बोले फिरून ॥ चाल ॥ समजाविली रुक्मिणी पट्टराणी हो ॥ वदन कुरवाळी श्रीहरी चक्रपाणी हो ॥ तूं अमुची प्राणेश्वरी विनोद मस्करी केली सहज बोलून ॥ श्रीकृष्ण० ॥ ४ ॥

## गाणें ८१ वें, विनोद २ रा.

कोणे दिवशीं विनोदानें हरिशीं बोले रुक्मिणी ॥ कृपा करोनी आधीं सांगा विडा देइन मग शयनीं ॥ ॥ अ० क० ॥ तुह्मी थोराचे आहां परंतु काळे कां हो मी गोरी ॥ १ ॥ हरी ह्मणे मज नंद राणिनें काळें लाविलें गालाला ॥ नाहीं पुशिलें तसेंच राहिलें गुंतलों भक्ता काजाला ॥ तुह्मी० ॥२॥ हरी ह्मणे ग ऐक रुक्मिणी गळां तुळशी जड झाल्या ॥ मम प्रिय तूं पूर्व जाणिलें भ्रतार न ये तव मना ॥ तुह्मी०॥३॥ हरी ह्मणे मी सुत गवळ्याचा मजवर धुरळा त्रिभुवनिंचा ॥ शिशुपाळ हा वर योग्य तुज नाहीं गडे

मी कामावा ॥ तुह्मी०॥४॥ क्रोध न आवरे भीमक-
बाळी तेव्हां मूर्च्छागत पडली ॥ श्रीहरीसी आला
कळवळा कुटिल कुंतल सांवरी ॥ तुह्मी० ॥ ५ ॥

## गाणें ८२ वें, विनोद ३ रा.

एकल तुह्मी सोळा सहस्रांत ॥ काळ क्रमितां
आनंदांत ॥ अष्ट नायका मज रुक्मिणिसहित ॥
हर्ष आनंद सर्वांत ॥ सत्यभामेनें पाहून ब्रह्मसुत ॥
तुमचें दान दिलें सत्य ॥ तिच्या बापाचें तिला बळ
बहुत ॥ ह्मणून काय करिल भलतं सलतं ॥ पारि-
जातक तिच्याच अंगणांत ॥ आह्मांला फूल होइना
प्राप्त ॥ चाल ॥ अह्मी इतुक्या जणी ॥ सोळा सहस्र
कामिनी ॥ वरकड या आठजणी ॥ पट्टराणी मी
रुक्मिणी ॥ दान देते भामा धनी ॥ कां पणिल्यात
व्यर्थ वाया ॥अ० क०॥ मजवर नसे तुमची माया ॥
विनोदें बोले भीमकतनया ॥ मजवर०॥ १ ॥ कश्यप
ऋषिला तेरा जणी असती ॥ त्यांत कद्रूनें केली
ख्याती ॥ रथाचा घोडा वळेंच धरवी ती ॥ नेऊन
कद्रूला दाखवी ती ॥ नेत्र उघडूनी पाहे माझे
सवती ॥ कशाला वटिक होऊन राहती ॥ सती
ना गती गुणा न वर्णीती ॥ जारिणीचे दारीं हत्ती ॥
॥ चाल ॥ मत्सरामुळें ॥ नित्य होतसे खळखळ ॥ त्या-

वर स्वामीचें बळ ॥ ह्या घराच्या कोण परि ह्या ॥ मजवर० ॥ २ ॥ मग तो श्रीहरी रुक्मिणीस बोले ॥ तुझ्या मनींचें मला कळलें ॥ भीमकरायानें पंचांग उकलीलें ॥ गणित शिशुपाळास धरिलें ॥ जरासंधादी राजे मीळविले ॥ तूं कां मला पत्र लिहिलें ॥ सुदेव ब्राह्मणा व्यर्थ श्रमवीलें ॥ श्रमाचें सार्थक नाहीं झालें ॥ चाल ॥ दुबळा पती ॥ लिहिला तुझ्या ग संचितीं ॥ मी नाहीं पृथ्वीपती ॥ आहें अर्जुनाचा सारथी ॥ त्याचे अश्व धूया ॥ मजवर० ॥ ३ ॥ मग ती रुक्मिणी मूर्च्छागत पडली ॥ हरी ह्मणे मज अवकळा घडली ॥ झारी उदकाची भरून आणविली ॥ मुख प्रक्षाळून वारा घाली ॥ पट्टराणी ही अंकीं घेतीयेली ॥ नेउनि मंचकीं बैसवीली ॥ ह्या सत्यासी गुरुराज वाली ॥ त्यासी दंडवत घाली ॥ चाल ॥ अवीर विरंग ॥ झाला संशयाचा भंग ॥ प्रपंच नाशी तुमचें अंग ॥ असो कृष्णराया ॥ मजवर० ॥ ४ ॥

## गाणें ८३ वें, भामाविनोद.

चारि प्रहर रात्र वेजार वाट पहातांना ॥ रंगमहालिं शेज केलि मनमोहना ॥ जाइ जुई कळ्या पिवळ्या चाफा दवणा ॥ केले तुरे हार गजरे

पहाना ॥ तबकांत भरुनि साहित्य अर्गजा चुना ॥ अतां येतिल घडी येतिल उभी अंगना ॥ चाल ॥ असें करितां मम चित्तीं सुख वाटेना ॥ कांहीं केल्या दिवस उगवतां उगवेना ॥ झालि पहाट लाल घनदाट तेज अंबरीं ॥ अ० क० ॥ तुम्ही कां हो नित्य हिंडतां परक्या घरीं ॥ आम्ही आठ जणी असतां म्हणे सत्यभामा सुंदरी ॥ तुह्मी० ॥ १ ॥ वनमाळि तुह्मी गोकुळीं बाळपणीं ॥ केले सोहाळे ते चाळे तुमचे मनीं ॥ कालरात्रिं कोणा स्त्रियेच्या जाउन सदनीं ॥ हृदय कोमळ जवमाळ रुतला मणी ॥ चाल ॥ हारु तुटला तुऱ्याची झाली गाळणी ॥ विडा कुठला सुगंध सुटला उंची कस्तुरी ॥ तुह्मी ॥ २ ॥ वेताल रात्रीं बेहाल शिणलों निशीं ॥ रवि उदयीं लवलाहीं आलों तुजपाशीं ॥ शब्दांत शब्द चुराई झाली कशी ॥ उपमेला भ्रमराला कमलिन जशी ॥ चाल ॥ सत्यभामा सेवेला उभी दासी ॥ करिं धरुनी एकांतीं नोलि शेजेसी ॥ पुष्करास वाहिन तुरा नागसा वरी ॥ तुह्मी० ॥ ३ ॥ उद्धवासहित बागेंत गेलों उप-वनीं ॥ दूत धाडुन शोध काढुन आणावा कुणी ॥ त्याहि वेळिं जाइच्या स्थळीं पर्जन्य चहुकोनीं ॥ थोर बुंद अंगिं सुगंध ह्मणुनी ॥चाल॥ शेला भिजला उटी गेली वाहुनी ॥ विडा कुठला सुगंध सुटला उंची कस्तुरी ॥ तुह्मी० ॥ ४ ॥

# गाणें ८४ वें, वनमाळी.

नवजलदसुंदरतनूशाम, सुकुमार ग ॥ शाम० ॥ आजनभुजदंडकमल, नंद कुमार ग ॥ नंद० ॥ तो स्मरतां माझ्या मनीं प्रकटला स्मर ग ॥ प्रक० ॥ ॥ चाल ॥ तो सत्वर मजसी दावा ग ॥ कुणि दावा मुरलीरव करि तो मज दावा ग ॥ कुणि दावा ॥ तो चंद्र सूर्य तुल्य उदय करो ह्या काळिं ग ॥ अ० क० ॥ धांव धांव सखे जाइ आणि कृष्ण वनमाळि ग ॥ देव वनमाळि ॥ १ ॥ हा हार गळां वीकार भासतो आज ग ॥ भास० ॥ हा भार नगांचा अंगिं घातला साज ग ॥ घात० ॥ श्रीहरिच्या वियोगामुळें वाटते लाज ग ॥वाट०॥ चाल ॥ स्थिर शीत सूटला वारा ग ॥ हा वा० ॥ अंगिं लावि जशा तरवारा ग ॥ हा वा० ॥ मी मंदिरांत बसुन वाट त्याची न्याहाळिं ग त्याचीं० ॥ धांव धांव० ॥ २ ॥ ह्या कामभुजंगें मला दंश दृढ केला ग ॥ दंश० ॥ ह्या विषयीं विस्मय वाटे परी जड झाला ग ॥ परी ॥ गरुडध्वज गारुडी समयीं या गेला ग ॥ सम० ॥ चाल ॥ प्रिय वधु त्याचि मी राधा ग ॥ मी रा० ॥ कसा साहे न मम अपराधा ग ॥ अपराधा० ॥ त्याशिवाय उत्तम वैद्य नसे ह्या काळीं ग ॥ नसे० ॥ धांव धांव० ॥३॥ घरदार वंदिशाळ ही रुचेना कांहीं ग ॥ रुचेना० ॥

किती खेद करूं या जिवा होतसे लाही ग ।। होत० ।। मज शून्य झाल्या सखे दिशा ह्या दाही ग ।। दिशा ।।चाल।। हा कोकीळ कुणी तरी उठवा ग ।। कुणि० ।। मैलागिरि सागरिं बुडवा ग ।। कुणि० ।। मम तनू पोळवी इंगळापरी हि-याची जाळी ग ।। हि-या० ।। धांव धांव० ।। ४ ।। गोपाळ बाळ कनवाळु काळ कंसाचा ग ।। काळ० ।। परब्रह्म परिपूर्ण परमहंसाचा ग ।। पर० ।। त्याविणें भार वाटतो व्यर्थ जन्माचा ग ।। व्यर्थ ।। चाल ।। माझी लवते उजवी बाहे ग ।। वाई वा० ।। झाला शकून हर्ष वाहे ग ।। बाई वा० ।। आज हरी घरीं येणार सजाग दिवाळी ग ।। सजाग० ।। धांव धांव० ।। ५ ।। या दर्पणमहालीं केलि फुलांची शेज ग ।। फुलां० ।। दिलि मोत्यांची चांदणी पलंग मेज ग ।। पलंगा० ।। चहुंकडे लाविले दिव प्रकाशलें तेज ग ।। प्रका० ।। चाल ।। केलीं भोगसाधनें सारीं ग ।। वाई सा० ।। काय सार या संसारीं ग ।। संसारीं० ।। श्रीहरी सोडवील सखे अतां ह्या वेळीं ग अतां० ।। धांव धांव० ।। ६ ।। तें ऐकुन सखी गेली कृष्णाजी-पाशिं ग ।। राधेचि अवस्था कशी वर्णिली त्यासि ग ।। वर्णि० ।। श्रीरंगा घेउनी आली रंगमहालासि ग ।।रंग०।। चाल ।। घालि गळां राधेच्या पाणी ग वाई पाणी० ।। बोले तिजला मंजुळवाणी ग ।। वाई

वा० ॥ राधा यादवपतिला दीप ओंवाळि ग ॥ दीप० ॥ धांव धांव० ॥ ७ ॥

## गाणें ८५ वें, वनमाळी.

आज तुम्हांला हो कृष्णा उशिर कां हो लागला॥ तृषाक्रांत कां हो झालां असे कोठें भागलां ॥ मुखप्रभा दिसते पिवळी कोण्या सदनिं जागलां ॥ अपरात्रिं फिरतां तुम्ही भय नाहिं अंतरीं ॥ अ० क० ॥ आले वनमाळी रात्रीं सत्यभामे मंदिरीं ॥ पुसतसे स्वानंदें विनोदें परोपरी ॥ आले० ॥१॥ नाहीं कोठें गेलों होतों रुक्मिणीचे माहलीं ॥ पुष्पशेज पाहुनियां झोंप मला लागली ॥ अकस्मात जागा झालों तुझी स्मृती जाहली ॥ ह्मणुनिया वेगें आलों आलिंगितों सुंदरी ॥ आले० ॥ २ ॥ रुक्मिणीचें मिष करुनी राधे गृहीं राहिला ॥ बाळपणापासुनिया देह तुह्मां वाहिला ॥ अपमान करणें किती आजवरी साहिला ॥ आजपासुनिया कृष्णा नका येउं या गृहीं ॥ आले० ॥ ३ ॥ आला राग पाहुनिया गुप्त झाले श्रीहरी ॥ दिसेनासा झाला कोठें भयाभीत अंतरीं ॥ दिनानाथ मी अनाथ तुजविण घाबरी ॥ विनवि अंत नको पाहुं येइ येइ लवकरी ॥ आले० ॥ ४ ॥

## गाणें ८६ वें, अंगुली.

चाल–( नंदगृहाच्या जवळ मुलींनों दिसतो रथ दुसरा ).

भामा वचनीं ऐकुनि बोले ॥ माधव मी ग तुज कैसा न कळे ॥ वसंत कां रे स्मदनाचि चुकलें ॥ मी यदुवर नारी ॥ मंचकीं ॥ अ० क० ॥ कोण कुटिल तूं चोर जार कीं द्वारावर मारी अंगुली ॥१॥ चक्री आहें मी काढ कडीला ॥ काय काम रे सांग कुलाला ॥ कुलाल नव्हे मी भूधर आला ॥ मी तर कंसारी ॥ वेषधारी ॥ कोण कुटिल० ॥ २ ॥ कां रे मर्कटा बोलसि नेटें ॥ इथे जानकी तुजला वाटे ॥ सत्राजितकुमरी ॥ आहें मी ॥ कोण कुटिल० ॥ ३ ॥ शेष नव्हे मी सर्पाहारी ॥ गरुडा येथें नाहिं मुरारी ॥ निजला असेल तो भिमकीच्या घरीं ॥ बोलुं नको भारी ॥ निज आली ॥ कोण कुटिल० ॥४॥ वासुदेव हा मी न कळे तुजला ॥ किति सांगूं ग जिव हा द्मला ॥ रक्षण करि गोपाळसुताला ॥ निजजन-कैवारी असें मी ॥ कोण कुटिल० ॥ ५ ॥

## गाणें ८७ वें, भामाविलास.

कोणे एके दिनीं सुमन घेउनी आले नार द्वारावातिला ॥ सन्मुख रुक्मिणी देखुन हस्तकिं देव देतसे कुसुम तिला ॥ स्वर्गसुमन हें मृत्युलोकिं परि

अर्जवितो वा सवतीला ॥ हरि भुललासे जरठ युव-
तिला टाकुनियां मग नवतीला ॥ चाल ॥ मग अंग
घालि धडधडा ॥ गळां हार तोडि तडतडा ॥ नीर
नयनिं वाहे भडभडा ॥ ऐशा या परि अनर्थ करितां
हाणुन घेतसे भाळावरतें ॥ दुःखें विव्हळ भामा
पडली जाणवती दुति त्या हरितें ॥ अ० क० ॥
ऐका भामा विलास अहो तुह्मी ऐका भामा विलास
कानीं भागवतें कैशापरि तें ॥ शुकें वर्णिलें रहस्य
तें मी तुह्मां सांगेन सत्वर तें ॥ १ ॥ हरिशीं कळतां
लगबग पळतां वाटेनें बहु श्रम झाले ॥ सदनिं येउनी
पुसे खुणावुनि दासिस मग अंतरिं शिरले ॥ मशीं
न वदशी दुःख असें हें कधीं न साहे माझ्या हरिला ॥
हळूच मांडी घालुन उशाताळिं ह्मणे अबोला कां
धरिला ॥ चाल ॥ ह्मणे प्रिये काय जाहलें ॥ कोणतें
कर्मी पडलें ॥ चित्त कां तुझें भ्रमलें ॥ मी तर
पुरविन या तर वेळीं ॥ भामेनें मग ढकलुन मांडी
ह्मणे उठा बैसा परते ॥ जिला दिलें फुल तिचें शिर
धरा घेउन मग अंकावरतें ॥ ऐका भामा० ॥ २ ॥
हसुन श्रीहरी ह्मणे मांडिला अनर्थ कां इतक्यासाठीं ॥
वेडे न कळे तुला गोष्ट ही योजिलि मी अपुल्या
पोटीं ॥ अशा फुलांचा तरू असावा प्रिये तुझ्या सदना
पाठीं ॥ रुक्मिणि अनर्थ करिल ह्मणोनी फुल दिधलें

मी यासाठीं ॥ चाल ॥ मग हातीं धरुनियां वळें ॥ मुख धुतलें स्वकरें जळें ॥ निज वस्त्रानें पूशिलें ॥ काजळ नयनीं रेखिलें ॥ अपुल्या हातीं मग गुंफुनि वेणी मुद राखडी केतक वरी तें ॥ मानितसे मग त्रैलोक्य ठेंगणें सुख वाटे अंतरिं हरितें ॥ ऐका० ॥३॥ नानापरिचे अलंकार हरि लेववितो अपुल्या स्वकरें॥ कर्णफुलें आणि घोस मौक्तिकें शोभति बहु डोलति श्रवणीं ॥ इंद्रनिळ वैडूर्य पाच आणि माणिक लसना आणिक हिरा ॥ निदळा वर गोमेद प्रवाळ नीतनसे पित पट्ट चिरा ॥ चाल ॥ मग भाळिं टिळक रेखिला॥ बिजवरा निढाळिं मिरविला ॥ आदर्श पुढें ठेविला ॥ कुंकुम तळवट लावुन टिकला हरि मनमोहन मधुर सुरे ॥ मानितसे मग त्रैलोक्य ठेंगणें सुख वाटे अंतरीं हरितें ॥ ऐका भामा० ॥ ४ ॥

## गाणें ८८ वें, सत्यभामा.

चाल—( सुलोचना सुंदरा पतिव्रता दुहिता शेषाची. )

मुनी ह्मणे हो सत्यभामेला गर्व फार झाला ॥ पुनर्जन्म येईल ह्मणुनियां संशय मनिं धरिला ॥ दे कृष्णाला दान अतां ग उपाय हा सुचला ॥ चाल ॥ मग भामा ह्मणे तुजला मी देतें हरी ॥ पुजा करुनिया दिलें नारदाकरीं ॥ उदक सोडितां कृष्ण उठे

झडकरी ॥ चंबु गवाळें विणा देउनी कृष्णाच्या पाशीं ॥ शिष्य करोनी मुनी निघाले त्यजुनि द्वारकेशी ॥ अ० क० ॥ रुपाभिमानी सत्यभामा बोले नारदाशीं ॥ जन्मोजन्मीं कृष्ण भ्रतार, हवा सांगे मजशीं ॥ १ ॥ घरोघरीं यदुपति जातो अदृश्य होऊनी ॥ मुनिच्या मागें त्वरित चालला ब्रह्मविणा घेउनी ॥ आल्या सुंदरा सर्व मिळोनी भामेच्या सदनीं ॥ अग पापिणी काय केलेंस तूं कां पट्टराणी ॥ चाल ॥ रोहिणी सुभद्रा ह्मणती धन्य तुझें वैभव ॥ या पापाचीं फळें तुज येतिल सर्व ॥ रुक्मिणिविरहित सर्व बोलती रागें भामेसी ॥ रुपाभिमानी वंदुनि आणी अमुचा हृषिकेशी ॥ रूपाभिमानी० ॥ २ ॥ भामा वंदी नारद-चरणीं स्वामि चूक झाली ॥ हरिच्या वदली मागा देतें अन्यायी ठरली ॥ मुनी ह्मणे ग परत दानाची नाहिं कुठे चाली ॥ असा शिष्य तो पुन्हां मिळना ही लटकी बोली ॥ परंतु देतों आणा सुवर्ण हरि धटांत घाली ॥ हर्षयुक्त सुवर्ण आणाया भामा घरिं गेली ॥ चाल ॥ हरि पारड्यांत सुवर्ण एकीकडे ॥ सर्वांनिं घातले अलंकार हे चुडे ॥ आश्चर्य देखुनी भामेचें मुख वांकडें ॥ हंसे नारद ह्मणे अणा गे आतां भीमकीसी ॥ तिजवांचूनी कार्य सजेना कळली खुण मजशीं ॥ रुपाभिमानी० ॥ ३ ॥ आल्या

सुंदरा सर्व मिळोनी रुक्मिणीच्या सदनीं ॥ झाला वृत्तांत निवेदन करिती वंदुनिया चरणीं ॥ आद्य शक्ती ह्मणे दवडुनी मधुसूदनासी ॥ ख्याती केली जनलोकीं पति देउन दानासी ॥ चाल ॥ तूं राजा राम मी जानकी तुझी जाण ॥ तूं कृष्ण मी रुक्मिणी तुळशीचें घ्या पान ॥ तत्क्षणीं जड पान जाहलें तुळिलें श्रीहरिसी ॥ आनंद झाला मग सर्वांसी जाती सदनासी ॥ रुपाभिमानी० ॥ ४ ॥

## गाणें ८९ वें, सत्यभामा.

मंचकीं शेज करुनिया भामा, आठवि हृदयीं प्रभुला ॥ अ० क० ॥ आणा सखे कोणी, मंदीरीं हरिला ॥ प्रियकर प्राणसख्याला॥आणा सखे० ॥१॥ जाई जुई शेवंती फुलली, आला भर पहा मोगरीला ॥ आणा सखे० ॥ २ ॥ शेवंती हार गजरे, तुरे तबकीं भरले ॥ अर्पण करुं माधवाला ॥ आणा सखे०॥ ३ ॥ लावुनी समया दीप, तेज प्रकाशे, काय पाहूं हरि-वीण याला ॥ आणा सखे० ॥ ४ ॥

## गाणें ९० वें, तुरा.

रंगमहालीं अरास केली हरि रे नानापरी ॥ फित-वंदी चांदवा मोत्याच्या झालरी ॥ उंची सुगंध उटी

लावुनी आपुले करीं ॥ आज वाट पहात तुमची हो श्रीहरी ॥ येरझारा घालितां घरांतुनी बाहेरी ॥ माशि चैन पडेना आलि चांदणी वरी ॥ असा ध्यास करितां जिव झाला बावरा ॥ काल रात्र कुठे क्रमिली प्राणप्रियकरा ॥ अ० क० ॥ सत्यभामा ह्मणे श्रीहरी श्यामसुंदरा ॥ अहो पिवळ्या चाफ्याचा सुकून गेला तुरा ॥१॥ श्रीहरी ह्मणे ग ऐक भामे सुंदरी ॥ काल नारद तुंबर आले अमुचे कचेरीं ॥ त्यांनीं गायन केलें छंद कला कूसरी ॥ त्या कामीं गुंतलों गोष्ट नाहिं दूसरी ॥ सत्यभामा० ॥ २ ॥ सत्यभामा ह्मणे हो श्रीकृष्णा जिवलगा ॥ काल रात्रीं मजला बराच दिधला दगा ॥ कोण चोर जार माणूस पाठवा जागा ॥ ही आरास उचलुनी इथून न्या जा नगा ॥ कोण्या सवतीनें मोहनी घातली ह्मगा ॥ हें काजळ मंदिलीं आरसा घेउन बघा ॥ नवे नवे दागिने चंद्रहार बिजवरा ॥ शिसफूल राखडी वरता जडला हिरा ॥ सत्यभामा ॥ ३ ॥ श्रीहरी ह्मणे ग ऐक भामे पद्मिणी ॥ मी पत्र लिहितां कानीं खोंविली लेखणी ॥ ह्या काळ्या शाइचा डाग नको लावुं बोलुनी ॥ वरपंगु प्रीत ग आमुची नाहीं ह्मणुनी ॥ तुजसाठीं धांवत आलों मी सत्वरा ॥ तुजपरीस मजला आवडते कोण सुंदरा ॥ सत्यभामा० ॥ ४ ॥

## गाणें ९१ वें, मंदिर.

चंदनाचे हो मंदिरीं ॥ शेज पलंगवारी ॥ समया लाविल्या ह्या चारी ॥ मोत्याच्या झालरी ॥ अ० क०॥ वाट पहाते मंदिरीं ॥ सत्यभामा नारी ॥ वाट ॥१॥ जाइ जुई चमेली मोगरी ॥ ठेवले गुंफुनि हार ॥ आणिलीं सोन्याचीं घंगाळें ॥ पाणी विसाविलें ॥ वाट० ॥ २ ॥ नानापरीचीं परिमळें ॥ लवंगा जायफळें ॥ आणि त्या वेलाचे वेलदोडे ॥ करून ठेविले विडे ॥ वाट० ॥३॥ तंव तो दरवाजाबाहेर ॥ आलासे घननीळ ॥ एवढ्या रात्रीचा हा वेळ ॥ बोलणें मंजुळ ॥ वाट० ॥ ४ ॥ अरे तूं कोणाचा पाळती ॥ आलास एवढ्या रात्रीं ॥ बरवा विचार करिं चित्तीं ॥ खाशील मुखावरती ॥ वाट० ॥ ५ ॥ अग मी हिवानें कांपतों ॥ चाकर तुझा होतों ॥ तुजला शरण मी येतों ॥ मंदिरीं राहतों ॥ वाट० ॥ ६ ॥ अससी कोणाचा तूं कोण ॥ नांव दे सांगून॥ मग मी दरवाजा उघडीन ॥ मंदिरीं घेईन ॥ वाट० ॥ ७ ॥ तूझा आहें मी भ्रतार ॥ गरुडध्वज मी तर ॥ मजवर कर येवढा उपकार ॥ हाच तुझा वर ॥ वाट० ॥ ८ ॥ सखीनें दरवाजा उघाडिला ॥ सांवळा ओळखिला ॥ उठून लागली चरणाला ॥ स्वामी अन्याय झाला ॥ वाट० ॥ ९ ॥

# गाणें १२ वें, फुल पारिजातकाचें.

चाल---( सुंदरी काय करित आहे. )

एके दिवशीं महामुनी ॥ पातले अंतरिक्षाहूनी ॥ मृत्युलोकीं द्वारकाभुवनीं ॥ मंदिरीं हरिच्या येउनी ॥ चाल ॥ स्वर्गाहूनी पारिजातक सुमनें तीं आणिलीं ॥ अ० क ॥ कामिन व्याकुळ ही पडली ॥ कुंतल वेणी विकसली ॥ कामि० ॥ १ ॥ नारदें दिधलें हरि जवळी ॥ रुक्मिण पुजितो वनमाळी ॥ सख्या सांगति कागाळी ॥ येउन सत्यभामेजवळी ॥चाल॥ सखिवचनातें ऐकुनि भामा मूर्च्छागत पडली ॥का०॥ ॥ २ ॥ भामेसदनीं भगवान ॥ आले सहज विनोदानं ॥ सतितें मूर्छित पाहून ॥ बोले प्रभु मनिं घाबरुन ॥ चाल ॥ हिची अवस्था कोणे करणी ऐशी कां झाली ॥ कामि० ॥ ३ ॥ भामा पुसते श्रीहरिला क्रोधें बोले वचनाला ॥ पुष्प देउनी परि तिजला ॥ माझ्या मंदिरिं कां आलां ॥ चाल ॥ मर्जी उतरलि मजवर देवा प्रीति तिजशीं जडली ॥ कामि० ॥ ॥ ४ ॥ सरिते सत्राजितदुहिते ॥ खुलविलें एकया शब्दातें ॥ सुमन दिधलें तिज परि तें ॥ देवतरु लाविन अंगणि ते ॥ चाल ॥ आनंदली मनीं भामा मग ती ॥ पद नमिती झाली ॥ कामि० ॥ ५ ॥

## गाणें ९३ वें, फुल पारिजातकाचें.

चाल—( मधुर किती कुसुमगंध सुटला. )

स्वर्गाहुनी फुल हरिनें आणिलें ॥ रुक्मिणिचे करीं नेउन दिधलें ॥ तिकडेच हरी लंपट झाले ॥ विघडविला भगवान ॥ अ० क० ॥ कुणाला बाई सांगुं अतां अपमान ॥१॥ क्रोधें सत्यभामा भरली ॥ तेव्हां खबर हरिला कळली ॥ हरिनें समजावुनि हसविली ॥ विव्हळ झाले प्राण ॥ कुणाला० ॥२॥ समजावुनि प्राण ही प्यारी ॥ उचलुनी घेतली अंकावरी ॥ वृक्ष लाविन तुझिया द्वारीं ॥ दासी म्हणे दयाघन ॥ कुणाला० ॥ ३ ॥

## गाणें ९४ वें, धांवा द्रौपदीचा.

चाल—( अहो पिवळ्या चाफ्याचा सुकून गेला तुरा. )

दुर्योधन दुष्टें कपटें पांडव अणुनी ॥ जिंकिले क्षणामध्यें बसले अधोमुख करुनी ॥ जारे द्रुपदकन्या म्हणविसि आपुली भगिनी ॥ खळ सभेंत गांजिति काय पहासी दुरुनी ॥ भीष्मादि श्वशुर धृतराष्ट्र विदुर महाज्ञानी ॥ मम सन्निध असतां शब्द न वदती वदनीं ॥ श्रीरंगा तुजाविण नसे दुजा आसरा ॥ अ० क० ॥ ये धांवत सत्वर रुक्मिणीच्या वरा ॥ कां निद्रा आली

तुज कमलाक्षा मुरहरा ॥ ये० ॥ १ ॥ गुंतलासि कोठें सांग कुणाच्या काजा ॥ दिनदासि उपेक्षिसि दयानिधे यदुराजा ॥ वध तस्कर चोरिति पांडुसुतांची भाजा ॥ अजि जाउं पहातसे प्राण केशवा माझा ॥ मग शोकसागरीं बुडेल द्रुपदराजा ॥ जाइल श्रीद्र तव अंतरिं खुण ही समजा ॥ किति अंत पाहसी मधुसुदना श्रीधरा ॥२॥ बैसलासि कोठें भीमकिच्या माहलीं ॥ मृदु शेज राधेनें रम्य फुलांची रचिली ॥ प्रिय सत्यभामा जरि अंकावरती वसली ॥ कां वहिण धाकटी दीनदयाळा त्यजिली ॥ दुःशासन उठला कौरवें आज्ञा केली ॥ निरिं हात लावितो लाज रक्षिं वा अपुली ॥ परिसुनिया धांवा गरुड सारि सावारा ॥ ये० ॥ ३ ॥ संकटीं सोडवी निज दासा देवर ॥ दिनवत्सल असशी धांव धांव सत्वर ॥ तूं विश्वसाक्षि विश्वात्मा सर्वेश्वर ॥ सोडवी करी मग काय कौरवेश्वर ॥ ऐकुनिया धांवा द्रवला शारंगधर ॥ द्रौपदीस झांकी घालुनि पीतांबर ॥ पदपंकजिं गंगा लिन पांडव कैवारा ॥ ये० ॥ ४ ॥

## गाणे ९५ वें, धांवा २ रा.

पांडव असतां वनवासामध्यें भारी ॥ त्यामध्यें मुरारी दुर्योधन हा वैरी ॥ प्रार्थुनि ऋषितें विनवी

नानापरी ॥ करून तयारी धाडी धर्माघरीं ॥ हरहर शब्दें गर्जति ऋषिगण सारे ॥ मागति अन्न नाहिं कुठें तिळभर ॥ तव दासानें पाठविले ऋषि स्नाना ॥ अ० क० ॥ कां नये भगिनीची आज तुह्मांला करुणा ॥ कृष्ण मनमोहना श्रीरमणा मधुसूदना ॥ कां०॥ १ ॥ येतिल ऋषिगण शापीतिल अवघ्यांशी ॥ मग कळेल तुजशीं कांहिं तरी हृषिकेशी ॥ अवधी कैची तुज बहु विनवायासी ॥हें झालें मजशी आज कां हो आळशी॥ मज दुबळीवर निष्ठुर कां झालाशी ॥ हे दीनदयाळा अंत किती तरि पहासी ॥ तुजविण ताता शरण मिं जाऊं कोणा ॥ कां ॥ २ ॥ संकट पडलें तुजशीं न कसें कळलें ॥ हे दीनदयाळा कठिण हृदय कां केलें ॥ आजि कां रुसले कांहिं तरी अंतरलें ॥ झालि निराशा त्यजिन मी अपुल्या प्राणा ॥ सत्वर येई धांवत कमलारमणा ॥ कां० ॥ ३ ॥ सुवर्णपात्रीं वाढुन षड्रस अन्न ॥ जवळ रुक्मिणी तों शब्द पडे कानीं ॥ ऐकुन श्रवणीं भगिनीची दिनवाणी ॥ ये हृदय भरोनी अश्रु स्रवती नयनीं ॥ हस्तकीं धरूनी ताट दिलें फेकून ॥ हें कार्य करोनी बोले शारंगपाणी ॥ बहू त्वरेनें आले द्रौपदि सदना ॥ कां०॥४॥ आले कैवारी कळलें हें द्रौपदिला ॥ बहु हर्ष अंतरीं वंदितसे चरणांला ॥ जें झालें तें कळवुन विनवी

प्रभुला ।। ही चिंता तुजला तूंच वारि घननीळा ।। कृष्ण ह्मणे गे बोलुं नको बहु बोला ।। लागली क्षुधा अन्न दे मजला।।संकट दुसरें ऐकुनि प्रभुच्या वचना।। कां० ।।५।। द्रौपदी ह्मणे बा कृष्णा कान्हाई।।किंचित अन्न सदनीं उरलें नाहीं ।। कृष्ण ह्मणे ग साजणी लवकरी जाई ।। दे स्थाली आणुनि मम दैवें निघेल कांहीं ।। स्थाली आणुनि जवळी दे लवलाही ।। नृप शाखेचें पत्र आवडीनें सेवी ।। झाली तृप्ती नृप जेविले बहु अन्ना ।। कां०।।६।।तिकडे थाट केले कृष्णें त्यांना ।। तेथें करिती सर्व ऋषीश्वर स्नानां ।। करून मायेचे पांडव द्रौपदी प्रभुनं ।। बैसवून पंक्ती द्रौपदी वाढी अन्न ।। रुक्मिणी हातींचें सुंदर हें पक्वान्न ।। जेवितां ऋषींचे कंठीं आले प्राण ।। झालें भोजन विसरले पांडव छळणा।।कां०।।७।।आश्रमीं पहाती मार्ग ऋषींचा सकळ।। हें अन्न करोनि सिद्ध उभी पांचाळ ।। क्रोधाग्नीनें भीम हृदय जाळी।।उठुनी तात्काळीं भीम गदा पडताळी ।। सत्वर येउनी हे ऋषींजवळी ।। न येती ह्मणुनी क्रोधें ठोकी आरोळी ।। बांधिन मोळी अर्जुन कां न येना।। कां० ।। ८ ।। भ्याले ऋषिगण ह्मणती अरे बा भीमा ।। करी अपराध क्षमा सांगे जाउन धर्मा ।। कल्याण असो राहो ईश्वरीं प्रेमा ।। ह्या योगानें क्लेश दुर्योधना अधमा ।। दुष्टसंगानें फारच छळिलें तुह्मां ।।

झाली सीमा संरक्षितसे परमात्मा ॥ परतुन लागे भीम तयाच्या चरणा ॥ कां० ॥ ९ ॥ तेव्हां पांडव सद्गदितकंठीं ॥ ह्मणतीं जगजेठी धन्य अह्मी हे सृष्टी ॥ द्रौपदी धावुनी चरणासी घाली मीठी ॥ समजावि किरीटी शिणलीस ह्मणे मोठी ॥ पांडव बाळक वदती अच्युत वदना ॥ कां० ॥ १० ॥

## गाणें ९६ वें, धांवा ३ रा.

चाल–( हें रे काय बालमुकुंदा. )

ओढुं नका फरफरा मजला ॥ घेउं दे सांवरून पदराला ॥ रजस्वला स्त्री मी अबला ॥ कशास नेतां मज सभेला ॥ अ० क० ॥ जोडितें मी हात तुह्मांला ॥ अपराध माझा काय हो झाला ॥ जो० ॥ १ ॥ कर्ण द्रोण कृपाचार्याला ॥ निरोप सांगा त्या भीष्माला ॥ पंचसिंह अपुल्या सभेला ॥ कशास नेतां मज गरिबाला ॥ जो० ॥ २ ॥ घालूनी कर केशाला ॥ दुःशासन हा दांडगा मेला ॥ शब्दाचा बाण जो दिधला ॥ उठि लवकर वरी दुर्योधनाला ॥ जो० ॥ ३ ॥ द्रौपदी नेली सभेला ॥ पाहुनी भीम क्रोधें भरला ॥ घातिला हात गदेला ॥ असत्य दोष कुंतीसुताला ॥ जो० ॥ ४ ॥ लावितां हात वस्त्राला ॥ धांवा द्रौपदीनें हो केला ॥ दीनवत्सल हा आला ॥ दर्शन द्यावें जयराम–दासीला ॥ जो० ॥ ५ ॥

# गाणें ९७ वें, धांवा ४ था.

चाल–( हे सीते कोमलगात्रे अति सुकुमारे. )

हा मेला खळ दुर्योधन कुळ बुडवाया ॥ आला कुरुकुळांत उदया ॥ कौरवांस रव रव रव रव गती कराया ॥ धरिली मति शीघ्र मराया ॥ दुर्बुद्धी शकुनी मामा बुद्धि विराया ॥ कर्णादिक श्रवण भराया ॥ चाल ॥ ही क्षेत्रा आली होउनी ॥ प्रेरिली अनुजग खाणी ॥ यांनीं अघटित केली करणी ॥ कच धरून ओढुन सभेस मजला आणिली अति कनवाळे ॥ अ० क० ॥ मुनिजनमनसरसमराळे ॥ ये धांवत कृष्णाबाई अति कनवाळे ॥ मुनि० ॥ १ ॥ वेणिला धरुन दुःशासन हसडुन पाडी ॥ फर फर फर फर सभेसि ओढी ॥ वाग्धनुष्य ओढुन वचनशरांतें सोडी ॥ अंतर्गत काळिज फोडी ॥ अर्धांगिं बैस मांडी-वर ह्मणतो जोडी ॥ भर्त्यांची आस्था सोडी ॥ चाल ॥ दासी दासी ह्मणताहे ॥ धर्मज्ञ गुरू बसले हे ॥ भीष्म हा उगा स्थळिं पाहे ॥ विदुरादिक गति मति परि ॥ किमपी नचले कांहीं अति कनवाळे ॥ मुनि० ॥ २ ॥ चांडाळें आज्ञा केली वसन हराया ॥ तडतड झोंबे शरिरा या ॥ नग्न होतांच देहत्याग करिन यदुराया ॥ मग यातें प्रेत पहाया ॥ चाल ॥ श्रीकृष्णा धांव ग आई ॥ मज ह्मणसी वहिण सखे बाई ॥ अतां त्वरित करा

चतुराई ॥ दिनबंधू ब्रीद जाऊं पहात या वेळे ॥ मुनि०
॥ ३ ॥ शस्त्रास्त्र हरुनीया बंधु युधिष्ठिर झाला॥अती
दीनसाग्रजाला ॥ नागायुतबल हा भीम पराक्रमि
असला ॥ धर्मात्मा फांशीं फसला ॥ अर्जुन हा न
वदे कांहीं उगाच बसला ॥ ह्मणे मजवर ईश्वर
रुसला ॥ चाल ॥ हे अंध वृद्ध मामाजी ॥ ते कांहीं न
बोलत माजी ॥ औखळा इष्टतिमाजी ॥ अजूनी किती
अंत पहासी पूर्ण कृपाळे ॥ मुनि०॥ ४ ॥ मजवर कां
मानस केला अपूर्ण कृपाळे॥हें महात्म काय लपालें॥
मी भगिनी किंवा ऐसें व्यर्थचि कळलें ॥ दुःशासना-
सि जगपाले ॥ चाल ॥ वदले तें नव्हे लटिकें ॥
दासासी जाणतिल बटिके ॥ रक्षावे जाणुन हटके ॥
न पडावें क्षणभर उघडें द्रुष्टे धावुन आली ॥ अ०
क्र० ॥ निजरक्षणार्थ अवतरली ॥ ही माय माउली
माझी कृष्णाबाई धावुनी आली ॥ नि० ॥५॥ अनंता
परात्परा अभिता श्रीरंगा ॥ चुकलें मी या भव-
भंगा ॥ गोविंद कृष्ण केशवा भवाब्धी भंगा ॥ नासे
दुर्मद दुःसंगा ॥ चाल ॥ हे मुनी मंडन कंसारी
मंगल मग मंडनकारी ॥ गिरिधरा समय अति वारी॥
अशी करुणा ऐकतांच धावुन आली ॥ नि० ॥
॥६॥ मन पवन टाकुनी राजा द्वारावतिचा ॥ हें ऐकुन
यादव तीचा ॥ मुष्टी बाह्य राहुनी ध्यानीं करि मेव

गतिचा ॥ प्रभु गंभिर सदय मतीचा ॥ ना भी नाश्री तदा सतीचा ॥ प्रेमा खवळतसे गुणवतीचा ॥चाल ॥ परतुनी पाहतां मागें ॥ आलिंगुनिया श्रीरंगें॥पुशिले नेत्राश्रुसंगे ॥ शंभो गुण सतीची रत गदा आदि हरली ॥ नि० ॥ ७ ॥ प्रथमतांच वसन सोडिलें खळें क्रोधानें ॥ दुसरा देखे अवधान ॥ फर फर ओढी दोन्ही करानें॥प्रभू नेसवीत सन्मानें ॥चाल॥कृष्णा गु रत्नकरा हे॥निवतांच बहू बरवें हें॥ गर गर गर गर हरीला पाहतां भोंडी वळली ॥ नि० ॥८॥ धावुनिया अधर सरसावुनी आला जवळी ॥ देखिली जशी पांचाळी ॥ लखलखीत पीत हें वसन चतुर्भुज वाळी॥ अवलोकुन सर्व नृपाळीं ॥ गंगात्मज द्रोण विदुर हे वाजवीत टाळी ॥ चांडाळी मुखश्री काळी ॥ चाल ॥ भीष्म ह्मणे रे परनष्टा ॥ जळशी कां उगाच नष्टा ॥ कृष्णनाथ माउली कृपाळू फिरली ॥ निज० ॥ ९ ॥

## गाणें ९८ वें, धांवा ५ वा.

कौरव व्याघ्र मातले अती दारुण ॥ जशी अरण्यांत घेरिली एकली हरिण॥हा दुर्योधन दुष्ट दुर्जन॥ शब्दाचे मारितो बाण घेतसे प्राण॥ थरथरा कांपती गात्र अती दिनवदन ॥ सद्गदीत दाटला कंठ नये कां करुणा ॥ घरघरा फिरतो जीव पडे धरणीला

॥ अ०क० ॥ वाट पहातां नेत्र शीणले कंठ दाटला ॥ श्रीकृष्ण बंधुजी राया पाव कीं मजला ॥ वाट०॥१॥ द्रौपदी ह्मणे कैवारि बंधु वनमाळी ॥ कशि तुला झोंप लागली रात्रिंच्या वेळीं ॥ नेसुनी शुभ्र पातळ कुसुंबी चोळी ॥ पानाचा विडा जो करुनी घाली मुखकमळीं ॥ असे विळास होती हारी ह्मणुनि तूं भुलला ॥ वाट० ॥ २ ॥ देहाची नसेरे भ्रांती पडे वेल्हाळा॥त्याही वेळे अक्षयी रडे देवकीबाळा ॥ नेतां-तुन वाहे अश्रु घर्म बहु निढळा ॥ मग तडफडून पाहे वेळोवेळां ॥ अरे हरी उशीर लागला रुक्मिणीनें धरिला ॥ वाट० ॥ ३ ॥ श्रीकृष्ण रंगमहालीं गेले जव्हां ॥ रुक्मीण ह्मणे विडा कां घ्याना देवा ॥ दुष्टांनिं बहिण गांजिली मांडिला धांवा ॥ त्यामुळें चैन पडेना माझिया जीवा ॥ सोड सखे जाउं दे मला उशिर जाहला ॥ वाट० ॥४॥ श्रीकृष्ण बंधु कैवारी आले वनमाळी ॥ भिऊं नको द्रौपदीबाई तुझ्या मी जवळी ॥ संकटीं उभा पाठिसी बहिण सांभाळी ॥ निजवस्त्रें करुन झांकिली द्रुपदबाळी ॥ श्रीकृष्ण बंधु कैवारि संकटीं आला ॥ वाट० ॥ ५ ॥

## गाणें ९९ वें, धांवा ६ वा.

हा दुष्ट दुःशासन दुराचारी ॥ मजलागिं कराया नग्न ओढितो निरी ॥ यालागिं सोडवी धांवुनिया

श्रीहरी ॥ मज दुष्टें पिडिलें फार ह्मणुनि धांवा या ॥ अ० क० ॥ हे भक्तवत्सला धांवा यदुराया ॥ सोडवी सभे मी पिडिलें पडतें पायां ॥ हे० ॥१॥ हे भीष्मादिक साधुहि स्तब्ध जहाले ॥ नीतिमान विदूर तो शब्दहि नच बोले ॥ हे न्यायी द्रोणादिक स्वस्थ बैसले ॥ कोणी हा शब्द न वदती ह्मणुन धांवा या ॥ हे भक्त०॥२॥ हा वीरशिरोमणि पार्थ कसा बैसला ॥ निस्तेज कसा हा वीर भीम जाहला ॥ ही देइ अतां तरि बुद्धी नकुलाला ॥ श्रीकृष्णा धांव बा मला ताराया ॥ हे भक्त०॥३॥ मनिं आणुं नको तूं बा मम पापासी ॥ पदरांत कशी तरि घ्यावी ही दासी ॥ श्रीकृष्णा छळणें योग्य न दुबळीसी ॥ सर्वही विलासा त्यजुनी धांवा समया ॥ हे भक्त० ॥४॥

## गाणें १०० वें, धांवा ७ वा.

चाल—( काय तुझें गांठोडें जातें एकदां भेट देतां ).

धरुनिया करिं माझी वेणी रे ॥धरुनिया०॥ दुःशासन ओढितो फरफरा सभेमधें आणी ॥ असती तिथे कर्ण शकुनी रे ॥ अस० ॥ घालुनिया बैसला विदुर तो तुळसीदळ कानीं ॥ चाल ॥ धर्मराज आणि भिमसेन हो ॥ पहाती टकमक अर्जुन हो ॥ किति अंत पाहसी कंसारी ॥ अ० क० ॥ श्रीकृष्णा

बांधवा धांवण्या धांवे झवकरी ॥ ओढितो दुःशासन भारी ॥ श्री० ॥१॥ फोडुनी कुशब्द वचनानें ॥ मम हृदय भेदीला चूर्ण करुनिया टाकिलें दुष्टानें ॥ वटारुन डोळे रागानें ॥ निऱ्या सोडुनी पाहे अंधसुत आपुल्या हस्तानें ॥चाल॥ करावी त्वरा अतां मोठी हो ॥ तुह्मांला पसरितसें ओटी हो ॥ प्राण राहिला येउन कंठीं हो ॥ तुजविण कोण कष्ट वारी ॥ श्री० ॥ २ ॥ शब्द ऐकतांच द्रौपदीचा ॥ लगवग करुनी धांव घेतसे बंधु पांचाळीचा ॥ उतरला मुखइंदु तीचा ॥ पाहुनिया होतसे सद्गदित कंठ श्रीहरीचा ॥ धरुन करीं दुःशासन ओचा ॥ द्रौपदी सतीशीं नग्न कराया होय बंधु साचा ॥ चाल ॥ सोडितां कटिंचीं अंबर हो ॥ पाहिला दुजा पितांबर हो ॥ दिव्य जरीकांठि नारळी पदर ॥ शालू पैठणी ताडपत्री ॥श्री० ३॥ शुभ्र पातळ जरतारी ॥ चंद्रकळा नेसली बहुत सुंदर नागपुरी ॥ सोडि दुःशासन झडकरी ॥ थकून धृतराष्ट्राचा मुलगा पडला भूमिवरी ॥ चाल ॥ पाहती विदुरादिक लीला हो ॥ ह्मणती धन्य घननीळा हो ॥ त्वांच रक्षिली द्रुपदबाळा हो ॥ भानूचा सद्गुरु कैवारी ॥ श्री० ॥ ४ ॥

# गाणें १०१ लें, धांवा ८ वा.

चाल–(राजविलासा यदूनायका गेलि प्रित तूजसि. )

वृद्ध वृद्ध विदुरादि बैसले वीरासन घालुनी ॥ गांधारदेशाधिपती शकुनी॥द्यूत खेळुनी राज्य हरविलें पांडूच्या नंदनीं ॥ शेवटीं पण माझा लावुनी ॥ सूत-पुत्र कर्णानें मजला शब्दबाण टोंचुनी ॥ ह्मणे बैस अंकावर येउनी ॥ दीनदयाळा लक्ष्मीरमणा ये धांवुन माउली ॥धृ०॥ श्रीधरा कां माझि उपेक्षा केली ॥ आज सभेंत द्रौपदी कौरव दुष्टांनीं गांजिली ॥ श्री० ॥१॥ स्थिर चित्तानें धर्म बैसला शब्द न बोले जरी॥ धिरगंभीर भीमसेन काय मग करी ॥ विजयश्रीचा पति जणु अर्जुन मित्र तुझा कंसारी ॥ नच बोले धर्माज्ञा वंदुन शिरीं ॥ नकुळ तसा सहदेव राहिला क्रोध अंतरीं परी ॥ गुंतले सत्यवचनपंजरीं ॥ माय बाप गण गोत सखा तूं धांव त्वरित पाउलीं ॥ श्रीधरा० ॥ २ ॥ दूत मनाचा निश्चयतेचा द्वारकेस धाडिला ॥ राजसा हें विदित असें कीं तुला ॥ भक्त-काज करुनिया दयानिधि असासि जरी भागला॥तरी होई या समयीं जागला॥भक्तवत्सला ह्मणती तुजला ब्रिद अपुलें सांभाळा ॥ कर जोडुन यदुविरा विन-वितें तुला ॥ घोर काननीं व्याघ्र सभेमधिं हरणि काय गुंतली ॥ श्रीधरा० ॥ ३ ॥ केशव नारायण गोविंदा

श्रीधरा किं गरुडध्वजा ॥ ही दुबळी द्रुपदाची आत्मजा ॥ तुजविण दुसरा नसे आसरा आह्मांस अधोक्षजा ॥ तुजवांचुन मज विचार न रुचे दुजा ॥ शब्द ऐकुनी धांवत आला द्वारावतीचा राजा ॥ हर्षली कृष्णा नमिते पदपंकजा ॥ वस्त्रें पुरविलिं चिंता हरली मायबहिण रक्षिली ॥ श्रीधरा० ॥ ४ ॥

## गाणें १०२ रें, धांवा ९ वा.

वैष्णवी यज्ञमही ऐशी ॥ वेदवाणि गर्जती हर्षी ॥ पिता तूं माता बंधु होशी॥याज्ञसेनी ह्मणसि मजसी॥ दीन अह्मी असतां वनवासी ॥ ऋषी मागती भोजनासी ॥ कोणत्या करूं उपायासी ॥ स्नाना पाठविले ऋषी ॥ मार्जन करुन त्वरित येती ॥ अन्न नसतां शाप देती ॥ चाल ॥ असा तूं तारक या जगतीं ॥ ह्मणुन निश्चय माझ्या चित्तीं ॥ ह्मणुन वाहतें दीनवाणी ॥ धृ० ॥ करुणार्णवा मोक्षदानी ॥ पावे त्वरित चक्रपाणी ॥ करुणा० ॥ १ ॥ पिता तूं माझा मी दुहिता ॥ कंचुकी वसन चुडे दाता ॥ राजसूयज्ञ धर्म करितां ॥ कौरवांसि वाढित असतां ॥ कंचुकी बिरडें मम फिटतां ॥ चित्तीं तुज आठविलें ताता ॥ कंचुकी बिरडें मम फिटलें ॥ न घालीं संकट मी वहिलें ॥ चाल ॥ ऋषींचें भय पोटीं भरलें ॥

ह्मणुन तुजला स्मरियेलें।। दीनवत्सला एक श्रवणीं ।। करुणा० ।।२।। द्यूत खेळुनी पांडवांनीं ।। सर्व हराविलें दुःख न मनीं ।। केश आकर्षुन अधमांनीं ।। इच्छिलें नग्न करूं त्यांनीं ।। हांकेसरसें केलें येणें ।। चिरें बहु पुरविलीं सन्मानें ।। चाल ।। परी एक तुजवरी उरलें ।। कधीं त्वां चुडे नाहिं भरले ।। पंडुतनयांस निधन आलें ।। दास वांचवी चुडेदानीं ।। करुणा० ।। ३ ।। ये रे गरुडावर बसणारा ।। क्षिरसागरिंच्या वसणारा ।। गोप सौंगड्यांत वसणारा ।। राधेस हितगुज पुसणारा ।। जनीच्या गोधडींत घुसणारा।। रुक्मिणीवहिनिसी हंसणारा ।। गिरिगोवर्धन धरणारा ।। कठिण विघ्न हें दुर सारा ।। चाल ।। धांवा ऐकुनिया श्रोत्रीं ।। धावुन आला विश्वसूत्री ।। अन्न निर्मिलें तें हो पात्रीं ।।परिसुनि सुखविली भगिनी ।। करुणा० ।। ४ ।। काय कारण मज आळविलें ।। ह्मणे द्रौपदी ऋषि आले ।। क्षुधित वहु भोजन दे विमले ।। उठुन स्थालितें पुढें दिधलें ।। भाजीपत्रातें निर्मिलें ।। काय जगदिश नवल केलें ।। चाल ।। भक्षुनी धाला विश्वात्मा ।। अन्न निर्मिलें तये धामा।। कसा जग रक्षितो परमात्मा ।। दयाळू देवनाथ स्वामी ।। करुणा० ।।५ ।।

# गाणें १०३ रें, धांवा द्रौपदीचा १० वा.

श्रेष्ठ श्रेष्ठ सभेमधें बैसले भीष्म द्रोण महामुनी ॥ कृपाचार्य विदुरादि राधिके सभासद महामुनी ॥ दुर्योधन दुर्जनी हर्षती पाहुन मनीं ॥ पराक्रमी परि वचनिं गुंतले न ढळति सत्त्वगुणी ॥चाल॥ अरे हरी रे भासते सभा मज कशी ॥ अरे हरी रे व्याघ्रांचि मंडळी जशी ॥ अरे हरी रे मधें हराणि वेढिली तशी ॥ ॥चाल॥ बुद्धिज्ञानी स्तब्ध बैसले चित्रें भिंतींवरी ॥ ॥अ०क०॥ पहा दुष्ट दुःशासन मजला धरून ओढी निरी ॥ धांव पाव श्रीहरी कशी रे निद्रा आली तुज तरी ॥ पहा०॥ १ ॥ कर्ण ह्मणे ग ऐक सुंदरी बैसे अंकावरी ॥ पट्टमहीषी राणी होउनि सुख भोगी झडकरीं ॥ वचन ऐकुनी क्रोध नावरे भीमाच्या अंतरीं ॥ अधरुनि अधरा दांत कवळुनी गदा मुष्टिनें धरि॥मेघगर्जना करीत उठला भीम सभेभीतरीं॥सत्य-शिरोमणि धर्म वारि त्या गदा ओपि मम शिरीं ॥ चाल ॥ अरे भिमा रे सत्यधर्म कुंतीसुता ॥ अरे भिमा रे सरसुं नको सख्या सर्वथा ॥ अरे भिमा रे धर साधुजनाच्या पथा ॥ बाप शांतिचा क्षमासिंधु तो भीमातें परिहरी ॥ पहा ॥ २ ॥ क्रोध ना-वरे लोट सिंधुचा सहदेवा मज आतां ॥ प्रदीप्त करि ये काळिं अग्निला धर्म जाळि दोहिं हाता॥ गंदा

उचलितां अग्रजातें धनंजयें धरलें हाता ॥ गुरु द्रोण आणि ज्येष्ठ बंधु जे पाळी या देवता ॥ कैवारी जगदीश आपुला वारी सर्वहि व्यथा ॥ चाल ॥ धीर धरा हो पहा ईश्वरि कौतुकसें ॥धीर धरा हो उद्धरिलें गजेंद्रा जसें ॥ धीर धरा हो हें संकट वारिल तसें ॥ असे अर्जुनाचे गुणवाद ऐकतां भीम मौन मग धरी ॥ पहा दुष्ट० ॥ ३ ॥ पापी बुद्धी दुर्योधनें उघडी जानु करुनि दाविली ॥ बैस मांडीवर पांचाळी कां तुज भूल पडली ॥ प्रळय वीज कडकडे जशी तशि सती हृदयिं धडकली ॥ अंकिं बसेल तुझ्या दुरात्म्या भीमाकडे निरखिली ॥ गदा-नोवरी सगुण गुणही वाग्निश्चयें तुज नेमिली ॥ निद्रा करिशिल रणमंचकीं स्त्री घेउन आपुली ॥ चाल ॥ दुर्मती रे जागृतीस न येशी कदा ॥ दुर्मती रे न टळेचि शाप हा कदा ॥ दुर्मती रे भोगिशी सर्व आपदा ॥ असा द्रौपदीशाप ऐकतां स्तब्ध बैसलीं सारीं ॥ पहा दुष्ट० ॥ ४ ॥ झालि निराशा सर्वांची ती यदुपति सोडवि मला ॥ नेत्र लावुनी द्वारावतिसी मनोदूत धाडिला ॥ कसा द्रौपदी मुखयंत्रींचा यंत्रगोळ उसळला ॥ श्रवणिं झगडतां जनार्दनें तो सव्य पाद आखडिला ॥ जागृत होउन वाहन सांडुन हरि कैसा धांवला ॥ भक्तप्रतिपाळक सतीवर पीतांबर झांकिला

उचलितां अग्रजातें धनंजयें धरलें हाता ॥ गुरु द्रोण आणि ज्येष्ठ बंधु जे पाळी या देवता ॥ कैवारी जगदीश आपुला वारी सर्वहि व्यथा ॥ चाल ॥ धीर धरा हो पहा ईश्वरि कौतुकसें ॥ धीर धरा हो उद्धरिलें गजेंद्रा जसें ॥ धीर धरा हो हें संकट वारिल तसें ॥ असे अर्जुनाचे गुणवाद ऐकतां भीम मौन मग धरी ॥ पहा दुष्ट० ॥ ३ ॥ पापी बुद्धी दुर्योधनें उघडी जानु करुनि दाविली ॥ बैस मांडीवर पांचाळी कां तुज भूल पडली ॥ प्रळय वीज कडकडे जशी तशि सती हृदयिं धडकली ॥ अंकिं बसेल तुझ्या दुरात्म्या भीमाकडे निरविली ॥ गदा-नोवरी सगुण गुणही वाग्निश्चयें तुज नेमिली ॥ निद्रा करिशिल रणमंचकीं स्त्री घेउन आपुली ॥ चाल ॥ दुर्मती रे जागृतीस न येशी कदा ॥ दुर्मती रे न टळेचि शाप हा कदा ॥ दुर्मती रे भोगिशी सर्व आपदा ॥ असा द्रौपदीशाप ऐकतां स्तब्ध बैसलीं सारीं ॥ पहा दुष्ट० ॥ ४ ॥ झालि निराशा सर्वांची ती यदुपति सोडवि मला ॥ नेत्र लावुनी द्वारावतिसी मनोदूत धाडिला ॥ कसा द्रौपदी मुखयंत्रींचा यंत्रगोळ उसळला ॥ श्रवणिं झगडतां जनार्दनें तो सव्य पाद आखडिला ॥ जागृत होउन वाहन सांडुन हरि कैसा धांवला ॥ भक्तप्रतिपाळक सतीवर पीतांबर झांकिला

॥चाल॥ यादवातें पाहुनिया निवल्या दिठी ॥ याद-वातें पाहुन हर्षलि गोरटी ॥ यादवातें धर्म खुण दावि कीरिटी ॥ रामकृष्ण ह्मणे निर्भय झाली द्रुपदाची कुमरी ॥ पहा दुष्ट० ॥ ५ ॥

## गाणें १०४ वें, योगी.

अनंत रूपें अनंत नामें न कळे शेषा महिमाना ॥ काय ह्मणावें या या हरिला नसे कशाला ठिकाणा ॥ ध्रु० ॥ योगि ह्मणावा जरि या हरिला भासतसे हा कुटुंबिसा ॥ कुटुंबि ऐसा जरी ह्मणाल तरि ब्रह्म-चारि हा पडेल ठसा ॥ भूप ह्मणावा तरि धर्मागृहिं उच्छिष्ट काढी पहा कसा ॥ सख्या जनांचा मित्र ह्मणाल तरि मातुळ वधिला शत्रु जसा ॥ सख्खा मावळ बंधू वधिला धांवे भक्ताच्या निर्वाणा॥अनंत० ॥ १ ॥ उदार ह्मणावा तरी बलिपुढें हात दानाशी पसरीला ॥ कृपण ह्मणावा तरी ध्रुवाला मान्य पदा-वरि बैसविला ॥ कठोर ह्मणावा तरी गजेंद्रा पशु-साठीं बहु गडबडला ॥ कोमल अंतःकरणि ह्मणाल तरि मयुरध्वज उभा खंडिला ॥ बहू थोरला जरी ह्मणाल तरि करि यशोदेचे स्तनपाना ॥ अनंत० ॥ २ ॥ शूर ह्मणावा तरी पळाला काळयवन जो तयापुढें ॥ भ्याड म्हणावा तरी रणामधिं दैत्य मारिले बहु गाढे ॥ श्रीमंत म्हणावा तरि कुब्जेच्या झोपडि-

मध्यें सुरवाडे ॥ दुबळा घातकी जरी म्हणाल तरि वेद वर्णिती पोवाडे ॥ भला ह्मणावा तरी घालितो गोपिंभोंवतीं धिंगाणा ॥ अनंत० ॥ ३ ॥ कपटि ह्मणावा तरी जिवींचें गूज सांगतो पार्थाला ॥ सरळ अंतःकरणि म्हणाल तरि दगे बसवितो दुष्टाला ॥ गाइ राखितो गवळि म्हणाल तरि द्रौपदीसाठीं चाटि झाला ॥ चाटि ह्मणाल तरि बाइल होउनि शयनिं पार्थाच्या पहूडला ॥ रामचंद्र म्हणे सर्वहि याच्या साधु मात्र जाणती खुणा ॥ अनंत० ॥ ४ ॥

---

# गाणीं श्रीविठलाचीं.



## गाणें १ लें, ब्रह्म.

एकनाथाच्या भक्तीसाठीं ॥ धांवत आला तो जगजेठी ॥ खांदीं कावड आवड मोठी ॥ पाणी वाहिलें ॥ हरिनें पाणी वा० ॥ अ० क० ॥ अगणित

सुरगण वर्णिति ज्यासी॥कटि कर नटसम चरण विटे-
वर ऊभे राहिले ॥ आज म्यां ब्रह्म पाहिलें ॥ १ ॥
चोख्यासंगें ढोरें ओढितां ॥ शिणला नाहीं तो
तत्त्वतां॥जनीसंगें दळितां कांडितां ॥ गाणें गाइलें ॥
हरिनें गाणें गा०॥अगणित सुरगण० ॥२॥ सांवत्या
माळ्याची भाजी विकिसी ॥ कबीराचे शेले
विणिसी ॥ गोरीयाचें बाळ रक्षिसी ॥ चिखलीं तुड-
विलें ॥ जरि तें चिखलीं० ॥ अगणित सुरगण ॥३॥
दामाजीची रसद पटविली ॥ कान्हूपात्रा ती उद्ध-
रिली ॥ अमृतराय म्हणे ऐशि माउली ॥ संकटा
वारिलें ॥ प्रभुनें संकटा ॥ अगणित सुरगण० ॥४॥

## गाणें २ रें, पंढरपूर.

पंढरिसी जायाचा लागला ध्यास ॥ चैन पडेना
रात्रंदिवस ॥ कधिं हो भेटेल सखा जगदीश॥माझ्या
मनाची पुरविल आस ॥ अ० क०॥ कुणि तरी पंढ-
रिस येतां चला जाऊं ॥ परब्रह्म मूर्त विठ्ठलाची पाहूं
॥ १ ॥ कर कटावरी उभा सांवळा ॥ गळां घालुनी
तुळशीमाळा ॥ केवळ भक्तांचा जिव्हाळा ॥ पुंडलि-
काचे भेटिसाठिं आला ॥ कुणि तरी० ॥२॥ सांवळी
सगुण मूर्ति देव विठोबाची ॥ दाटी झाली साधु-
संतांची ॥ किति हो महिमा वर्णूं पंढरपुरची ॥ भीमा
न चंद्रभागेची ॥ कुणि तरी० ॥३॥आषाढी कार्तिकीची

महिमा भारी ॥ यात्रा जाते हो पंढरपूरीं ॥ प्रथम वंदितां नामदेवाची पाहेरी ॥ मग हो जातिल महाद्वारीं ॥ कुणि तरी० ॥ ४ ॥ टाळ मृदंगाची होते ध्वनी ॥ चित्त लावावें विठ्ठलचरणीं ॥ तेणें पापाची होइल धूणी ॥ यात्रा मिळाली चहूं वर्णी ॥ कुणि तरी० ॥ ॥५॥ कधिं हो जाइन त्या पंढरीला ॥ कधिं हो भेटन त्या विठ्ठलाला ॥ पिंजरेचें कुंकू रखुमाईला॥बुक्या.चे प्रीति पांडुरंगाला ॥ कुणि तरी० ॥ ६ ॥ भक्ताकारणें सगुणरूप झाला ॥ उभाउभी भेट देतो सर्वांला ॥ त्याच्या चरणांसी मिठी घाला ॥ तो चुकविल जन्ममरणाला ॥ कुणि तरी० ॥ ७ ॥

## गाणें ३ रें, विठ्ठलाचें.

पुंडलीक राहि रखुमाई ॥ भजन श्रवण ठायिं ठायीं ॥ प्रेमें तुळसिमाळ बुका दाटेल कैं ॥अ० क०॥ विठ्ठल मम प्राणसखा ॥ जिविंचें जीवन भेटेल कैं ॥ विठ्ठल० ॥ १ ॥ नेत्रकमलदळ विशाळ ॥ भाळिं बुका तुळशिमाळ॥कवळुनी तनूस तनू भेटेल कैं ॥ विठ्ठल० ॥ २ ॥ भिमातिरीं निकट निपट ॥ कटिं कर ठेवूनि उभा ॥ विटेवरी समचरण नमुन भेटेल कैं॥विठ्ठल० ॥ ३ ॥ श्रीहरी भुजंगनाथ ॥ रंगिं भरुनि रंगनाथ ॥ पुन्हां जन्ममरण खत ॥ फाटेल कैं ॥ विठ्ठल०॥ ४ ॥

## गाणें ४ थें. विठ्ठलाचें.

तुळशिचा हार गळां ॥ कधीं घालूं घननीळा ॥ घेउनीया बुका माळा ॥ कवळून भेट देऊं ॥अ०क०॥ चला गडे जाऊं जाऊं, पंढरिचा देव पाहूं ॥ चला० ॥ १ ॥ करुनीया प्रातःस्नान ॥ प्रदक्षिणा सोंवळ्यान ॥ कथा कीर्तन पुराण श्रवण ॥ अखंडीत तेथें राहूं ॥ चला० ॥ २ ॥ साधुसंतांच्या भेटी ॥ नित्य होती वाळवंटीं ॥ देव आले तेहतीस कोटी ॥ गोपाळकाला पाहूं ॥चला०॥३॥ वैकुंठिंचा सुकुमार ॥ उभा असे विटेवर ॥ नारायण प्रियकर ॥ जिवलग भाऊ भाऊ ॥ चला० ॥ ४ ॥

## गाणें ५ वें, विठ्ठलाचें.

चाल–( लंकापुरी पुरी राज्य ).

नेसुनी पिता, पितांबर पिंवळा ॥ गळ्यामधें तुळशीच्या माळा ॥ रूप सुंदर, सुंदर सांवळा ॥ हिरा जणुं झळके झळझळा ॥ अ० क० ॥ फंदी फाकड्या फाकड्या पांडुरंगा ॥ जना मुख दाखवी श्रीरंगा ॥ ॥१॥ ठेवुनी कर, कर कटावरी ॥ उभा राहिला विटेवरी ॥ मुकुट घातीला, घातीला शीरीं ॥ कलगी खोवियली वरी ॥ अंगठ्या पोंच्या, पोंच्या झळझळी ॥ गळ्यामध्यें कंठीं भिकबाळी ॥ फंदी० ॥२॥ विठोबा

मला मला मूळ धाडा ॥ धांवत येइन दुडदुडा ॥ चरणीं लोळेन, लोळेन गडबडा ॥ जिव माझा झाला वेडा ॥ फंदी० ॥ ३ ॥ नामदेवाचें, देवाचें कौतूक ॥ मला सांपडलें माणीक ॥ विठोबा तुझें, तुझें पहातां मुख ॥ हरली माझी तहान भूक ॥ फंदी० ॥ ४ ॥

## गाणें ६ वें, धांवा विठोबाचा.

धांव धांव बा अनाथबंधू भक्तकैवारी ॥ पडलें संकट दुर्घट तुजविण कोण दुजें वारी ॥ पुरे जन्म हा दुःखदायक देवा पडलों संसारीं ॥ त्रिविध ताप संताप भोगितां गेली वयसा सारी ॥ आतां उपेक्षूं नका दयाळा मज दीना तारी ॥ करुणासागर तुह्मी ह्मणुन मी धांवा हा करीं ॥ भक्तवत्सले पांडुरंगे त्वरित भेट देई ॥ अ० क० ॥ नामदेव कीर्तनांत गोरा वाट तुझी पाही ॥ जगन्माउले माय माझे पंढरीचे आई ॥ नामदेव० ॥ १ ॥ वैष्णवजनसमुदाय मिळाला महापर्व आज ॥ गाति नाचती स्वच्छंदानें सर्व भक्तराज ॥ मुखीं नाम कर टाळि वाजवुन उभारिले ध्वज ॥ निजापराधी मीच कसा ह्मणे वाटतसे लाज ॥ कृपासागरा सर्व जाणसी अंतरिचें गूज ॥ थोटे कर वर करिन परी हें दुःख होइल तूज ॥ अनंत ब्रह्मांडाचा भार वाहासि विठाबाई ॥ नामदेव० ॥ २ ॥ असा धांवा निज दासाचा ऐकुनियां कानीं ॥ धीर न

धरवे गहिंवरला तो भक्तअभिमानी ॥ वत्सासाठीं धेनू फोडी हंबरडा निर्वाणीं ॥ तत्सम झालें खरें बोलती असें चक्रपाणी ॥ मम प्राणाच्या प्राणा तुजला श्रम दिधले कोणी ॥ वदून दासास भेटतांच कर फुटले दोन्ही ॥ असा दयाळू देव ह्मणे शिवदीन दुजा नाहीं ॥ नामदेव० ॥ ३ ॥

## गाणें ७ वें, गांठोडें.

चाल–( श्रीकृष्ण बांधवा धांवण्या धांवे लवकरी. )

पावलां पतितां फार दीनां ॥ कीर्ति अशी ऐकिली, विठोबा साधुमुखें करुन ॥ पातकी अजामेळ होउन ॥ नारायणासी हाका मारितां गेला उद्धरून ॥ सुतावर बहु प्रीति ह्मणुन ॥ नाहिं ऐकिलें दुजें पाहिलें त्रिभुवन शोधून ॥ चाल ॥ पढविलें शुका तारिलि गणिका हो ॥ पढ० ॥ अढळ पद दिलें ध्रुवबाळका हो ॥ कृपाघन मजवरती ओळगा हो ॥ कृपा० ॥ भानुचा गुरुचरणीं माथा ॥ अ० क० ॥ काय तुझें गांठोडें जातें एकदां भेट देतां ॥ शिणलों देवा तुज आळवीतां ॥ काय०॥१॥ दीन उद्धार नाम गाजे ॥ पतीतपावन ब्रीद तुह्मांला देवाजी साजे ॥ हाकितां शरण आला आज ॥ नको उपेक्षा करूं आमची पंढरिचे राज ॥ चाल ॥ अश्व पार्थाचे खाजिवले हो॥ ॥अश्व०॥ जनीचें दळणकांडण केलें हो ॥ जनी० ॥

नाथगृहिं पाणी भरियेलें हो ॥ नाथ० ॥ भानुचा० काय० ॥ २ ॥ रोहिदासाची कोण याती ॥ काय पाहुन भुलला गोऱ्या कुंभारावरती ॥ चोखामेळ्या संगतीं ॥ मेलीं ढोरें ओढुन टाकी अपुल्या निज हस्तीं ॥ चाल ॥ जनाबाइ मुक्ताबाईला हो ॥जना०॥ एकनाथ नामदेव शिंप्याला हो ॥ एक० ॥ विठोबा नरसिंह मेहत्याला हो ॥ वि० ॥ भानुचा० ॥ काय० ॥ ३ ॥ येग येग विठाबाई ॥ कंठीं प्राण उरला दयाघन वर्षे लवलाही ॥ यातिकुळ जात गोत नाहीं ॥ शरण आल्यावर मरण कदापी थोर देत नाहीं ॥ चाल ॥ काय मजकडुन चूक घडली हो ॥काय०॥ ह्मणुन का ममता टाकियली हो ॥ह्मणुन०॥भानुचा० काय तुझें० ॥ ४ ॥

---

# गाणीं शंकराचीं.



## गाणें १ लें, शंकराचें.

सप्तशतें कोश लांब ॥ विकट मार्ग तेथवरी ॥ माझी तनू वागवुनी नेतिल का ॥ धृ० ॥ काशिपुरी

विश्वेश्वर दर्शन मज देतिल का ॥ का० ॥ १ ॥ लिंगरूपि विश्वनाथ करुनि कृपा प्रीतियुक्त ॥ माझिं तीन त्रिल्व-दळें घेतिल का ॥ का० ॥ २ ॥ पाप ताप दैन्य हरुनि ॥ माय बाप सकळ हे ॥ माझे अपराध माफ करितिल का ॥ का० ॥ ३ ॥ उपदेश सांगुनि कानीं ॥ मोह-पटल दूर करुनि ॥ भक्त विष्णु यासि मुक्त करितिल का ॥ का० ॥ ४ ॥

## गाणें २ रें शंकराचें.

पद्मासनीं बैसले सांबा ॥ वाम भागिं विराजित अंबा ॥ गंगा हा चंद्र मस्तकीं जटाजूट भाल कुंडल शोभती कानीं ॥धृ०॥ गौरी शंकर पुजिले ज्यांनीं ॥ ते धन्य ह्मणावे प्राणी ॥ १ ॥ पंचानन त्रिनेत्र ज्यासी ॥ करीं आयुधें सुंदर कैसीं ॥ परशु वज्र खड्ग त्रिशूल, तोहि दक्षिण कर वरदानी ॥ गौरी० ॥ २ ॥ नागपाश आणि अंकुश ॥ वाजवीतसे डमरु-घोष ॥ कांति स्फटिकासमान ज्याची, भस्म दिधलें चर्चुनी ॥ गौरी शंकर० ॥ ३ ॥

## गाणें ३ रें, गंगागौरीचें भांडण

चाल—( लंकापुरी, पुरी राज्य. )

शिव आदिशक्ति, शक्ती सुंदर ॥ कुणिकडून आली मजवर ॥ माझ्या मस्तकीं, ठेवियला कर ॥ भुल-

विला योगी शंकर ॥ घातली मोहनी, मोहनि सांगूं किती ॥ अ० क० ॥ भुलविला योगी पशुपती ॥ पार्वती बोले, बोले गंगेप्रती ॥भु०॥१॥ गंगा मग बोले, बोले पार्वतीला ॥ क्रोध कां आला तुह्मांला॥माझ्या मस्तकीं, मस्तकिं सांब लिहिला ॥ पहा शोधुनिया चित्ताला ॥ खेद कां करितां, करितां तुह्मी चित्तीं ॥ भुलविला० ॥ २ ॥ बोले नगकन्या, कन्या वचन ॥ करित होतें देवाचें स्तवन ॥ तेव्हां मज आणिलें, आणिलें सांबानं ॥ काय मी होतें लहान ॥ बसविल्या अंकिं, अंकिं दोघी सवती ॥ भुलविला०॥३॥ शिव आदि शक्ती,शक्ती बोलत ॥ जटेमधें गंगा बैसत ॥ विस्मित होउनी, शिवशंकर पाहत ॥ गंगागौरी भेट होत ॥ कैलासपर्वतीं, आनंदें काळ क्रमिती ॥ भुलविला० ॥ ४ ॥

## गाणें ४ थें, शंकराचें.

मस्तकीं जटाभार गंगा ॥ चर्चुनी चिताभस्म अंगा ॥ खेळतसे क्रिडा बहुत संगा ॥ निरामय जाळुन अनंगा ॥ गजानन शोभे सव्यांगा ॥ गिरिजा ज्याच्या वामांगा ॥ त्रयोदश अक्षरि जप ज्याचा ॥ अ० क० ॥ देव पाहिला स्मशानींचा ॥ धन्य हा दिवस आनंदाचा ॥ राजा पाहिला स्मशानींचा॥१॥ ज्याला तिन्ही लोक ध्याती ॥ कुठवर वर्णुं आतां

कीर्ती ॥ ज्यातें श्रुती शास्त्र गाती ॥ ह्मणुनिच महादेव ह्मणती ॥ घडामोड सर्व ज्याच्या हातीं ॥ तिळभर नाहीं विश्रांती ॥ घेतसे भारहि भक्ताचा ॥ देव पाहिला० ॥२॥ हें जरी असत्य वाटे ज्याला ॥ त्यानें जावें काशीला॥जो का ज्ञानडोहिं बुडला ॥ पुनरपि रुद्र होउनि बसला ॥ ऋणकरी सीतारामाचा ॥ देव पाहिला स्मशानींचा० ॥ ३ ॥

## गाणें ५ वें, भिल्लीण.

गिरिजा झाली असे उदास॥निघालि शंभू शोधायास ॥ पालटिला तिनें दुसरा वेश ॥ झालि भिल्लीणी ॥ अ० क० ॥ माशिं बोल भिल्लीणी ॥ सदाशिव ह्मणे ॥ माशिं० ॥ १ ॥ चोळी ल्यायली असे उफराटी ॥ मोहनमाळ हार कंठीं ॥ टिकली ल्यायली असे ललाटीं ॥ नाकिं मोरणी ॥ माशिं० ॥ २ ॥ बुचडा बांधिला केसाचा ॥ वरती तुरा खोवि मोत्याचा ॥ झणकरा मारि नेत्राचा ॥ पाडिला भुलवुनी माशिं० ॥३॥ शंभु बघुनि मोहित झाला ॥ हात हा गिरिजेवर टाकिला ॥ नको तापसी झोबुं अंगाला ॥ बोल दुरूनी ॥ माशिं० ॥ ४ ॥ दुर्गा ह्मणे योगिराया ॥ कैसी भोगितसां परजाया ॥ तुमचें तप हें जाइल वाया ॥ मुळापासोनी ॥ माशिं० ॥५॥ गिरिजा बोले नीळकंठा ॥ तुह्मि तर दिसतां बहु तापट ॥

एकिचा नाहिं केला शेवट ॥ दिली सोडोनी ॥ मशिं० ॥ ६ ॥ गिरिजेनें शंभू हातीं धरिले ॥ महादेव कैलासासी नेले ॥ शेवटीं लक्षुमणकवि बोले ॥ सभे जाउनी ॥ मशिं० ॥ ७ ॥

## गाणें ६ वें, सदाशिव.

मग आला नंदिवर बसून ॥ पहातसे चहुंकडे हसून ॥ निजभक्त छंद कसकसून ॥ करिति आरोळ्या ॥ अं० क० ॥ मी आज देखिला डोळां ॥ सदाशिव भोळा ॥ मी आज० ॥१॥ एका हातीं लहानसा करी ॥ दिसे सौम्य गजासुर परी ॥ जटाभार वेष्टिला शिरीं ॥ करुनिया गोळा ॥ मी आज० ॥ २ ॥ अंगीं भस्म चर्चिलें असे ॥ त्यानें फार शुभ्र तो दिसे ॥ वामांगि पार्वती वसे ॥ गुण-वेलहाळा ॥ मी आज० ॥ ३ ॥ भाळीं अर्धा चंद्र निर्मळ ॥ जटेमधुन स्रवतसे जळ ॥ वरि छाया करी शीतळ ॥ नाग तो काळा ॥ मी आज० ॥ ४ ॥ ह्मणे दास तया देवाचे ॥ निर्वाण भक्त जे साचे ॥ उचलून पायरज त्यांचे ॥ लाविन कपाळा ॥ मी आज० ॥ ५ ॥

## गाणें ७ वें, काशी.

चाल—( वल्कलवेष्टित काया असतां ).

मृत्युलोकिं कैलास काशी प्रत्यक्ष सुजन सांगती ॥ अमर यक्ष गंधर्व सिद्ध त्या स्थानिं मरण मागती ।

स्थावर जंगम तिरीं वास त्या जान्हविच्या संगती ॥
प्राणि स्वदेहीं मुक्तचि होती तरती सहजागती ॥
चाल ॥ ते शिव काशीसि पाहिले हो ॥ ते शिव०
कोटि कोटि वेल वाहिले हो ॥ कोटि० ॥ सर्व लिंग-
मय देवळाविरहित नाहिं कुठे नीराळी ॥ वेदघोष
हा होतो कोठें महाशास्त्र मंडळीं ॥ अ० क० ॥ सप्तद्विप
नवखंड पृथ्वी त्याहुन ही वेगळी ॥ त्रिशुळावरती
काशी धरिली शिवशंकरांनिं आगळी ॥ १ ॥
विंदुमाधवीं त्रिकाळस्नान करिति सकळ येउनी ॥
विश्वेश्वराचें दर्शन घेती भक्त भावें करुनी ॥
मौन्य धरुनि चालिले आलिंगन पिंपळासि देउनी ॥
गणेश गंगा भैरव यांचें चरणामृत वंदुनी ॥ चाल ॥
हनुमंत सूर्य भैरव हो ॥ हनु० ॥ करितांचि त्यांचा
गौरव हो ॥क० ॥ चुकविती नरक रौरव हो ॥चु०॥
पृथक पृथक महादेव कोठवर सांगूं नामावळी ॥
त्रिशुळावरती० ॥ सप्तद्वीप नवखंड पृथ्वी० ॥ २ ॥
वसंत कार्तिक माघमासीं दिसताती रांगेनें ॥ दीपो-
त्सव जळिं नावा टाकिति जैशीं तारांगणें ॥ लाख
लाख रुपये खर्चुनी बांधिलीं पटांगणें ॥ चतुर स्त्रिया
गोपद्में काढिति स्वस्तिक चैत्रांगणें ॥ चाल ॥
लौकीक अहल्याबाइचा हो ॥ लौ०॥ तैसाचि भोसले
शिंद्याचा हो ॥ तै०॥ त्यापरिस गहिनाइचा हो ॥त्या०॥

चला दुपारीं मणिकर्णिकेशीं दाटि कधिं न मोकळी ॥ महाक्षेत्रिं विस्तार याचा महिमा भूमंडळीं ॥ सप्तद्वीप नवखंड पृथ्वी० ॥ ३ ॥ सूर्यवंशिचा भगिरथ राजा परोपकारी विर ॥ सगर उद्धरावयासि आणिलें भागीरथीचें नीर ॥ गंगा यमुना सरस्वतीचें प्रयागिं पाणी स्थिर ॥ गांवें पुढें काशी नगर विश्वेश्वर मंदिर ॥चाल॥ त्या क्षेत्रीं देह ठेवितां हो ॥त्या०॥ पुढें जन्म मरण चुकवितां हो ॥ पुढें ॥ शिवनामामृत सेवितां हो ॥ शिव० ॥ विधी चुके लिहावया परी शिव सांगे मंत्रावळी ॥ स्वतः करी उपदेश तारकेश्वर येउनि त्या स्थलीं ॥ सप्तद्वीप नवखंड पृथ्वी० ॥४॥ आहा काशी क्षेत्र पाहुनी कृतार्थ मी जाहलों ॥ समाधि ब्रह्मानंदिं लागतां समाधान पावलों ॥ व्यर्थ व्यर्थ चौऱ्याशी योनी फिरतां मी भागलों ॥ पैल थडी ने चंद्रशेखरा शरण तुला मी आलों ॥चाल॥ महादेव पिनाकेश्वरा हो ॥ म० ॥ मज रक्षि दीन पामरा हो ॥ म० ॥ पुढें काशिवास मज करा हो ॥ पुढें० ॥ हेतु पुरवि पशुपती विनंती जोडुन बद्धांजळी ॥ हेंच मागणें मागे प्रभाकर तुझि पायाची धुळी ॥ सप्तद्वीप नवखंड पृथ्वी० ॥ ५ ॥

## गाणें ८ वें, काशी दुसरी.

गंगातटिं सुकृतस्नान ॥ नित्य येति लहानसान ॥

स्नान पान स्नान दान॥करिती पूर्वजासी ॥अ०क०॥ आनंदारण्य क्षेत्र मुक्तिपुरी काशी ॥ आ० ॥ १ ॥ भागिरथी वाहे स्थिर ॥ निर्मळ हें अमृतनीर ॥ ब्रह्म घाटिं हें शरीर ॥ पडतां भव नाशी ॥ आनंदारण्य० ॥ २ ॥ बिंदुमाधवादि घाट ॥ लक्ष दीप घनदाट ॥ लाविताति लकलकाट ॥ करिती कार्तिक मासीं ॥ आनंदारण्य० ॥ ३ ॥ काळभैरव दंडपाणी ॥ रक्षितसे चारि कोनिं ॥ अन्नपूर्णा धन्य जनीं ॥ अन्न पुरवि जगासि ॥ आनंदारण्य० ॥ ४ ॥ तारक हा उपदेश करी ॥ रामनाम हृदयिं धरी ॥ शिवहर दे मुक्ति वरी ॥ भवसिंधु तरायासी ॥ आनंदारण्य०॥५॥

## गाणें ९ वें, शंकरपार्वतीविनोद.

आनंदानें पुसे पार्वती शिवशंकर राया ॥ जटामुगुटामध्यें दिसते कोणाची जाया ॥ भव्य भाळ अति सुबक ठेंगणी कोमल मृदुकाया ॥ मृगांक सुंदर तीर कमानी शोभति भींवया ॥ गौरवर्ण मुखचंद्र दिसे अति लाजवि मदनाला ॥ कर मला परि कुच गमताती पूर्णाचि कीं चपला ॥अ० क०॥ कोण कुणाची ललना सांगा प्राणनाथ मजला ॥ कांतेचें तें भाषण ऐकुनि शंभू बोलला ॥ १ ॥ एक ऐक गे शुभानने शिरिं गंगाजल पाणी ॥ मुख नव्हे हें कमल जलामध्यें वाहे सुख कामी ॥ त्यावरि कुंजी करि आनंदें

भ्रमर पाहे भ्रमणीं ॥ भृकुट्या ह्मणुनी नांव ठेविशी तूं एक बहु शहाणी ॥ चक्रवाक हे पक्षी असतां कुच ह्मणसी त्याला ॥ कांतेचें तं० ॥ २ ॥ पुरे पुरे हा विनोद तुमचा मति माझी थकली ॥ सत्य असुन हें भाषण चतुरा भालि समजुत केली ॥ काय ह्मणावें तुह्मांसि आतां रीत नसे उरली ॥ स्त्रीरूपी ही गंगा मस्तकिं तुह्मी बैसविली ॥ अंत पार हा नसे तुमच्या सगुण रूपाला ॥ कांतेचें तं० ॥ ३ ॥

## गाणें १०, जोगी.

सर्व अंगिं भस्मउटी ॥ भागिरथी जटाजुटीं ॥ शोभतसे नीलकंठिं॥सर्वेश्वर ॥ अ० क० ॥ देखिला मि जोगि आज॥ शिवशंकरभोळा ॥ देखिला०॥१॥ व्याघ्रांबर आसन शोभा॥ त्रिपुंड्र भाळीं चंद्र शोभा॥ वक्रतुंड सन्मुख उभा ॥ गिरिजावर ॥ देखिला०॥२॥ त्रिपुरांतक त्रिशुळधारि॥रामनाम स्मरण करी॥विकट त्रिगुण अवतारी ॥ गळां रुंडमाळा॥ देखिला०॥३॥ नखशिखांत सर्प क्रिडे ॥ तृतीय नेत्रिं उजेड पडे ॥ विठ्ठलनाथ दृष्टीपुढें॥पहा भस्म भोळा ॥ देखिला०॥४॥

## गाणें ११ वें, गंगागौरीचें भांडण.

पार्वती ह्मणे गंगे तुं पाटकरणी ॥ तूं अखंड होतिस विष्णूच्या चरणीं ॥ भुलविलें शिवाला काशि

केलिस करणी॥राहिलीस मस्तकीं मजला चोरोनी॥ ॥ चाल ॥ तूं अमंगळ ग सवती ॥ तुज नाहीं मुळ कुळ जाती ॥ नरनारि तुझ्यामध्यें न्हाती ॥ मी आद्य शक्ति आदिमाया अर्धांगा ॥ घरनिघे जारिणी किति कारिसी दंगा ॥ अ० क० ॥ दोघि सवति भांडती पति भोगट भुंगा ॥ आपसांत वर्म बोलती गौरी आणि गंगा ॥ १ ॥ गंगा ह्मणे पार्वती तुं दुर हो परती ॥ ऐकिल्या मुळापासून तुझ्या कीर्ती ॥ कशि अगोचर तूं रुसलीस शिवावरती ॥ भिल्लिणिचा वेष तूं धरिला अपकीर्ती ॥ चाल ॥ टाकिली उडी होमांत ॥ केला दक्ष पित्याचा घात ॥ काय झालिस उत्तम जात ॥ मी असें मस्तकिं तुं असती अर्धांगा ॥ घरनिघे० ॥ दोघि सवति ॥२॥ पार्वती ह्मणे गंगे तूं ऐक आतां ॥ शंतनूसारिखा भ्रतार तुज होता ॥ तो सोडुन आलीस शिवा पाहतां ॥ मारिलें सप्त पुत्रांस पोटिं होतां ॥ चाल ॥ मानीलें न दुःख तुज होतां ॥ दगा दिलास भगिरथा ॥ तुझा जगांत उघडा माथा ॥ मी आद्य शक्ति० ॥ घरनिघे० ॥ ॥ ३ ॥ दोघिंचा बोल समतोल ऐकुनी कानीं ॥ ऐकतां स्मशानीं शिव बसले ध्यानीं ॥ थोरांचि गति ही काय असे करणी ॥ यालागिं न करिती दोन स्त्रिया ज्ञानी ॥ चाल ॥ अडल्यावर करणें लागे ॥

असें चालत आलें मागें ॥ त्या प्रवृत्तिनें जन वागे ॥ ह्मणे दास गातो हर हर शिवगंगा ॥ आपसांत वैर्म० ॥ दोघि सवति० ॥ ४ ॥

## गाणें १२ वें, शंकराचें.

सर्व देव नम्र तुला गौरि-प्रियकरा ॥ ह्मणुनि तूंच महादेव असासि बा खरा ॥ दीनताप हरण करिसि जान्हवीधरा ॥ भक्तांचा तुं मायबाप बंधु सोयरा ॥ अ० क० ॥ पंचवदन पावे मला चंद्रशेखरा ॥ नको नको अंत पाहुं भेट सत्वरा ॥ पंच० ॥ १ ॥ दनुज देव मिळुनि क्षीरसिंधु मंथिला ॥ काळकूट-दाह भुवन जाळुं लागला ॥ स्वर्गमृत्युलोकिं हाहा-कार जाहला ॥ केलें बा पान तया शक्तिसागरा ॥ पंच० ॥ २ ॥ मंदबुद्धि अंधसुतें फार गांजिलें ॥ द्वैत वनीं पांडुतनय कष्टि जाहले ॥ किरातवेष धरुन किरिटि रक्षिला हरा ॥ पंच० ॥ ३ ॥ नित्य दुष्ट मांस भक्षि भिल्ल त्या वनीं ॥ टाकितांच बिल्व स्वयंभु लिंग मेदिनी ॥ ऐशा त्या पातक्यास भेटला हरा ॥ पंच० ॥ ४ ॥ धन्य असे बळि श्रियाळ भूपमंदिरीं ॥ उग्र योगिरूप धरुनि प्रेम अंतरीं ॥ बाळमांस अर्पियलें नृपाळसुंदरी ॥ बाळाला वांचवोनि भेटला हरा ॥ पंच० ॥ ५ ॥ सर्व देव मिळुनि तूज हेंच मागती ॥

युग्महस्त जोडितों मि कृष्ण भूपती ॥ अंत किती पाहतोसि भेट सत्वरा ॥ पंच० ॥ ६ ॥

## गाणें १३ वें, शारंगपाट.

मांडिला शारंगपाट ॥ खेळतो खेळ निळकंठ ॥ आणिला नवरत्नपट ॥ फाशाचें केलें तळपट ॥ शिव बसले वाट पाहात ॥ पार्वती आली त्वरित ॥ खेळतां नारद आला ॥अ० क०॥ घे गिरिजे मुखावर शेला॥ शिव चतुर्भुज ग झाला ॥ घे० ॥ १ ॥ खेळतां आनंदानीं ॥ तंव आले नारदमुनी ॥ नाहिं शोभा पणावांचूनी ॥ बोलिले शीव भवानी ॥ टाकिला उमेनें फांसा ॥ जिंकिला गौरिहर कैसा ॥ नीळकंठ विस्मित झाला ॥ घे० ॥ २ ॥ जिंकिला भाळिंचा चंद्र ॥ पाहोनि हांसला इंद्र ॥ जिंकिला वासुकी हार॥ जिंकिला नंदिकेश्वर ॥ जिंकिला मुगुटमणी ॥ हांसले नारदमुनी ॥ व्याघ्रांबर सहित नंदीला ॥ घे० ॥ ॥३॥ मग घोरवना जाऊनी ॥ बैसले शिव ध्यानीं॥ पार्वती होउनि भिल्लीणी ॥ चोळी अंगीं तंग लेवूनी॥ हातिं धनुष्य बाण घेऊनी ॥ पुष्पांचा हार घालूनी ॥ मोत्यांनिं भांग रेखीला ॥ घे० ॥ ४ ॥ मग ध्यान विसर्जुनि मनीं ॥ पाहतसे नेत्र उघडोनी ॥ देखनां सुरूपा नयनीं ॥ धरियला हस्त जाऊनी ॥

युग्महस्त जोडितों मि कृष्ण भूपती ।। अंत किती पाहतोसि भेट सत्वरा ।। पंच० ।। ६ ।।

## गाणें १३ वें, शारंगपाट.

मांडिला शारंगपाट ।। खेळतो खेळ निळकंठ ।। आणिला नवरत्नपट ।। फाशाचें केलें तळपट ।। शिव बसले वाट पाहात ।। पार्वती आली त्वरित ।। खेळतां नारद आला ।।अ० क्र०।। घे गिरिजे मुखावर शेला।। शिव चतुर्भुज ग झाला ।। घे० ।। १ ।। खेळती आनंदानीं ।। तंव आले नारदमुनी ।। नाहिं शोभा पणावांचूनी ।। बोलिले शीव भवानी ।। टाकिला उमेनें फांसा ।। जिंकिला गौरिहर कैसा ।। नीळकंठ विस्मित झाला ।। घे० ।। २ ।। जिंकिला भाळिंचा चंद्र ।। पाहोनि हांसला इंद्र ।। जिंकिला वासुकी हार।। जिंकिला नंदिकेश्वर ।। जिंकिला मुगुटमणी ।। हांसले नारदमुनी ।। व्याघ्रांबर सहित नंदीला ।। घे० ।। ।।३।। मग घोरवना जाऊनी ।। बैसले शिव ध्यानीं।। पार्वती होउनि भिल्लीणी ।। चोळी अंगीं तंग लेवूनी।। हातिं धनुष्य बाण घेऊनी ।। पुष्पांचा हार घालूनी ।। मोत्यांनिं भांग रेखीला ।। घे० ।। ४ ।। मग ध्यान विसर्जुनि मनीं ।। पाहतसे नेत्र उघडोनी ।। देखनां सुरूपा नयनीं ।। धरियला हस्त जाऊनी ।।

गौरिनें सांब जिंकीला ॥ कैलास शिखरीं नेला ॥
नमि दास शिवचरणाला ॥ घे० ॥ ५ ॥

## गाणें १४ वें, शंकराचें.

चाल--( लग्नाला जातों मी. )

त्रिशुलधारि डमरुपाणि शंभु सुरवरा ॥ प्राण नेत धर्म येइ करुनिया त्वरा ॥ धृ० ॥ भक्त तुझा ह्मणत मजसि ॥ लाज असो त्याचि तुजसि ॥ काशि क्षेत्रिं नित्य वससि ॥ मृकंडसुता कां न बघसि ॥ विश्वेश्वर सर्वसाक्षि, त्रिपुरसंहरा ॥ त्रिशुल० ॥ १ ॥ व्याघ्रांबर आसन वसन ॥ शेष आदि सर्प भुषण ॥ नीळकंठ त्रीनयन ॥ भालचंद्र पंचानन ॥ कैलासपते कृपानिधे, गौरिप्रियकरा ॥ त्रिशुल० ॥ २ ॥ उद्धरिसी सकल जगा ॥ मजवरि करि अनुरागा ॥ भस्म उटी सर्वांगा ॥ झुळझुळ शिरिं वाहे गंगा ॥ वंदिं तुझ्या पदकमला पशुपतेश्वरा ॥ त्रिशुल० ॥ ३ ॥

## गाणें १५ वें, अंबिका.

उजवीकडे महाकाली ॥ वामीं सरस्वती ठेली ॥ नान मूर्त पुढें वसली ॥ सकल सुरगिरिजावल्लभ- असती सुखसदनीं ॥ अ० क० ॥ झडकरि जगज्जननी कोल्हासुर मर्दुन करविरशिरिं विष्णु शिरस्थानीं ॥ झड० ॥ १ ॥ माणिकर्णिका

काशि दत्त॥श्रीराम शयन रमाक्रांत॥मुक्तमंडप दिसे लखलखित ॥ राधाकृष्ण शनैश्वर मारुती, घेसी वेष्टुनि ॥ झडकरि० ॥ २ ॥ पंचगंगा दिसे नामी ॥ समाधींत नारायणस्वामी॥गरुडमंडप किति वर्णू मी ॥ दक्षिणकाशी परि मज भासे, अधिक दिसे तुलनीं ॥ झडकरि० ॥ ३ ॥ मनोहर रूप तुझें माते ॥ गदा खड्ग अमृतपात्रातें ॥ धरुनि उभि असासि चारी हस्तें ॥ दास बलवंत मनोरथ पुरवाया असासि कास कसुनी ॥ झडकरि० ॥ ४ ॥

## गाणें १६ वें, अंबिका.

अंबिके, अंबिके, अंबिके, ग तूं पाव मला ॥ जगदंबिके ॥ मला० ॥ अ० क० ॥ सेवा करितां भक्तालागीं ॥ वर देई जगत्पालिके ॥ ग तूं पाव० ॥ १ ॥ शुकसनकादिक ध्याती तुजला ॥ हे माये जगच्चालके० ॥ ग तूं पाव० ॥२॥ जग हें व्यापुनी, राहसी सदोदित ॥ धरी अवतार तूं कालिके ॥ ग तूं पाव० ॥ ३ ॥ शरण, शरण हे, शरण तुला मी ॥ प्रसन्न हो शिवमोहिके ॥ ग तूं पाव० ॥४॥ महिषासुर हा दैत्य मातला ॥ त्या वधिसी तूं चंडिके ॥ ग तूं पाव मला ॥५॥ शुंभ निशुंभ देवां गांजियलें ॥ त्यां सोडविलें तूं रेणुके ॥ ग तूं पाव० ॥ ६ ॥ हा तव बालक विनायक ॥ वंदी तुला विघ्नहारके ॥ पाव ॥

१६७ ९३६९

## गाणें १७ वें, अंबिका.

जन्मासी येतांना बहु श्रम झालें॥सोहं सोहं ह्मणुनि तुज वंदीयलें ॥ कलिवारा लागतां कोहं कोहं केलें ॥ ह्मणुनिया मजलागीं, दुःख होतें बहू ॥ अ० क० ॥ नको अंबे माझा तुं अंत ग पाहूं ॥ तुजवीण शरण मी कोणासी जाऊं ॥ नको० ॥१॥ बाळपण अज्ञानपणें माझें गेलें ॥ खेळतां स्वहीत नाहीं साधीयलें॥तरूण-पणीं विषयांत लुब्ध मी झालें ॥ असें नको अंबे मज होऊं देऊं ॥ नको अंबे० ॥२॥ प्रपंच गोड हा वाटतो मजला ॥ द्रव्याचा हव्यास मजलागी सुटला ॥ तुझीया नांवाचा वीसर पडला॥तुजवीण अंबे कोणा मी गाऊं ॥ नको अंबे० ॥ ३ ॥ संसारसागर हा भव दुस्तर ॥ षड्रिपू मजलागी गांजीती फार ॥ मायेचा लोंढा येतो वारंवार ॥ त्यांत नको अंबे मज वाहूं देऊं ॥ नको अंबे० ॥ ४ ॥ जन्मासी येऊनि काय मी केलें ॥ देहाचें सार्थक नाहीं ग झालें॥ह्मणु-नीया चरण तुझे धरीयेले ॥ गंगा तुजलागी विन-वीते बहू ॥ नको अंबे० ॥ ५ ॥

## गाणें १८ वें, अंबिका.

चाल—( बदरीफळें घ्या हीं. )

विष्णु शक्ति आदिमाये वससि करविरीं ॥ जगज्ज-

ननी नाम तुझें त्रिपुरसुंदरी ।। वाद्यघोष नित्य होत भजन मंदिरीं।।सुरनर देव ध्याति तुला जग वंदिता।। अ० क० ।। दिनरजनी नमितें मी कूलदेवता ।। अंबे-विणें जगतिं मला कुणि न रक्षिता ।। दिन० ।। १ ।। दर्शनासि दाटि तुझ्या नरनारिंची ।। भागिरथी ह्मणुन दृष्टि शंखतीर्थाची ।। कूर्मदृष्टि करुनि वाट पहासि भक्ताची ।। त्रिकाळ पूजा होय तुझी वाद्य वाजतां ।। दिनरजनी नमितें मी० ।। २ ।। नऊ दिवस नवरात्र आनंद हा मना ।। चहुंकडे दीप दाट घट-स्थापना ।। गरुडमंडपांत येति भक्त दर्शना ।। कर जोडून अंबे तुला प्रार्थितें आतां।।दिन रजनी नमितें मी० ।। ३ ।। भक्तांलागिं रक्षिसि तूं त्रिपुरसुंदरी ।। नामघोष नित्य वससि हृदयमंदिरीं ।। उद्धरिसी भक्तालागीं शरण ये जरी ।। नेत्र माझे थंड झाले तुज पहातां ।। दिनरजनी नमितें मी० ।। ४ ।। काम क्रोध षड्रिपु गांजिती आतां ।। लोभ मोह दंभ तोहि तोडि तत्वता ।। पुरति मनोरथ अंबे तूज प्रार्थितां ।। मोक्षपदाचाहि मार्ग दाखवी अत ।। दिन रजनी नमितें मी० ।। ५ ।।

## गाणें १९ वें, जटा.

लक्ष्मी ह्मणे पार्वतीसी ग ।। ल० ।। कंथ तुझा भिकारि राहतसे स्मशानापाशीं ।। त्याच्या तूं गोष्टि

फार करशी ग ॥ त्या० ॥ वस्त्र नसे ह्मणूनि चर्म पांघरीसी ॥ नसे सुवर्ण एक तोळा ग ॥ न० ॥ अ० क० ॥ जटा असे प्रचंड मस्तकावरी गंगा बाळा ॥ हर हर महादेव भोळा ॥ ग ॥ ह० ॥ जटा० ॥ १ ॥ पार्वती क्रोधयुक्त झाली ग ॥ पा० ॥ नको तुमचे अलंकार द्या मला ताडपत्री चोळी ॥ तशामधें स्वारि नारदाची आली ग ॥ त० ॥ धन्य तुह्मी ईश्वरा तुह्मी तर तपें थोर केलीं ॥ उणें काय असे कुणाला ॥ जटा० ॥२॥ सांब ह्मणे पार्वतीसी ग ॥ घेई ही तूं जटा जा त्वरें भंडारापाशीं॥बरवे अलंकार लेशी ग ॥ ब० ॥ इच्छा होईल परिपूर्ण जाई तूं लक्षुमि सदनासी ॥ मान्य करि शंकर वचनाला ग॥पा०॥जटा० ॥ ३ ॥ पार्वती जटा घेउन करीं ग ॥ पा० ॥ कुबेराच्या सदना चालली हिमनगबाळी ॥ जटा ठेवुनि तुळेवरी ग ॥ ज० ॥ कुबेराचि संपदा जटेला तिळभर उणि आली ॥ पार्वती विस्मित झाली मना ग ॥ पा० ॥ जटा ॥ ४ ॥

# भारत भागवतांतील कथां-
# पैकीं व इतर गाणीं.

## गाणें १ लें, द्रौपदीचें.

चाल—( आज अक्रुर हा. )

ह्या प्रभु धर्माला नृप बहु शरणाचि आले ॥ ज्यानें थोर यज्ञ बहु केले ॥ भोजन देउनिया विप्र तृप्तचि केले ॥ आशीर्वाद ते वदले ॥ श्रीआदित्यें स्थालीपात्रा दिधलें ॥ तें सर्व कुणिकडे गेलें ॥चाल॥ तो धर्मराज दिन झाला ॥ प्रताप तयाचा गेला ॥ वीराट सभासद झाला ॥ ग्रहणीं चंद्राकला निस्तेज कशी हो झाली ॥ अ० क० ॥ अशि दशा आह्मां कां आली ॥ गति दैवाची विपरित कशि ही घडली ॥ अशि० ॥ १ ॥ किति वर्णावें बळ त्या भीमसेनासी ॥ जो असंख्य काळ दैत्यासी ॥ मर्दि बाळपणीं सकल अंधसुतांसी ॥ जिरविलें सविष अन्नासी ॥ स्कंधिं वाहुनिया रक्षियलें आह्मांसी ॥ भंगिलें द्रुपदसैन्यासी ॥ चाल ॥ हेडंब बक्र वधियेले॥ गंधर्व सर्व पळवीले ॥ जीमूत मल्ल जिंकीले ॥ त्या

भीमाचे हातीं कां दर्वी आली ॥ आशि दशा० ॥ ॥ २ ॥ ह्या पार्थानें पराक्रम केला फार ॥ साक्षात नर अवतार ॥ पण जिंकीला मत्तातांचा थोर ॥ तोषला अपर्णावर ॥ स्वर्गी अस्त्रधन मेळविलें अपार॥ सखा कृष्ण जयाचा थोर ॥ चाल ॥ खांडववन अग्निस दिधलें ॥ नीवातकवच मारीले ॥ यादव वीर भंगीले ॥ त्या पार्थाची तनु कां स्त्रीमय झाली ॥ आशि दशा० ॥ ३ ॥ ह्या नकुलातें पाहुनि अति रुपवान ॥ जन स्त्रिया देति बहुमान ॥ मज आठवलें पूर्व कुंतिचें वचन ॥ तो असे मातापित्यांहिन ॥ त्यासी सांभाळी देउन अन्न पान ॥ न करी किमपि अनमान ॥ चाल ॥ तो मत्स्यगुराखी झाला ॥ गोपाळगणीं वेष्टीला ॥ गोमयें लिप्त तो झाला ॥ हे भगवंता मति कां निष्ठुर केली ॥ आशि दशा० ॥ ४ ॥ हा सहदेव प्रीय सकल लोकांत ॥ ज्याचें उत्तम शील वृत्त ॥ हा सुकुमार पंडुकुमार विख्यात ॥ प्राणाहुन मज आवडत ॥ त्यासि पाहुनिया गात्रें होति कांपित ॥ रति इच्छा जिरुनी जात ॥ चाल ॥ तो वीर अश्व पाळीतो ॥ वीराटा हस्त जोडितो ॥ तें पाहुन मज ज्वर येतो ॥ हे भगवंता लाज तुला न आली ॥ अशि दशा० ॥ ५ ॥ भगिनी कृष्णाची द्रुपदाची पी

दुहिता ॥ पांच पांडवांची कांता ॥ जन धकले हा माझि पूर्व स्थिति पहातां ॥ कशी गती पहा तुम्हीं आतां ॥ मज पाहण्याची शक्ति नव्हति कृतांता ॥ मारी सभेंत कीचक लाथा ॥ चाल ॥ सुदेष्णादासी झालें ॥ भुज्जलाहि तिजसी दिधलें ॥ कीचकशृहिं मद्य नेलें ॥ कां काळानें माझी उपेक्षा केली ॥ अशि दशा० ॥ ६ ॥ आत्मा सुस्वरूप स्त्रीच्या पतिच्या उदरीं ॥ घेतो जन्म परोपरी ॥ ह्मणुनी स्त्रीलागी जाया ह्मणती सारीं ॥ ही सत्ता सर्वेश्वरी ॥ तुम्ही पांडव विख्यात पृथ्वीवरी ॥ मी असें तुमची नारी ॥चाल॥ मज कीचकदुःख सोसेना ॥ मी त्यागिन अपुल्या प्राणा ॥ तव धर्म लोपला जाणा ॥ इतकें बोलुनिया सतिसी मूर्च्छा आली ॥ कवि ह्मणे धन्य माउली ॥ गति देवाची० ॥ ७ ॥

## गाणें २ रें, द्रौपदीचें.

चाल–( रडासि काय ह्मणुन असी सांग शारदे )

दासि होउनी नृपांगनेसी अर्चिसी ॥ धर्म कंक जिष्णु पंढ मी महानसीं ॥ नीच कर्म सेवणें असे अहर्निशीं ॥ भाग्य आपणा ह्मणून राग काय ये ॥ अ० क० ॥ दूर तूं रुसून आज जासि कां प्रिये ॥ काय जाहलें कळीव अंकिं बैस ये ॥ दूर० ॥ १ ॥ दैन्य

सर्वदाहि अल्पवस्तुयाचनीं ॥ काय गे कृपाळे आज या विवंचनीं ॥ जाणुनी सखे न आण पाणि लोचनीं ॥ अल्प काळ राहिला उगि गुणालये ॥ दूर० ॥ ॥ २ ॥ दैव सहाय तें न आपणांस सांप्रती ॥ भोगितों ह्मणोन दुःखकारक स्थिति ॥ हीच भेट गे परस्परांचिया मती ॥ शांत हो परंतु गोड बोल तूं सये ॥ दूर० ॥ ३ ॥

## गाणें ३ रें, भीष्मपर्व.

बळि चंड प्रताप उदंड नृपासि हराया ॥ कोणिच नाहीं यासी युद्ध कराया ॥ नित्य नेम दहासहस्त्र महारथि राया ॥ मारुन धाडी रविसुतसदन भराया ॥ रवि, चंद्र, इंद्र, मशक ते युद्ध कराया ॥ चळचळ कांपे काळ कृतांत मराया ॥ चा० १ ली ॥ पांडव ह्मणिजे काय बळी ॥ क्षणांत करिन त्यांची रळी ॥ परि वंशांत तिळांजळी ॥ देणार कुणी पाहिजे ॥ चा० २ री ॥ यालागीं पांडव न मारिजे अंगें ॥ निजमी विचार श्रीहरिलागुन सांगे ॥ पुढें शिखंडी अर्जुन त्यापाठें ॥ शरघाय पराक्रम करितां भिऊं नका हो ॥ इच्छा मरणीं जाइन शिवभुवना हो ॥अ० क०॥ रणिं भीष्म पडे शरपंजरीं तुह्मि ऐका हो ॥ कौरवसेना करिती एकचि टाहो ॥ १ ॥ श्रीरंग रणांत शिखंडी पुढें करुनियां ॥ अर्जुन हातीं शर गांडिव धरुनीया ॥

दुहिता ॥ पांच पांडवांची कांता ॥ जन थकले हो माझि पुर्व स्थिति पहातां ॥ कशी गती पहा तुम्ही आतां ॥ मज पाहण्याची शक्ति नव्हति कृतांता ॥ मारी सभेंत कीचक लाथा ॥ चाल ॥ सुदेष्णादासी झालें ॥ मृज्जलाहि तिजसी दिधलें ॥ कीचकगृहिं मद्य नेलें ॥ कां काळानें माझी उपेक्षा केली ॥ अशि दशा० ॥ ६ ॥ आत्मा सुखरूप स्त्रीच्या पतिच्या उदरीं ॥ घेतो जन्म परोपरी ॥ ह्मणुनी स्त्रीलागी जाया ह्मणती सारीं ॥ ही सत्ता सर्वेश्वरी ॥ तुम्ही पांडव विख्यात पृथ्वीवरी ॥ मी असें तूमची नारी ॥चाल॥ मज कीचकदुःख सोसेना ॥ मी त्यागिन अपुल्या प्राणा ॥ तव धर्म लोपला जाणा ॥ इतकें बोलुनिया सतिसी मूर्च्छा आली ॥ कवि ह्मणे धन्य माउली ॥ गति देवाची० ॥ ७ ॥

## गाणें २ रें, द्रौपदीचें.

चाल-( रडासि काय ह्मणुन असी सांग शारदे )

दासि होउनी नृपांगनेसी अर्चिसी ॥ धर्म कंक जिष्णु पंढ मी महानसीं ॥ नीच कर्म सेवणें असे अहर्निशीं ॥ प्राप्त आपणा ह्मणून राग काय ये ॥ अ० क० ॥ दूर तूं रुसून आज जासि कां प्रिये ॥ काय जाहलें कळीव अंकिं बैस ये ॥ दूर० ॥ १ ॥ दैन्य

सर्वदाहि अल्पवस्तुयाचनीं ॥ काय गे कृपाळे आज या विवंचनीं ॥ जाणुनी सखे न आण पाणि लोचनीं ॥ अल्प काळ राहिला उगि गृणालये ॥ दूर० ॥ ॥ २ ॥ दैव सहाय तें न आपणांस सांप्रती ॥ भोगितां ह्मणोन दुःखकारक स्थिति ॥ हीच भेट गे परस्परांचिया मती ॥ शांत हो परंतु गोड बोल तूं सये ॥ दूर० ॥ ३ ॥

## गाणें ३ रें, भीष्मपर्व.

बळि चंड प्रताप उदंड नृपासि हराया ॥ कोणिच नाहीं यासी युद्ध कराया ॥ नित्य नेम दहासहस्र महारथि राया ॥ मारुन धाडी रविसुतसदन भराया ॥ रवि, चंद्र, इंद्र, मशक ते युद्ध कराया ॥ चळचळ कांपे काळ कृतांत मराया ॥ चा० १ ली ॥ पांडव ह्मणिजे काय बळी ॥ क्षणांत करिन त्यांची रळी ॥ परि वंशांत तिळांजळी ॥ देणार कुणी पाहिजे ॥ चा० २ री ॥ यालागीं पांडव न मारिजे अंगें ॥ निजमी विचार श्रीहरिलागुन सांगे ॥ पुढें शिखंडी अर्जुन त्यापागें ॥ शरघाय पराक्रम करितां भिऊं नका हो ॥ इच्छा मरणीं जाइन शिवभुवना हो ॥अ० क०॥ रणिं भीष्म पडे शरपंजरीं तुह्मि ऐका हो ॥ कौरवसेना करिती एकचि टाहो ॥ १ ॥ श्रीरंग रणांत शिखंडी पुढें करुनियां ॥ अर्जुन हातीं शर गांडिव धरुनीया ॥

शर सोडितांचि वीर भीष्म रथावरुनीया ॥ समरीं प्रौढ कौरव मार्गे सारुनिया ॥ आक्रांत करि दुर्योधन धावे दुरुनीया ॥ कैसे करितिल पांडव हर्षे भरुनिया ॥ चा० १ ली ॥ खंती करी धर्मराजा ॥ रणीं पडला भीष्मराजा ॥ जळो जळो क्षात्र धर्म आमुचा आजा गेला रे ॥ चा० २ री० ॥ श्रीकृष्ण आणि अर्जुन भेटीस येती ॥ द्रोणादि शकुनी रणिं दर्शन घेती ॥ ऋषि गुप्तरूपें महाप्रदक्षणा करिती ॥ आकाशिं पुष्पवृष्टि होती पहा हो ॥ कौरव० ॥ २ ॥ कौरव मनीं चिंताक्रांत ह्मणती बरें नाहिं झालें ॥ शस्त्रें ठेवुन भीष्मासन्निध आले ॥ पुढें काय होईल कुणाचा तर्क न चाले ॥ पांडव योद्धे घालुन देतिल घाले ॥ शरघायें ग्रीवा भीष्माची लोंवत खाले ॥ तें दुःख बहु जिव्हा ळळळळ हाले ॥ चा० ॥ टेंकण द्या रे कोणी उशा ॥ दुर्योधनें आणिल्या उत्तम उशा ॥ भीष्म ह्मणे रे धिक् पुरुषा ॥ ऐशा उशा अवलोकुनी ॥चा० २ री ॥ श्रीकृष्ण ह्मणे अर्जुनराया ॥ दे उशा ग्रीवा लोंवतसे कर छाया ॥ पार्थे गांडिव चढवूनी दाखवी माया ॥ करून त्रिबाणाची तिकटी वरी ग्रीवा हो ॥ उचलुन ठेवी कौरव भीति जिवा हो ॥ रणिं० ॥ ३ ॥ लागली तृषा भीष्माशी मागत पाणी ॥ दुर्योधन तो स्नाह उभारुन पाणी ॥ आणी नृप झारि भरोनी मग

पाणी ॥ भीष्म ह्मणे रे जळो तुझें हें पाणी ॥ चा० ॥ पार्थ गांडिव मग चढवोनी ॥ सप्त पाताळ भेदुनी ॥ आणिली भोगावति काढुनी ॥ धार उडोनि मुखीं पडे ॥ चा० २ री ॥ धन्य अर्जुन नृप ह्मणती सारे॥ आतां श्रीहरिला नवसा रे ॥ असे हरी अर्जुनास साह्य या दिवसा हो ॥ मारुन पाडिल द्रोण कर्ण दिवसा हो ॥ राणे० ॥ ४ ॥

## गाणें ४ थें, मोहिनी.

समुद्र मंथुनी अमृत काढिलें देव दैत्य भांडती ॥ मुखचंद्रासभोंवती आभरणें सूर्यप्रभेवत् दिसती ॥ विसरुन भांडण दैत्य चकित मग वेडे पिसे मनिं होती ॥ विस्मित होती सोडुनीं लाजा ॥ अ० क० ॥ मोहिनीरूप भगवान स्वयें नटला हो ॥ देवकाजा श्रीपती ॥ देव० ॥ मोहिनी० ॥ १ ॥ गोलट बाहू वरि असे कंकण हावभाव किति करिती ॥ चालत हळहळु वाजति पैंजण निऱ्या करें वर धरती ॥ वक्षः-स्थळिं जो पदर आभरणें किति वर वर सावरती ॥ असुर सुर भुलले पहाति रतीला ॥ मोहिनी रूप० ॥ २ ॥ वेळोवेळीं वर खालीं पाहाती ॥ डाव्या गा-लामध्यें हंसती ॥ शोभतसे तिळ गोजिर गालावर चंद्रप्रभासम कांती ॥ किति स्वरूपाची ठेवण वर्णू

मदन स्वयंभुच मूर्ती ॥ विष्णुदासाप्रती प्रेमामृत पाजा ॥ मो० रू० ॥ ३ ॥

## गाणें ५ वें, देवयानी.

सोडि राज्य तोडि सख्य दैत्यसुतांचें ॥ वसुनि विपिनिं पराणें सदानें कंद फलांचें ॥ सत्रनीं, सुख मनीं, होउनी, भवनीं, अहित जनांचें ॥ धृ० ॥ शर्मिष्ठा पापिष्ठा गर्व बलानें ॥ अपमानुनि मजासि वनीं ढकालि करानें ॥ विधिबळें रक्षिलें सत्कुलें निर्मिलें नहुषसुतानें ॥ सो० ॥ २ ॥ सत्र संग अंतरंग हर्षवी सदा ॥ ह्मणुन खला त्यजि विमला हरिल आपदा ॥ घरीं वनीं मनीं जनीं हरिल आपदा ॥ सो० ॥ ३ ॥

## गाणें ६ वें, भगीरथ.

कठिण कार्य हें मनीं जाण भगिरथा ॥ धृ० ॥ धरितां मी रूप सुजल, येइल मज वेग प्रबळ ॥ धरणी नच सहन करिल, येइ मलिनता ॥ मनीं जाण० ॥ १ ॥ येतां मी भूमिवरी, लोकपाप मच्छरिरीं ॥ वास करिल मदंतरीं ॥ घोर तत्त्वता ॥ मनीं जाण० ॥ २ ॥ होतां मग भूभेदन, पाताळीं होय गमन ॥ अंतरेल सागरतरण, भूपते अतां ॥ मनीं जाण० ॥ ३ ॥ कोण वेग सहन करिल, मत्तापा कोण

हरिल ॥ जगीं असा सांग अखिल ॥ भूपते अतां ॥ मनीं जाण० ॥ ४ ॥ भगिरथ ह्मणे ऐक देवि सांगतों अतां ॥ वनांतरिं साधु मुनी येति तत्त्वता ॥ हरिति सर्व पाप तुझें साधु ते अतां ॥ मनीं जाण० ॥ ५ ॥

## गाणें ७ वें, सुधन्वा.

श्रीकृष्ण पार्थ तुह्मी समरांगणीं, जातां कीं तुह्मी पुन्हा न याल ॥ हा निश्चय मनांत समजुनी चिंतितसे प्रियराज ॥ अ० क० ॥ तुह्मी जाउं नका ॥ रतिपतिसुंदर चतुर पुरुष तुम्ही, चतुर्थ दिन मजि आज ॥ तुम्ही० ॥ १ ॥ हर्षयुक्त सखिवाक्य ऐकुनी स्त्रियेसहित रमला ॥ स्नान दान तव प्रयाणसमयीं, रथ स्वज ध्वज हो कुलराज ॥ तुह्मी० ॥ २॥ वासुदेव पद्पंकजपाणी मुखीं नाम वदतां ॥ केशव माधव मुकुंद विष्णु पांडुरंग तुजला ॥ तुह्मी० ॥ ३ ॥

## गाणें ८ वें, सुधन्वा.

आज्ञा भंग केली माझी ॥ कां न आला रणामाजीं ॥ नित्य कृत्य करुन आनि ॥ येईना भला रे ॥ ॥अ०क०॥ छी छी हें कर्म का करसि बालका रे ॥ छी छी० ॥ जन्मुनि मम जठरिं केलें नष्ट बालका रे ॥ छी छी० ॥ १ ॥ मोहपाशिं गुंतलासि ॥ पंढ कसा जन्मलासि ॥ मागधवंशि दुष्ट राशि ॥ आज बालका

रे ॥ छी छी हें० ॥ २ ॥ प्रतिज्ञा जि तीक्ष्ण जाण ॥ तप्त तेल कढत प्राण ॥ हरण करुनि अभिमान ॥ आजि नाम सारे ॥ छी छी हें० ॥ ३ ॥ राजाराम म्हणे नृपती ॥ आज्ञा करितों दूताप्रती ॥ टाका नेऊन तैलपात्रीं ॥ आजि बालका रे ॥ छी छी हें०॥४॥

## गाणें ९ वें, उखा.

चाल—(भूमीबाळा ह्मणे नृपाळा त्या दशकंठा मी न वरीं)

उखावरी अति आनंदानें चिंतित बसले अहर्निशीं ॥ पूर्ण मनोरथ होइल कैसा केंव्हां येइल द्वादशी ॥ एक घडी मज युगसम लोटे सखये सदनीं राहुं कशी ॥ शिव गौरि जसे खेळत होते पतिसह खेळेन काय तशी ॥ माय अंबिके पाव भवानी सहाय करि मज पतिदानीं ॥ प्रार्थुनि निज सुखशयनीं तीच्या नेत्रांतुन वाहे पाणी ॥ अ० क०॥ धन्य उखा ही बाणकन्यका अति लावण्याची खाणी ॥ स्वरूपरुपाचा ठसा पाहुनी जन हे तिजला वाखाणी ॥ १ ॥ मदनानळ हा निद्रित जागृत असतां मन्मथसुत आला ॥ तो स्वप्नीं देखतांच झाले केवळ मदनाचा पुतळा ॥ हर्षें मग गुप्त गोष्टी करितां पहाटे अरुणोदय झाला ॥ जवळी होती चित्ररेखा पाहुनि त्या वृत्तांताला ॥ लज्जा सांडुन दचकुन उठली हाकुन

-या सुखशयनाला ॥ हुडकित हुडकित पडे महीवर फिरे जैशी हरणीवाणी ॥ धन्य उखा० ॥२॥ मदनानळ हा निर्दय जाळी शांत कसा होइल आतां ॥ अशा समयीं टाकुन मजला सखया हो तुम्ही कुठे जातां ॥ म्हणे सुंदरी गोविंदातें नाम घेउनि लागे चरणीं ॥ धन्य उखा० ॥ ३ ॥

## गाणें १० वें, उखा २ री.

चाल-( सुंदरी काय करित आहे. )

प्राणनाथ तुम्हां आणवून ॥ सत्य झालें मी वैरीण ॥ सिंह कुपांत ढकलून ॥ तैसी गति केली जाण ॥ चा० ॥ आतां येउन तुमचा माझा करितिल कीं अंत ॥ अ० क० ॥ अससी कां चिंताक्रांत ॥ सखये होई जरा शांत ॥ अससी० ॥ १ ॥ ऐकुनी दुष्टांची धांव ॥ घाबरली म्हणे अंबे पाव ॥ बुडते सौभाग्याची नाव ॥ तराया उपाय मसी दाव ॥चा०॥ काढुनी अर्गळा दाराची ते ॥ मांडिला आकांत ॥अससी०॥ ॥ सख० ॥२॥ उद्विग्न स्त्रियेचें मन ॥ पाहुन करी शांतवन ॥ संहारिन दुष्टा जाण ॥ ऐसें ह्मणुन करी गमन ॥ चा० ॥ आतां० ॥ अससी० ॥ ३ ॥ समरीं काळ जरी प्राप्त ॥ झाला तरि दाविन हात ॥ समरीं

दुष्टाचा घात ॥ पाडिन क्षितिकांचे दांत ॥ चा काढुनी अर्गळा द्वारा० ॥ असली० ॥ ४ ॥

## गाणें ११ वें, दमयंती.

हीं वस्त्रभूषणें लेई तूं सखये ॥ सुमनांनीं वेणी भरी ॥भरी ग ॥ अ० क० ॥ सखे तुझें स्वयंवर या मासीं राजा करी ॥ १ ॥ हीं पुष्पशय्या कोमल रचिली ॥ करी शयन पलंगावरी ॥वरी ग०॥ सखे० ॥ २ ॥ तांबूल भक्षुनी परिमळ घ्यावा ॥ अंजन नयनीं भरीं ॥ भरी ग० ॥ सखे० ॥३॥ ही राजपुत्री, सुभग दिसते ॥ दमयंती नळासी वरी ॥ वरी ग० ॥ सखे० ॥ ४ ॥

## गाणें १२ वें, हिरवा साज.

हिरवा साज करुनिया प्रियकरणी ॥ कटीं कसुन पैठणी ॥ किं हिरवी काचोळी ल्यायालिस गजनी ॥ हिरवा दुपट्टा वरुनी ॥ किं हिरवा तिळ गालावर मृगनयनी ॥ रुप सुंदर वय तरुणी ॥ किं हिरवा थाट करुनिया बहू बरवा ॥ अ० क० ॥ खोऊन वेणीमधें मरवा ॥ किं हिरवा ॥ राघा मुखरण बनालिस अरे वा ॥ १ ॥ हिरवे जडिताचे अळंकार ॥ हिरवा पाचेचा हार ॥ किं हिरवी नाकें नथ शोभे डुमदार ॥ चौकड्याला मोतिं चार ॥ किं हिरवी वर टिक

जडली गुलजार ॥ आडवटाचीं मोतीं दुधार ॥ किं हिरवा गळ्यामध्यें तन्माणि बहु बरवा ॥ खोऊन० ॥ २ ॥ हिरवीं फुल गर्दि फुल अंबराई ॥ हिरवी केली बागशाई ॥ किं हिरवा मिन्याचा बंगला सवाई ॥ आंत केली चतुराई ॥ किं हिरवे मखमालि पडदे छत हिरवा ॥ खोऊन० ॥ ३ ॥ हिरव्या गाद्या गिरद्या हिरवाच रंग ॥ हिरवा छापरपलंग ॥ किं राधा हरिमुख पाहुन झाली दंग ॥ जसा दिपा पतंग ॥ किं कृष्णा चरणीं ॥ आपुल्या ह्या गात्रा ॥ ॥ खोऊन० ॥ ४ ॥

## गाणें १२ वें. पिवळा साज.

चाल—( खोऊन वेणिमध्यें मरवा किं हिरवा )

पिवळें तेज ताशि पिवळिच कांती ॥ पिवळे तुह्मी आरती किं ॥ पिवळे अलंकार छबि वर्णु किती ॥ पिवळेंच कंकण हातीं किं ॥ पिवळे सूर्य तुह्मी पहा प्रभा किती ॥ पिवळा पितांबर कटीं किं ॥ पिवळे स्वामि तुह्मी माझ्या जवळी ॥ अ० क० ॥ पिवळिच मी पाकोळी किं ॥ पिवळे कृष्णनाथ चाफ्यांचि कळी ॥ १ ॥ पिवळें पातळ बारिक गवती ॥ पदरावर गवती किं ॥ पिवळ्या चोळीवर जडलीं मोतीं ॥ पिवळ्या किनारीवरति किं ॥ पिवळी बनुन आलें

श्रीहरिजवळी ॥ पिवळिच मी० ॥ २ ॥ पिवळ्या महालावर पिवळे मोर ॥ पिवळा बाग समोर किं ॥ पिवळे उभयतां आह्मी पिवळें वस्त्र ॥ पिवळ्या मंचकावर किं ॥ पिवळा हात राधेच्या खांद्यावर ॥ पिवळा रंग सुंदर किं ॥ पिवळीं राधाकृष्ण शोभति महालीं ॥ पिवळिच मी० ॥ ३ ॥

## गाणें १४ वें, पद्मीण.

रुमशाम पाहुनी गौडदेश बंगाल पाहिला ॥ वडोद्याचा दुरवर पल्ला ग ॥ जोतपूर जयपूर उदेपूर पाहतां जिव माझा त्रासला ॥ गेलें प्रयागच्या किल्याला ग ॥ अयोध्या मथुरा गोकुळ वृंदावन हिंडतें बुंदेलखंडाला ग ॥ दहा खंड काशि तीर्थाला ग ॥ अ० क० ॥ शिंगणद्विपिंची पद्मिण हिंडते चहुंमुलखीं चहुंकडे ॥ पति लाल कुठे न सांपडे ग ॥१॥ तापशहर पाण्यांत विलायत कलकत्ता पाहुनी ॥ कांढि जांबुवेट हुडकुनी ग ॥ क्षिरसागर दधिसागर पर्वत हिमाचळापासुनी ॥ घोडमुखी राज्य पाहुनी ग ॥ असें सर्व शोधुनी नार ही निघालि सागरांतुनी ॥ काश्मीर देश पाहुनी ग ॥ शिंगणद्विपिंची० ॥ २ ॥ बागुल खंड गुजराथ मारवाड देश हिंडत चालली ॥ सातारा पुण्यासी आली ग ॥ तेरदाळ जमखिंडि मिरज ही पटवर्धनि सांगली ॥ करविराची वाट

धरिली ग ॥ करविरांत झालि भेट जशी कांहिं हिऱ्याची हिरकणी ॥ गेलि ज्योतिला मीळूनी ग ॥ शिगणादिपिर्चा० ॥ ३ ॥

# गाणीं देहावरचीं वगैरे.

## गाणें १ लें, मनुजा.

उंच हवेली तोषक तक्या मंचक पिकदाणी ॥ मनुजा मंचक० ॥ बहू दीप उजळोनि बैससी कांता घेऊनी ॥ रंगमहाल अति सुंदर त्यामधें नेसुन पैठणी॥ मनुजा ने० ॥ नेसवूनिया स्वयें तिजसी क्रिडसी दिनरजनी ॥ अशा आनंदामधें बापा नको राहुं क्षणभर ॥ मनुजा न० ॥ अ० क०॥ मायापाश तोडुनि मनुजा भजनिं तर्क धर ॥ रामनाम तूं स्मर रे प्राण्या राम राम स्मर ॥ मायापाश० ॥१॥ आयुष्यतंतू किंचित बापा जन्माची हानी ॥ मनुजा जन्मा० ॥ आप्त सोयरे धन कामिनी राहती ठिकाणीं ॥ यमदुत जेव्हां मारिति लाथा ओढिति फरफर ॥ मायापाश तोडुनी० ॥ २ ॥ कोणि नव्हे कोणाचें बापा एकटा तुं जाशी ॥ मनुजा एक० ॥ सर्व राहिले स्वजन विजनीं स्मशानिं तूं वससी ॥ करुनीया तुझी राखरांगोळी ठेवुनीया तुजसी ॥ बरो-

वरींचे लोक मिळुनिया येतिल गृहासी ॥ संसारा- तुनि उलटुन होई सावध झडकर ॥ मनुजा सा० ॥ मायापाश तोडुनी० ॥ ३ ॥

## गाणें २. रें वेणू.

पिंड ब्रह्मांड शोधितां ॥ असिपद आलें हाता ॥ मुळ मायेचा निजभर्ता ॥ तया ठायिं जाऊं ॥ अ० क० ॥ हरि कोठें आजि पाहूं ॥ वृंदावनीं वाजवी वेणू तया ठायिं जाऊं ॥ हरि० ॥ १ ॥ शांती दया उन्मनी पर ॥ निःसंग हा निर्विकार ॥ तोच ध्याऊं परात्पर ॥ चला गाउं ध्याऊं ॥ हरि० ॥ २ ॥ देही विदेही पाही ॥ अनंतरूप न पडे ठायीं ॥ सत्संगाचा ध्यास घेई ॥ निर्भ्रम होऊं ॥ हरि० ॥ ३ ॥ पांडु- रंगचरणीं दास ॥ सदा रंगीं रंगलासे ॥ प्रेमानंदें डोलतसे ॥ शांतीसुख घेऊं ॥ ४ ॥

## गाणें ३ रें.

सुभग तनू धन विपुल जया घरिं ॥ ह्मणती योग्य त्यासी जग हें ॥ जोंवरि ललना सुत दयितेची ॥ माया पाझर आटेना ॥ अ० क० ॥ कुणि दावा नयनीं कंसारी ॥ संसारीं आज सुख वाटेना ॥ कुणि० ॥ ॥ १ ॥ बाळवयें खेळुनी घालविलें ॥ तारुण्यें विष- यासी लंपट ॥ वृद्धदशा आली परी हें मन मिथ्य-

मानुन रहाटेना ॥ कुणि० ॥ २ ॥ श्रमलों दमलों भ्रमलों हे प्रभु ॥ आलों शरण तुह्मांसी आज मी ॥ दास ह्मणुन करुणाकर हे प्रभु ॥ कुमती मति ही आटेना ॥ कुणि० ॥ ३ ॥

## गाणें ४ थें, छंद.

छंद लागला या देहाला ॥ सप्तहि सागर मोहित झाला ॥ मैनावतिनें कृतार्थ केला ॥ गोपीचंद ॥ अ० क० ॥ जाई तुटोनिया भवबंध ॥ असा धरि छंद ॥ जाई० ॥ १ ॥ दुधाचा सागर उपमन्युला ॥ ध्रुव जो अढळपदीं बैसविला ॥ मार्कंडें यम कृतार्थ केला॥ चालिला मंद ॥ जाई० ॥ २ ॥ तीन देह या भरताला ॥ रावण रामरुपी झाला ॥ गोपी चढल्या वैकुंठाला ॥ यशोदा नंद ॥ जाई० ॥ ३ ॥ ऐशा छंदें कितिएक तरती ॥ नराचे नारायण ते होती ॥ दीनबंधु आपुलासा करिती ॥ निजसुखकंद ॥ जाई०॥४॥

## गाणें ५ वें, सद्गुरूचें.

चाल–( राम राम बोला वाणी. )

अज्ञानरात्रिची पडली जे समयीं मजवर छाया ॥ तेथेंच निजलें रूपीं लागलें स्वप्न देखाया ॥ संसार-काननीं पडतां काळसर्प ये मज खाया ॥ त्रा० ॥

वरीचे लोक मिळुनियां येतिल गृहासी ॥ संसारां-
तुनि उलटुन होई सावध झडकर ॥ मनुजा सा० ॥
मायापाश तोडुनी० ॥ ३ ॥

## गाणें २ रें वेणू.

पिंड ब्रह्मांड शोधितां ॥ असिपद आलें हाता ॥
मुळ मायेचा निजभर्ता ॥ तया ठायिं जाऊं ॥ अ०
क० ॥ हरि कोठें आजि पाहूं ॥ वृंदावनीं वाजवी
वेणू तया ठायिं जाऊं ॥ हरि० ॥ १ ॥ शांती दया
उन्मनी पर ॥ निःसंग हा निर्विकार ॥ तोच ध्याऊं
परात्पर ॥ चला गाउं ध्याऊं ॥ हरि० ॥ २ ॥ देही
विदेही पाही ॥ अनंतरूप न पडे ठायीं ॥ सत्संगाचा
ध्यास घेई ॥ निर्भ्रम होऊं ॥ हरि० ॥ ३ ॥ पांडु-
रंगचरणीं दासे ॥ सदा रंगीं रंगलासे ॥ प्रेमानंदें
डोलतसे ॥ शांतीसुख घेऊं ॥ ४ ॥

## गाणें ३ रें.

सुभग तनू धन विपुल जया घरिं ॥ ह्मणती योग्य
तयासी जग हें ॥ जोंवरि ललना सुत दयितेची ॥
माया पाझर आटेना ॥ अ० क० ॥ कुणि दावा नयनीं
कंसारी ॥ संसारीं आज सुख वाटेना ॥ कुणि० ॥
॥ १ ॥ बाळवयें खेळुनी घालविलें ॥ तारुण्यें विष-
यासी लंपट ॥ वृद्धदशा आली परी हें मन मिथ्या

मानुन रहाटेना ॥ कुणि० ॥ २ ॥ श्रमलों दमलों भ्रमलों हे प्रभु ॥ आलों शरण तुह्मांसी आज मी ॥ दास ह्मणुन करुणाकर हे प्रभु ॥ कुमती मति ही आटेना ॥ कुणि० ॥ ३ ॥

## गाणें ४ थें, छंद.

छंद लागला या देहाला ॥ सप्तहि सागर मोहित झाला ॥ मैनावतिनें कृतार्थ केला ॥ गोपीचंद ॥ अ० क० ॥ जाई तुटोनिया भवबंध ॥ असा धरि छंद ॥ जाई० ॥ १ ॥ दुधाचा सागर उपमन्युला ॥ ध्रुव जो अढळपदीं बैसविला ॥ मार्कंडें यम कृतार्थ केला॥ चालिला मंद ॥ जाई० ॥ २ ॥ तीन देह या भरताला ॥ रावण रामरुपी झाला ॥ गोपी चढल्या वैकुंठाला ॥ यशोदा नंद ॥ जाई० ॥ ३ ॥ ऐशा छंदें कितिएक तरती ॥ नराचे नारायण ते होती ॥ दीनबंधु आपुलासा करिती ॥ निजसुखकंद ॥ जाई०॥४॥

## गाणें ५ वें, सद्गुरूचें.

चाल—( राम राम बोला वाणी. )

अज्ञानरात्रिची पडली जे समयीं मजवर छाया ॥ तेथेंच निजलें रूपीं लागलें स्वप्न देखाया ॥ संसारकाननीं पडतां काळसर्प ये मज खाया ॥ चा० ॥

षड्रिपुंनीं मार्गीं धरिलें ॥ तें मनीं बहुत घाबरलें ॥ सद्गुरुनें मज आवरिलें ॥ करिं धरिलें नमितां चरणीं ॥ अं० कं० ॥ काय सांगुं सखये माझ्या सद्गुरुची अघटित करणी ॥ १ ॥ मुखावाटे फुंकुन कान ज्ञानाग्नी प्रदीप्त केला ॥ देउनी जागृती मातें जाळिलें भवाटवीला ॥ अज्ञानरात्र मावळली स्वप्नभ्रम अवघा गेला ॥ चा० ॥ स्वप्रकाश सर्वां ठायीं ॥ चित्सूर्य उगवला बाई ॥ या गुरुची करुणा कायी ॥ ज्या योगें जग उद्धरणी ॥ काय० ॥ २ ॥ दर्शनेंच मजला केलें सद्गुरुनें निजसुखराशी ॥ उतराई कांहिं नसे त्या सद्गुरुच्या उपकारासी ॥ मीपण अर्पिलें प्रेमें मी समूळ तच्चरणांसी ॥ चाल ॥ निःसंग भाव पाहिं ल्याहे ॥ मद्रूपीं द्वैत न साहे ॥ वाच्यांश टाकुनी ध्या हें ॥ नरहरि रत गुरुच्या चरणीं ॥ काय० ॥ ३ ॥

## गाणें ६ वें, चक्षुदर्पण.

चक्षुदर्पाणिं जग हें पहा ॥ चक्षु० ॥ जगजिवानिं मुरुन रहा ॥ तुर्याकालिंदि तीर्थी न्हा ॥ पापापुण्याचि तिळांजुळि वहा ॥ गडे हो ॥ सत्य आहे गुरुची खुण ॥ चुकलें स्वरूप घ्या ओळखुन ॥ गडे हो ॥ सत्य० ॥ १॥ एवढें ब्रह्मांड फळ ज्या देठीं ॥ त्याहि हारपल्या देखण्या दिठी ॥ जेव्हां पाहि तेव्हां

पाठि न पोटीं ॥ मीतूंपणाच्या पडल्या तुटी ॥ गडे हो ॥ सत्य० ॥ २ ॥ अर्ध्या चंद्राच्या चांदण्यांत जागा ॥ जागृत होवोनि त्या स्थळिं वागा ॥ गुरु ब्रह्मांड सर्वहि योगा ॥ गडे हो ॥ सत्य० ॥ ३ ॥ चार सहा दहा बारा सोळा ॥ त्याही कळा त्याहुन वेगळा ॥ एका जनार्दनीं लागला डोळा ॥गडे हो०॥४॥

## गाणें ७ वें, मन.

सकाळीं उठुन सुप्रभात, जाऊं भागीरथीतीरा ॥ स्नान संध्या तीळ तर्पण, दान धर्म करा ॥ गंध बेल फूल पत्री, पुजूं विश्वेश्वर ॥ पाप जाऊनीया, पुण्य येइल थोर ॥ अ० क० ॥ चल माझ्या मना, जाऊं वाराणशी ॥ करूं तीर्थयात्रा, बैसूं पुराणासी ॥ स्मरिल्या मानसीं मुक्ती होइल देहासी ॥ चल० ॥ १ ॥ भैरवदर्शनें, पुरतिल तुझे मनोरथ ॥ देखिल्या तीन मूर्ती डोळां, हे तर त्रैलोक्यनाथ ॥ भवानी शंकर हे काय लक्षुमीचे कांत ॥ इंद्रादिक देव, तेथें पूजीले समस्त ॥ चल० ॥२॥ सांडी संसार धंदा पुत्र कलत्रालागी ॥ नाशिवंत देह तुझा, पिडलासे व्याधी ॥ अर्थ दान द्रव्य लक्ष्मी वाया गेली तुझी ॥चल ॥३॥

## गाणें ८ वें, संध्या.

सद्गुरुतीर्थें सप्रेम भागिरथी ॥ गंगा यमुना गुप्तचि

सरस्वती ॥ स्वानुभवें स्नानाची गुप्तस्थिती ॥ अ० क० ॥ झाली संध्या संदेह माझा गेला ॥ आत्माराम हृदयीं प्रगटला ॥ झा० ॥ १ ॥ सद्बुद्धीचें घालुनी दिव्यासन ॥ वर कृपा सद्गुरु परिपूर्ण ॥ शमदम विभुती चर्चून ॥ करी आचमन केशव नारायण ॥ झाली० ॥ २ ॥ बोधपुत्र निर्माण झाला जेव्हां ॥ ममताम्मातारी मरुन गेली तेव्हां ॥ ॥ भक्तीविहिण धावुनी आली गांवा ॥ आतां संध्या कैची करूं केव्हां ॥ झाली० ॥ ३ ॥ जें जें कर्म तें तें केलें ब्रह्मार्पण ॥ तें पाहूनी नीवती साधुजन ॥ जन नव्हे अवघा जनार्दन ॥ एका जनार्दनीं बाणली निजखूण ॥ झाली० ॥ ४ ॥

## गाणें ९ वें. सर्प.

स्वरूपमंदिरीं होतें मी एकली ॥ मायासांज वेळीं अविद्येच्या मेळीं ॥ तुझें माझें ह्या चालतां पाऊलीं ॥ मोहभुजंगें धरिली करांगुली ॥ अ० क० ॥ लोभसर्पे डंखिलें करूं मी काय ॥ स्वार्थसंपत्तीनें जड झाला पाय ॥ विषयलहरीं तापला माझा देह ॥ तृप्तिवारी तूं घाल गुरुपाये ॥ १ ॥ कामादिक माझ्या डोळां आलें पित्त ॥ स्तुतिनिंदेनें काळे झाले दंत ॥ ऐशा वासनाभुंगिया धांवत ॥ स्त्री पुत्र जीवा पडली असे भ्रांत ॥ लोभ० ॥ २ ॥ विषयालिंवांत बहु

गोडी आली ॥ भजनगूळ तो मसीं कडू झाला ॥ सत्य असत्याच्या येती लहरा ॥ माया अविद्येचा झेंड जो फुलला ॥ लोभ० ॥ ३ ॥ गुरुगारोडी आलासे धांवुनी ॥ विवेकअंजन घातिलें नयनीं ॥ ज्ञान वैराग्याचें पाजियेलें पाणी ॥सोहंशब्दनादें वाजविली ध्वनी ॥ लोभ० ॥ ४ ॥

## गाणें १० वें, बाजार.

बत्तीस पांचातकिं आहे एकत्रिस ॥ क्रोध अहंकार चौक्या तिस ॥ तिथे मनाजीपंत कारभारि हो ॥अ० क० ॥ देहेगांविंच्या बाजारा जाऊं ॥ राम ॥ नामाचा सौदा घेऊं हो ॥ दे० ॥ १ ॥ तिथे आहे एक अविद्या पेठ ॥ बमूं नको बा होशिल चाट ॥ चुकशिल परमार्थाची वाट हो ॥ दे ० ॥२॥ तिथे आहे एक बुद्धि शेटिण ॥ तिचें माप बा बहु कठिण ॥ तिच्या मापाची झाली दाटण हो ॥ दे० ॥३ ॥ सात चव्यांची आहे चावडी ॥ तिची रचना बहु बागडी॥ तिथे मनाजीपंत कारभारी हो ॥ दे० ॥ ४ ॥बाजार करून आले हुजुर ॥ केला भगवंताला रुजु कारभार ॥ ऐसा भगवंत त्यांनीं गडी केला हो ॥ जन्ममरणाचा फेरा चुकाविला ॥ जन्ममरणाचा० ॥ दे० ॥ ५ ॥

## गाणें ११ वें.

बुडतसें भवाब्धित पाही, बुडत० ॥ करि घाइ धरी निज बाहीं रे ॥ करि घा० ॥ जरि होइल यश जगिं गाया ॥ अ० क्र० ॥ ये धांवुन साह्य कराया ॥ श्रीवरद्करा गुरुराया ॥ श्रीवर० ॥ ये धांवुन साह्य कराया रे ॥ मोकळूं नको मज वाया ॥ ये धांवुन० ॥ ॥ १ ॥ तुजवीण नसे मज त्राता ॥ तुज० ॥ हो सदय दयानिधे आतां रे ॥ हो सदय० ॥ करि झडकरि शीतळ छाया ॥ ये धांवुन० ॥ २॥ प्रभु एक जनार्दन स्वामी ॥ मति रंगो तुझिया नामीं रे ॥ मति० ॥ आठवितो रवि प्रिय पाया ॥ ये धांवुन० ॥ ३ ॥

## गाणें १२ वें, धांवा श्रीरामाचा.

पाहिन धणिभरी चरण झाडिन केशीं ॥ नयन शीणले बा आतां केधवां येशी ॥ अ० क०॥ धांव रे रामराया किती अंत पाहसी ॥ प्राणांत मांडिला कीं नये करुणा कैशी ॥ धांव० ॥ १ ॥ मीपण अहंकार अंगीं भरला ताठा ॥ विषयकर्दमांत लाज नाहिं लोळतां ॥ चिळस उपजेना ऐसें झालें बा आतां ॥ धांव० ॥ २ ॥ मारुतिस्कंधभागीं शीघ्र बैसुनी यावें॥ राघवें वैद्यराजें कृपा औषध द्यावें ॥दयेच्या प्रेमहस्ता माझ्या शिरीं ठेवावें ॥ धांव० ॥ ३ ॥ या भवीं

रामदास थोर पावतो व्यथा ॥ कौतुक पहातोसी काय जानकीकांता ॥ दयाळा दीनबंधो भक्तवत्सला आतां ॥ धांव० ॥ ४ ॥

## गाणें १३ वें. शेजआरती रामाची.

चाल– ( साधी. )

निशी माजी सीता, सांगे हनुमंता ॥ राम बोलाव्रूनी आणा तत्त्वतां ॥ बहुत रात्न झाली सांगा रघुनाथा ॥ सुमनशेजेवरी पहुडावें आतां ॥ अ० क० ॥ जयदेव जयदेव जय आत्मारामा ॥ ओवाळीते सीता तुज मेघश्यामा ॥ जयदेव० ॥१ ॥ काम क्रोध लोभ केर काढुनी ॥ भक्तीरंगवल्लया तीथे घालूनी ॥ अंतरआरसे भिंती जोडूनी ॥ सत्त्वकर्पूराचा दीप लाव्रूनी ॥ जयदेव० ॥ २ ॥ चारी मुक्तिस्तंभ जडले कुसरी ॥ मनमौक्तीकाच्या लाविल्या हारी ॥ धरि भिंती मीना सारवला वरी ॥ पंचतत्त्वाचित्रें रेखीलीं परी ॥ जयदेव० ॥ ३ ॥ भक्तिरूपतेल ज्ञानदीपाला ॥ अज्ञानअंधकार समर्यी निरसीला ॥ वैराग्यचांदवा वरी बांधीला ॥ ॥ नवनीधी सिद्धी सुमनशेजेला ॥ जयदेव० ॥ ४ ॥ मनोदूत सीता पाठवी हनुमंता ॥राम बोलावूनी आणा तत्त्वता ॥ बहुत रात्र झाली सांगा रघुनाथा ॥ सुमन शेजेवरी पहु-

डावें आतां ॥ जयदेव० ॥ ५ ॥ इतकें ऐकूनी राम वचन ॥ सभा विसर्जून आले धांवून ॥ पंचप्राणदीप सीता घेऊन ॥ ओंवाळीते रामा करी लिंबलोण ॥ ६ ॥ देहरत्नपाटीं राम बैसले ॥ मनसरोवरींचें तीर्थ आणिलें ॥ त्रिविधताप जाळुन उष्णोदक केलें॥ रामचरणीं प्रीतीं प्रक्षाळण केलें ॥ जयदेव० ॥ ७ ॥ कुरळ केश चरणीं पुशीते बाळा ॥ मोहकस्तुरि टीळा लावी निडळाला ॥ विरक्तचंदन चर्ची अंगाला ॥ नाना उपचारें पूजी रामाला ॥ जयदेव० ॥ ८ ॥ मनमोगऱ्याचा हार गुंफीला ॥ शिरीं शेवंतीचा तुरा खोंविला ॥ दंभअहंकाराचा धूप जाळीला ॥ सत्त्वकर्पूराचा दीप लाविला ॥ जयदेव० ॥ ९ ॥ भक्तिगायकेळें खजूर शर्करा ॥ परिमळ द्रव्यें लावून आणलिं नीरा ॥ भक्ती हा नैवेद्य अर्पुन श्रीरंगा ॥ भक्षुनीया राम पहुडे पलंगा ॥ जयदेव० ॥ १० ॥ वासना फोडून केली सुपारी ॥ भावार्थकापूरानें घोळविली निर्धारीं ॥ शांतीनागवेली पानें गंगेरी ॥ मीपण जाळुन चूना लावीला वरी ॥ जयदेव० ॥ ११ ॥ दयावेलदोडे क्रोधलवंगा ॥ शांती जायफळ पत्री सुरंगा ॥ एकत्र करूनी विडा अर्पि श्रीरंगा ॥ भक्षूनीया राम पहूडे पलंगा ॥ जयदेव० ॥ १२ ॥ देही विदेही ह्या दोघी दासी ॥ रामचरणीं सेवा करिती भावेंसी

॥ अंतरगूज सीता सांगे रामासी ॥ जागृतीस्वप्नसुषुप्ती तुह्मी या गस्तीसी ॥ जयदेव० ॥ १३ ॥ शेज आरती गातां ऐकती ॥ राम उभयतांसी देईल मुक्ती ॥ नारायणाची कन्या घेई विश्रांती ॥ राघवचरणीं राहे अर्पूनी वृत्ती ॥ जयदेव० ॥ १४ ॥

## गाणें १४ वें, काकडआरती पांडुरंगाची.

सिंधू तटिंचा गारवा बहु भारी ॥ शेषशयनीं पहुडले मुरहारी ॥ भक्त भजनीं गर्जती जयजयकारी ॥ जाणताचि मुक्तिचीं सोयरीं रे ॥ अ० क० ॥ हरी अजुनी निजलासी काय रे ॥ पांडुरंगा बापा तूं माझी माय रे ॥ ह० ॥ १ ॥ भक्ताकारणें धावतां बहु श्रमलासी ॥ ह्मणुनी निद्रा लागली हृषीकेशी ॥ कां रे अनंता सावध नाहीं होसी ॥ ह्मणुन वंदिताती पाउलें रे ॥ ह० ॥ २ ॥ ऋषी सनकादिक नारद तुंबर मुनी ॥ दर्शन घ्यावया पातले ह्मणे रुक्मिणी ॥ सावरा झोप उठा चक्रपाणी ॥ नेत्र उघडोनी दीनाकडे पाहीं रे ॥ ह० ॥ ३ ॥ उठि रे गोपाळा अरुण उदय झाला ॥ वैष्णव मेळा गरुडपारीं आला ॥ आरतीसाठीं कांकडा उजळीला ॥ उठि लवकर यादवराय रे ॥ ह० ॥ ४ ॥ नामघोष ऐकतां तोषले जगजेठी ॥ सप्रेमें उभा कर ठेवुनिया कटीं ॥ आरक्त

नेत्र कानिं कुंडलांची दाटी ॥ कासे पितांबर वैजयंति माळ कंठीं ॥निज भक्ती सांवळा देखिला हो ॥ आरतीलागीं काकडा ओंवाळीला ॥ सर्व अपराध क्षमा करी यादवराय रे ॥ह० ॥ ९ ॥

## गाणें १५ वें, भामाविनोद.

सत्यभामे कां रुसलिस, उठुनिया बस, काय ग पिसें लागलें तुजला ॥ आज कां भुमीवर निद्रा केली पलंग हा शून्य दिसे मजला ॥ देव आपुल्या हातीं श्रीहरी, केस निट करी, वेणि सांवरी, भांग रेखिला ॥ आज रुसली लाडकी राणी तिजविणें शून्य जग मजला ॥ चा० ॥ देव हर्षे हनुवटी धरी॥ सत्यभामा हात झिडकारी ॥ तुह्मी नका येउं आमचे घरीं ॥ कडकडुन बोटें मोडुन मोडुन मांडीवर आंग टाकूनी ॥ अ० क० ॥ आज रुसली लाडकी राणी क्रोधें शोभली कळेना करणी ॥ सत्यभामेसी स्वानंद, करी मुकुंद कृपाळू वदनीं ॥ आज० ॥ १ ॥ सत्यभामा स्फुंदुन स्फुंदुन रडे, तुझ्या मनिं कुडें, पाहे तिजकडे तिची आकृती ॥ खाशी रुक्मिणीराणी भोग जा आवडते तुज ती ॥ माझें रूप आहे अविट, तिचें नेटकें, सुगंध तीथें ॥ तिजला सोडुनी कृष्णा तुह्मी कां आलां हो येथें ॥ चा० ॥ पला कैचे अलंकार ॥

तिज भोंवते आवघे शृंगार ॥ तिच्या घरीं आह्मी चाकर ॥ कडकडुन० ॥ आज० ॥ २ ॥ सत्यभामे तुझ्या मनीं दुजें, आवडशिल मज, हा देह तुज अर्पण केला ॥ तूं अवघ्यांहुनि श्रेष्ठ त्रिभुवनीं धाक आहे मजला ॥ माझ्या सोळा सहस्र नायका, अष्ट नायका, आणिक गोपिका इतक्या मजला ॥ इतं-क्यांपरिस तूं चांगली ॥ चित्ररेखा आवडशिल मजला ॥ चा० ॥ नारदास दिलें मज दान ॥ तेव्हां सोड-विलें रुक्मिणिनें ॥ तुझ्यासाठीं युद्ध करून ॥ परिस आणूनी बांधि दोरीला ॥ आज० ॥ ३ ॥ सत्य-भामा ह्मणे गोपाळा, तिची पळपळां याद काढितां ॥ वळेंच रिघाली घरिं ती तिचे बडिवार कां हो वर्णितां ॥ तुह्मी लहानपणचे लबाड, जग ओढाळ, रडति गोपाळ, छळिलें बहुतां ॥ खोटें तुमचें लक्षण बडीवार कां हो वर्णितां ॥ चा० ॥ सिताराम करुन वरित ॥ पहा कृष्णाचें चरित्र ॥ तारिले भक्त पवित्र ॥ अनंत फंदी गातो छंद अक्षरें बंद घ्या वाचुनी ॥ आज० ॥ ४ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ९३७

इतर सर्व बालामृतें याच्या रंगीत नकला !! संभाळा.

४० वर्षें अनुभवून उत्कृष्ट ठरलेलें अस्सल व पहिलें

# गोखले एम. ए, एम. डी. यांचें

किं. ०१२. **बालामृत.** ट. ख. ०४.

उत्तम गुणास ३ बाटल्यांची ट. ख. सह किं. फक्त रु. २८९.

स्त्रयमृत—स्त्रीरोगनाशक अमूल्य पौष्टिक, किंमत १ रु. ट. ख. ४ आणे.

जीवनार्क—मानसिक श्रम करणारास अप्रतिम पौष्टिक, किंमत १। रु. टपाल खर्च ०४.

डोळ्यांचें औषध—खुपऱ्या, लाली, सूज, फुल, सारा, वगैरे वर अचुक गुणकारी. किं. १ रु. ट. ख. ०४.

फास्फरस—गोळ्या—धातुपौष्टिक, शक्तिवर्धक, अन्नपाचक. किं. ०१४. ट. ख. ०४.

सार्सापरिला—स्वदेशी औषधांचा आयोडाइज्ड, जबरदस्त रक्तशुद्धिकारक व शक्तिवर्धक, सर्व दूषित-रक्तजन्य रोगांवर प्रतिज्ञेचा उपाय, थोडक्या पैशांत केवढा तरी फायदा. किं. १ रु. ट. ख. ०४.

उत्तम गुणास वरील कोणत्याहि औषधाच्या चार बाटल्या मागविणारांस ट. ख. माफ.

**पत्ता:—हिंदु फ्यामिली मेडिकल हॉल, माधवबागेसमोर, गिरगाव, मुंबई.**

REFBK-0001341

REFBK-0001341